सहामाही " ३ " " ८८
साल अखेर " ७ " " १८८
किरकोळ अंकास........................ ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस .........८१

Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly............ 3 " 8 as
Single copy.............................. 4 as

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERARSAMACHAR.

VOLXX AKOLA MONDAY 4 OCTOBER 1886 NO 39

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख ४ माहे अक्टोंबर सन १८८६ इ० अंक ३९

Look for our name.
Save your trouble! Save your trouble!
BROWN & MURRAY'S.
PORTABLE SCIENTIFIC COOKING STOVES

Require no oil, Require no spirit
Useful Requisite for every household and Inestimable boon both to Rich and poor.

1 Charcoal Ball or 3 Charcoal Cakes. Will suffice for the Napolean Patent stove to prepare any 2 lbs. of the following in 5 minutes *viz*, Tea, Coffee, Milk Sago, Arrowroot, Barley, &c.

2 Charcoal Cakes. 2 Charcoal Cakes. 2 Charcoal Cakes. Will take for the Dick's Patent or Pocket Stove to prepare any 1 lb. of the following in 3 minutes--*viz*, Tea ,Coffee, Milk, Sago Arrowroot, Barley, &c.

1 Pice Charcoal. Ball or 1 lb. coal, Will be enough for the Tourist Patent stove to prepare any four of the following, in 30 minutes. *viz*, Rice, Curry, Cultet, Stew, Pudding, &c.

BROWN & MURRAY'S STOVES give rise to no disgusting smell and smoke as they are in general with other valuable Stoves. Their Stoves are perfect, most economy in Cookery, and require no setting of brickwork. They can be placed, in time of Cooking anywhere even on a Table, Sofa, Chair, &c., without the least fear of catching fire; and cooking can also safely be executed on a running car. BROWN & MURRAY'S STOVES are not only valuable helps to the INVALIDS and INFANTS for procuring HOT TEA and WARM MILK, but on the whole they are HAPPY PARTNERS to all sorts of men for the preservation of life.

*Packing as.4 postage extra.* R. A p.

| | R. | A. | p. |
|---|---|---|---|
| With direction each Napolean Patent........................ | 2 | 8 | 0 |
| Pocket Stove............... | 3 | 8 | 0 |
| *Packing as. 6 Postage extra-* With direction, each, Tourist Patent. large............... | 6 | 0 | 0 |
| Do. small................. | 4 | 8 | 0 |

LIBERAL COMMISSION TO WHOLESALE PURCHASERS AND AGENTS.

Wanted Agents at every post town. Can be had only.

H. NATHANIAL & CO.
*WHOLESALE MERCHANTS AND COMMISSION AGENTS.*
SEALDAH, CALCUTTA E. C.

Ask for "BROWN & MURRAYS" Stoves and take no other.

See that the Stoves you buy bear, our brass lable.

*Testimonials from the Reverends and others free on application.*

Best always cheapest.

ASHU'S POWDER.

Perfectly cures the habit of drinking spirits and wines, opium-smoking, indigestion, dyspepsia, &c, by use as per instructions on label. Rs. 3 As, 8 per phial. A. T. Mookerjee, Barnagore, *via* Calcutta. Wanted Agents.

THE GREAT ORIENTAL MEDICAMENTUM.
DR. G. B. SHAW'S SAMARITAN DROPS

Rouses and developes the nervous energies, strengthens and regulates the omach, bladder, kidneys, lungs and liver, and is highly recommended and prized as a sovereign remedy for the following maladies:-

Asthma, Shortness of breath, Coughs, Dropsy, Worms, Gravel, Chronic evers, Liver complaint, Palpitation of the heart, Giddiness, Nervousness, Headache, Internal Sores, Phosphatic deposits and mucus in the urine, Gonorrhæa, Gleet, Fluor albus, Ulceration of the bowels, Chronic inflammation of the bladder, Catarrh.

By external application Dr. G. B. Shaw's Samaritan Drops is invaluable for:-

Burns, Ulcers, Malignant Sores, Ringworms, Itches, Tetters, Chilblains. Paralysis, Leprosy, Rheumatism, Gout Syphilitic Sores, and skin diseases of the worst description.

*Full directions for use accompany every phial.*

Sold at Re. 1, Rs. 2, Rs. 3-8, Rs. 5-4 and Rs. 10 per phial, packing and postage As. 12. extra.

Wanted Agents, apply to

Barnagore Suburb of Calcutta *East Indies.* } A. T. Mookerjee *Proprietor.*

## जाहिरात.

विनयपूर्वक कळविण्यांत येत आहे कीं आकोलें येथें नारायण लक्ष्मण आणि कंपनी या नांवचें नवीन दुकान शहरांत वाशीम सडकेवर टौनपोलिस नजिक स्थापन झालें आहे. येथें कापड, स्टेशनरी वगैरे माल गिऱ्हाईकांचे पसंतीप्रमाणें एकच दरानें विकत मिळेल. या दुकानची प्रसिद्धि होण्यास व आश्रय मिळण्यास नम्रतेची विनंती आहे.
ता१८सपटंबर१८८६इ०
लक्ष्मण भास्कर
वकील
सेक्रेटरी.

## NOTICE

The undersigned begs to inform the residents of this station and the Mofussil, that a new shop, the proprietors of which are Narayen Luxman and Co., for the sale of cloths, stationery and oilman stores at fixed and moderate prices, has been opened in the town of Akola near the Police Station house on the road to Bassim, and solicits their kind patronage.

An inspection of the articles will convince the purchaser of their good quality and cheap prices over those obtained from other local shops.

Luxaman Bhasker.
Akola 24-8-86 Secretary

## जाहिरात.

[सिंदूरागिरी महात्म्य अथवा रामटेक वर्णन]

" षोडशाध्यायी; सप्तशतश्लोकी. "

वरील नांवाच्या ग्रंथांत श्री शंकरांनीं पार्वतीला रामक्षेत्र उर्फ रामटेक ह्या क्षेत्राचें व तीर्थांचें महात्म्य, त्याच्या स्थापनेचें मूळ कारण, तत्संबंधीं कथा भाग वगैरेचें वर्णन केलें आहे. अद्यापि हा ग्रंथ कोठेंही प्रसिद्ध झाला नाहीं. ह्यामुळें चांगल्या विद्वान् संस्कृतज्ञांच्या सहाय्यानें आम्ही ह्या ग्रंथाचें प्राकृत भाषांतर करवून तें मूळासह छापविण्यास सुरवात केली आहे. ह्या प्रांतांत व वऱ्हाडांत रामक्षेत्राचें महात्म्य सुप्रसिद्ध आहे व पुष्कळ लोक भक्तिभावानें ह्या ठिकाणीं यात्रेच्या इच्छेनें येतात एतदर्थ आम्ही हा ग्रंथ छापण्याच्या कामाला हात घातला आहे. भाविक लोक आमच्या ह्या प्रयत्नास आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे.

ह्या ग्रंथाचीं एकंदर अदमासानें ८० पृष्टें डेमी षोडश पत्री सांच्याची होतील. पुस्तक पोथीच्या आकारानें छापलें जाईल. सर्व भाविक लोकांस हा ग्रंथ घेण्यास सुलभ पडावा म्हणून ह्याची किंमत अगाऊ देणारास आठ आणे, खात्री लायक सही देणारास दहा आणे व मागाहून बारा आणे टपाल खर्चासुद्धां पडेल. ५० प्रती घेणारास एक प्रत फुकट मिळेल. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. प्रथमतः थोड्याच प्रती काढविण्याचा विचार असल्यामुळें ग्राहक लोकांनीं पैसे अगाऊ भरण्याची तसेंच खात्रीलायक सह्या देण्याची त्वरा करावी. अगाऊ पैसे भरण्याची मुदत तारीख ३० सप्तंबर अखेर पर्यंत ठेवली आहे. पैसे भरणें ते खालीं सही करणाराकडे भरावे ह्या बदल पावती दिली जाईल कळावें.

त्रिंबक हरी जोशी.

नागपूर तारीख१८-८-८६ } म्यानेजर दंडधारी प्रे. नागपूर सिताबर्डी.

☞ ने पत्रकर्ते कृपाकरून ही जाहिरात आपलें पत्रीं निदान तीन वेळ तरी घेतील व पत्र आमचे कडे पाठवितील त्यास ह्या पुस्तकाची एक प्रत नजरकेली जाईल कळावें. ग्रंथ अक्टोंबर अखेर तयार होईल.

## स्त्री पुरुष तुलना

साहसी कोण? पुरुष किंवा स्त्रिया?

हा सुरस निबंध सौ० ताराबाई शिंदे यांनीं रचिला आहे. पुस्तकें पुणें येथें श्री शिवाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलठाणें येथील रा० रा० बापुजी हरी शिंदे हेड क्लार्क नि० डे० कमिशनर यांनकडेस-आकोलें यथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणे. पुस्तक घेणारांस टपाल हशील पडणार नाहीं पैसे पाठविणारानें वर्तावळ्या सुद्धां पाठवावें.

## तयार आहे.

## हिंदुधर्म शास्त्र-भाग १ व २

( दुसरी आवृत्ति )

नामदार रा. सा. वि. ना. मंडलीक सी.ए. स. आय्. यांचे.

किंमत ८ रुपये व हांशील आठ आणे पत्रें ( किंमतीसुद्धां ) ग्रंथकार यांस मुंबईस पाठवावीं.

सदरील पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीसाठीं ठेविलीं आहेत. व० स० कर्ते.

## नोटीस.

रा० रा० नैरामपुरी गुरू चंपतपुरी गोसावी रहाणार सोनाळे ता. जळगांव यांस खालीं सही करणार याजकडून देंण्यांत येतें कीं आमचे सोनाळे दुकानांत तुमचें खाते असून तुम्ही २५०० रुपयांचा जो गहाणाचा दस्तऐवज लिहून दिला आहे त्याजबद्दल कराराप्रमाणें आदाई तुम्हाकडून झाली नाहीं. तरी ही नोटीस पावल्या पासून ४ दिवसांचे आंत सदरहु दुकांनीं येऊन हिशेब करून हिशेबी चुकती बाकी करून द्यावी असें न केल्यास नोटीशीचे खर्चासह वसूल करण्याची तजवीज करणें भाग पडेल कळावें.ता० १ आगटोबर सन१८८६.

( सही ) रेणुकादास बळवंत जागिरदार दुकान सोनाळें.

## पत्रव्यवहार,

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

अकोला ता० १-१०-८६.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते.

येथील रेल्वे स्टेशनावर पाण्याची मोठी गैरसोय आहे. आकोलें हें वऱ्हाडांत मोठें शहर असून येथून निदान ४०० किंवा ५०० उतारूं लोक दररोज जातात व येतात. येथील उन्हाळा अतिशय कडक असतो व त्यामुळें पाण्याची गरज विशेष

लागतें, व गाडी स्टेशनावर येईपर्यंत पाणी मुळींच मिळत नाहीं; व गाडी आल्यावर ही पाणिवाला एकटा असल्या कारणानें तें सर्वांस मिळत नाहीं, व त्यामुळें लोकांस 'पाणी "पाणी' करीतच जावें लागतें उन्हाळ्यांत तर अतीशयच हाल होतात, ते प्रत्यक्ष अनुभवाखेरीज कळून यावयाचे नाहींत; तरी आमचे रेलवेचे दयाळु अधिकारी इकडे लक्ष देऊन जर पाण्याची हका हाक एखादी पाण्याची तोटी आणऊन बंद करितील तर लोकांवर फारच उपकार होतील. पाणी हें लोकांचे मुख्य जिवन आहे त्यां वाचून कांहीं नाहीं, व उन्हाळ्यांत तर त्याची गरज घटकोघटकीं लागते, असें असून त्याजविषयीं गैरसोय असणें हें फार वाईट आहे. बहुतेक स्टेशनावरून 'युरोपियन' लोकांकारितां मात्र पाण्याची सोय उत्तम असते. मग 'नेटीव्ह' लोकांविषयींच असा हलगरजीपणा कां? 'नेटीव्ह' लोक कांहीं चींचोके देत नाहींत पैसेच देतात असें जर आहे तर हा भेद कां?

खरें ह्मटले असतां 'नेटीव्ह' लोकांपासूनच 'कंपनीस' अतीशय फायदा होतो व नेटीव्ह लोकांवरच ह्यांचा व्यापार अवलंबून आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं, असें असतां इतक्या शुष्क व अत्यंत उपयोगीं अशा बाबीकडें लक्ष देखील न देणें हें कंपनीस लांछनस्पद नाहीं काय?

त्यांच प्रमाणें येथील थर्डक्लास वेटींगरूम ही फारच लहान व कोंदट आहे त्यामुळें एकाही उतारूस आंत बसतां अथवा निजतां येत नाहीं. आणि बाहेर उघड्यावर निजल्यास रात्रीं सामान चोरीस जाण्याची फारच भिती असते. आणि दिवसा ऊन असते. करीतां ती मोठी व खुलासेवार करण्याची तजवीज कंपनीचे अधिकाऱ्यांनीं करावी, कारण जवळ कांहीं इंतरावयास नसल्यास जमीनीवर व 'मातीत' सुद्धां बसण्याची पाळी येते. सेकंडक्लास व थर्डक्लास वेटींगरूममध्यें दसपटीचा अंतर दृष्टोस पडतो व भाड्यांत तर दुपटीचाच असतो. असें कां ? 'परंतु हे विचारावे कोणीं.'

कंपनीस उत्पन्न थर्डक्लास उतारू जवळूनच पुष्कळ आहे. करितां कंपनीचे दयाळू अधीकारी ह्या गोष्टीचा तावडतोब विचार करतील अशी फारफार अशा आहे. सेकंडक्लास वेटींग रूममध्यें हीं आलीकडे लाकडी पश्या मारलेलीं बाकें ठेवतात परंतु त्याज विषयीं आपणास फारशी पंचाईत नको कारण त्याजविषयीं बंदोबस्त एकादा बड्या साहेबानें मनावर घेतल्यावर सहज होणार आहे. आपणास काय ती गरीब लोकां विषयीं विनंती करणें आहे व तिचा योग्यविचार करणें ज्यांच्या स्वाधीनं आहे ते तो विचार लवकर करतील अशी खात्री आहे.

ह्या स्टेशनावर गरीब लोकांस धक्के खावे लागतात ह्या कडे स्टेशनचे लोकप्रीय अधिकारी यांनीं अवश्य लक्ष द्यावें. उतारूंच्या गाडीच्या वेळेस जर फालतु लोकांस प्लॅटफॉर्मवर उभे राहून द्यावयाचे नसेल तर ( ह्यांत पाटलोन व बूटवाले व गळून कारण त्यांस कोठें ही जाण्याची परवानगी आहे असें दिसतें, त्या लोकास अगोदर च आंत येऊन कशास द्यावें. त्यांस आंत न येऊ दिल्यास शेकडों लोकांचे देखत धक्के खाण्याचा प्रसंगच येणार नाहीं. येथील रेलवे शिपायास सामोपचार हा माहीतच नाहीं; व धक्के व शिव्या देणें ह्याची त्यांत कांहींच शंका येत नाहीं. ह्या बद्दल स्टेशन अधिकाऱ्यांचा दोष नसेल, कारण घाईमुळें हा प्रकार त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येतही नसेल. परंतु त्यांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावे व योग्य व्यवस्था करावी. आमचे स्टेशन अधिकारी लोक प्रिय आहेत व ते ह्या गोष्टीचा विचार करतीलच. असो. एडीटरराव! पत्रविस्ताराची माफी असावी व अर्धचंद्र न दाखवावा.

आपला

एकश

---

नोटीस.

प्रंजाब नादारी मुकदमा नंबर. १४

सन १८८६ इ०

नमुना. ( जी.)

विद्यमान नादारी कोर्ट जिल्हा आकोलें यांचे कोर्टांतूनसर्वलोकांस प्रसिद्ध करण्या साठीं कळविण्यांत येतें कीं, भाईलाल शिखबदास राहणार बाळापुर जी अकोले हा नादार आहे असा आज तारीख २८ माहे सप्टेंबर सन १८८६ ईसवी रोजी ठराव जाहला आहे आणि तारीख ९ माहे नवेंबर सन १८८६ हा दिवस नादारच्या सावकारांनीं जमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकारितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं या बद्दल आठ आण्याचे ष्टांप कागदावर लिहून त्या आर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि याबद्दल ज्यास साक्षीं, समन्तें करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नावें दाखल करावी. ही नोटीस नेमण्याकारितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस पूर्वी तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकारितां नादारांनें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदणें असतील त्यांनीं आठ आण्याचे ष्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकिकत लिहून द्यावी व ते दावे खरें असले बद्दलचा प्रतिज्ञा लखे लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

२ जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांणीं आठ आण्याच्या ष्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या ज्यूडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टर दाखल होतील. ता. २८।९।८६. इ०

Mahomad Yasinkhan

उपडुज्ज

---

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुद्ध ७ शके १८०८

## धंदे व कला शिकविण्या-संबंधीं मुंबई सरकारचा ठराव.

[ मागील अंकावरून पुढें चालूं. ]

हल्लीं हिंदुस्थानांत यांत्रिक विद्येचा प्रसार होणें हें अगदीं अवश्य झालें आहे. या देशांतील लोकांची ( विशेषतः ब्राह्मण आदीकरून सत्वस्थ जातींचें ) स्वधर्माकडे व पारमार्थिक गोष्टीकडेंच विशेष लक्ष असल्यामुळें जगांतलि गोष्टीतुच्छ वाटून त्यांचे संबंधानें विशेष खटपट ही नसे. देशांत अन्न विपुल असल्यामुळें खाण्यास कमी कधींही नव्हतें व त्यामुळेंच विशेष खटपट करण्याचें ही काम नव्हतें. ही धर्मरतता जिकडें पहावें तिकडें आमचे लोकांचे आड येत आहे. सत्ववृति इतकी हाडामासांत खिळली आहे कीं, ती नाहींशीं करण्यास बरीच शतकें अद्याप गेली पाहिजेत. हिंदुस्थानांतलि सुधारणेची एकंदर इमारत युरोप खंडांतील सुधारणेहून फार भिन्न तऱ्हेची असल्यामुळें ह्या दोन्ही प्रकारच्या सुधारणांची तुलना करणें थोडेसे कठीण आहे, परंतु हिंदुस्थानांतील सुधारणेंचा ओघ इंग्रजी आल्यामुळें फिरून या देशावर एक चमत्कारीक तऱ्हेचा डौल आला आहे. ज्या गोष्टी पूर्वीं पुरेशा होत होत्या त्या आज कमिशा वाटूं लागल्या आहेत व पूर्वींच्यांत व आताच्यांत पुष्कळ फरक करणें अगदीं भाग होत चाललें आहे. युरोप खंडांतील एका राष्ट्राचा आपल्याशी संबंध पडल्यामुळें एथील सुधारणेंचा ओघ सबंध फिरविण्याची अवश्यकता दिवसेंदिवस स्पष्ट होत चालली आहे. आपला जीव व आपला देश आपणास प्रिय आहे तर हल्लींच्या मन्वंतरास अनुलक्षून आपल्या सर्व व्यवहारांत आपणास बदल करावा लागणार आहे. जणुकाय विलायतेंतील सुधारणा हिंदुस्थानांतील सुधारणेस पुढें ढकलीत चालली आहे असा प्रकार प्रत्यहीं आपले नजरेस येतो. वीलायतेचे सार्वभौम व मोठेपणा आज ज्या पुष्कळ गोष्टीमुळें आहे त्यापैकीं तेथील यांत्रीक कलेचा प्रसारही होय. म्हणूनच जर या देशाने कधीं काळी तरी इतर देशांची बरोबरी करून त्यांच्याशी टक्कर मारण्यापुरतें या देशाचे आंगीं सामर्थ्य यावें अशीं ज्याची इच्छा असेल त्यानें यांत्रीक कलेचा प्रसार कोणत्या प्रकारांनी होईल या वीषयीं चींता करून त्या संबंधाने खटपट करणें अगदीं रास्त आहे.

खरोखर पाहिले असतां या कामांत सरकारचा फारसा संबंध नाहीं ह्मणजे ही लोकांचे स्वतःचें सुवृद्धीची असल्यामुळें सरकारनें विशेष काळजी न घेतां देखील वृद्धिंगत व्हावी अशी आहे. परंतु सरकारचें अंग यांत असल्यास दुधांत साखर पडल्या प्रमाणें आहे. हल्लींच्या ठरावावरून मुंबई इलाख्यांत बहुतेक सर्व ठिकाणीं या संबंधानें थोडी बहुत तरी चळवळ सुरू होईल अशी अशा आहे.

मुंबई सरकाराने सदर्हु विषयाचे एकंदर तीन भाग केले आहेत. पहिला भाग शेतकी संबंधी, दुसरा कलाकौशल्या संबंधी. हल्लीं पुण्यास जी शेतकीची शाळा आहे तो नव्या पध्दतीचा स्तंभ समजावा. त्यांतच शेतकी संबंधानें शिक्षण देऊन त्यांत परिक्षा वगैरे ठेवण्याविषयीं विचार सरकार करतील. कलाकौशल्याचे संबंधानें हल्लीं मुंबईस जी कलाकौशल्याची शाळा आहे तीच मुख्य कल्पिली जाईल. कलाकौशल्यांत वाढविण्या विषयीं उपाय कायकाय करावें या विषयीं विचार ग्राफिन साहेब ह्मणजे कलाकौशल्याचे शाळेचे हल्लीचे अध्यक्ष यांजकडे सोपविण्याचा आहे. तिसरा भाग यांत्रिक कलासंबंधी. यांत्रिक कला शिकविण्या करितां कांहीं शाळा काढून त्या शाळातून विद्यार्थी व्यवहारोपयोगी यांत्रिक करण्या जोगे तयार करण्याचे आहेत. व हल्लीं धंदे करींत असणारे लोकांस ही कामापुरते शिक्षण मिळण्या करितां वर्ग काढण्याचें आहेत. जागजागी हायस्कुलांतून 'सायन्स' अनुभवशीर रितीनें शिकविण्याची सोय करून तेथून कोणत्या मुलांची यांत्रिक कामाकडे वगैरे विशेष बुद्धी चालते हे पाहाण्याचें वऱ्हाडचे संबंधाने पाहूं गेले असता ह्या ठीकाणि आज शेतकीचे संबंधाने वीचार केलाच पाहीजे असें प्रथम दृष्टींनें दीसत नाहीं. कारण वऱ्हाडची जमीन सुपकि असून बहूतेक जमिनी वीस वर्षे सुध्धा वाहिलेल्या नाहीत या मुळें पीक भरपूर येते. परंतु आज पीक भरपुर येते म्हणोन पुढें ही या प्रमाणें येईल कींवा आज जे पींक येत आहे त्या पेक्षांही उतम पीक शेतकी जास्त सुधारल्याने येणार नाही असे म्हणतां येत नाही. मिस्तर ओझानी हे मुंबई ईलाख्यात. शेतकीचे डायरेक्टर आहेत. व शेतकीत त्यांचे लक्ष ही बरेच आहे त्याप्रमाणेंच वऱ्हाडात कापुस व गहूं या संबंधीं काही प्रयोग मासल्यासाटी केल्यास फार बरें होणार आहे ववऱ्हाड व नागपूर प्रांत या दोघे मिळून गहूं, तांदूळ कापुस व जवस होतात. या धान्याचे पीक जास्त उत्पन्न होण्याचें संबंधाने खटपट करून कांहीं शेते मासल्यासाठी तयार केल्यास फार फायदेशीर होणार आहे. शिवाय वऱ्हाडातील शेती सुधारण्यास विशेष सोपें आहे असें आम्हास वाटते. येक तर ईकडील कुळंबी हल्ली जामिनीचे उत्पन्नाचे मानाने पाहील तर बरेच सुखी आहेत व या मुळे त्यांचे पाशी शेतींच सुधार णेकडे लावण्यास त्यांचे पाशी सापडण्यास फार अडचण पडणार नाही.

पुढें चालूं

The Berar Samachar

MONDAY 4 OCTOBER 1886

## HINDU SOCIAL REFORM.

Mr Behramji. M. Malbari the author of the notes on "infant marriage and enforced widowhood" has agitated the minds of the orthodox Hindus and shaken the frame-work of their hereditary beliefs and notions to their very foundations; by his sincere but ill-advised efforts, to effect a social reform among the Hindoos. His efforts as a reformer, have, no doubt, succeeded, in awakening the minds of the educated native community to the gross absurdity of the practices of infant marriage and enforced widowhood. Mr. Malbari a parsee gentleman being imperfectly acquainted with the inner feelings and workings of Hindu society has naturally magnified the real extent of the evil, exaggerated its grossness and thus, overdrawn the whole picture. The native community have no reason whatsoever to resent his procedure and consider him with enemical feelings, as the exposer of their weak points. They should, on the contrary thank him for his generous and gratuitous efforts he has made to impress on the minds of the educated natives the necessity of reforming their old and time-worn social fabric and of placing it on a firmer basis of strong reason and sound morality. He has unsparingly exerted himself to look into the old shastras and cullout such passages as condemn the practices under consideration. In short he has done as much as an outside reformer could have done. Apart from these considerations, the literary crusade carried on by Mr. Malbari with the enthusiasm of a true christian reformer against the social abuses of the Hindoos has done an amount of incidental good which can never adequately expressed in words. He has tried his best to elicit the opinions of the best lawyers, judges, professors and of those whose opinions can be looked up to as an authority on Indian affairs in connection with this subject. Among them we read the names of Principal Wordsworth, Justices West and Scott, the honorable Messers Mandlic, Telang and Tayabji & other literary worthies whose contributions on this subject derive a peculiar interest from the important consideration that they throw conspicuous light on the social economy of the Hindoos. They have brought their learning and information regarding Hindoo society to bear upon these problems and have made the subject both interesting and instructive. They have defined the limit within which reformers like Mr. Malbari should carry their efforts and pointed out the probability of danger in case their over zeal out-runs the limit. They have in their writings, put forth some suggestions as to the direction in which Hindoo reformers should move in the cause of social reform.

The remedial measures proposed by Mr. Malbari to counteract the influence of this social disease are such as do not suit the constitution of the Hindoo community. Hindoo society is mainly regulated by religion. All their customs and usages have their origin in religion. So in considering the problem of social reform among the Hindoos, we must not leave out of account, the main point that any reform which is to be inaugerated, in their existing customs and usages which are for the most part grounded on religion should be instituted with the full sanction of their religion. Any thing which will interfere with their religious notions is sure to retard the cause of reform. There are several customs of purely social significance that might afford ample facilities for reform. The present marriage system which prevails among the Hindoos cannot be considered of the above nature, but is highly religious in its character. The least effort therefore to effect any change therein is sure to be attended with serious danger and will, in the end produce social disturbances of worst description. It, therefore seems inexpedient for government to interfere with the customs and usages of a purely religious nature. This view has been considerably strengthened by the assurance which Lord Reay has lately given to the Shastrees and Sardars at a recent conference held at Poona. He is reported to have said on the occasion that neither the Government of India nor the local Government have contemplated any legislation on the subject of Hindoo marriage system. Moreover the Hindoo widow-remarriage act passed some years ago, furnishes adequate protection of law to widow-remarriages and the statute of legitimacy to the offspring of widows.

Legislative coercion in religious and social matters seems to be incompatable with the declared policy of the British Government. Noninterference with religion, is said to be the fundamental maxim laid down by them in the administration of British. India Students of Indian History, who have thought over the political disasters of 1807 and 1857 might very readily perceive that a very slight deviation from this rule of Government may give rise to serious consequances. Besides religious and social reforms, can only be permanently instituted by persuasion and not by coercion. Mr. Malbari. being blinded by his over zeal did not consider properly the suitability of the means to be adopted to the end proposed. He did not seem to have a clear notion of the seriousness and danger of legislative coercion. He ought to have at first consulted the common mass of Hindoo community and then brought forward his speculative theories of Hindoo Social reform. Mr. Malbari has laboured hard though in a misconceived direction to thrust his ideas of reform on a mass of people whose religious notions have proved an insurrmountable barrier against these visionary schems of reform. Discredited by the community and repudiated by the Government. Mr. Malbari should now quit the field and leave the work of reform in the hands of those who, by their position and education, are best qualified to discharge it. The fact that people are not, at all, inclined to accept his ideas of marriage reform is clearly evidenced by the monstrous meeting lately held at Madhavabag in Bombay under the presidency of the Honorable Mr. Mandlic to protest against legislative interference. The leaders of the community will, we strongly believe, take up in right earnest what Mr. Malbari has wrongly conceived and half executed.

---

There is a proposal before the Bombay Syndicate to do away with the English oral part of the Matriculation Examination. The ground put forth is that it causes much inconvenience to the mofussil students they being detained thereby for days together after their written examination is over and that it entails much needless expenditure as English examiners have to be paid for a longer period on that account, certainly these evils are to be deplored and it is the duty of the Syndicate to lessen them if possible but certainly not by curtailing the efficiency of the examination as the proposed step would lead them to do. The advantages of the present system are so many that the evils are a mere trifle.

No sensible man will deny that good pronunication and good accent is a valuable thing in learning a language and the only place where they can be properly and efficiently attended to, as far as English is concerned, at least for the present in India, is the High school. Colleges may give a finpt healthy touch to it, but cannot do much in that respect without neglecting more important things. In case the proposal above referred to, be sanctioned, English reading will be practically almost excluded from Highschools, the only place for it from top to bottom. High school Masters naturally use their tactics in preparing boys for the Matriculation with their sole eye on the requirements of the examination success in which is the measure of their work. To understand this question practically, let us turn to the Central provinces, which are educationally affiliated to the Calcutta University which does not subject the candidates for the examination like Bombay, to the oral test.

The Principal of the Morris College at Nagpur is reported to have complained the other day that much of the daily time was taken up by English Reading, wich was so grievously defective. Where should we seek for the reason of this defect but in the want of the application of an English oral test to the Entrance Examination Candidates?

English oral test has its own uses like a written one, neither of which can supplant the other without a serious injury. It is the only way to ascertain the nerve and the readiness of students. It is only by means of it that it can be known how far the students have mastered colloquial English; a point not to be despised considering the fact that many of the candidates are shortly to take to earn their bread on the strength of their English knowledge and that those that pass and wish for Liberal education have to do with Englishmen as their professors. The Syndicate will, therefore, calmly consider twice before taking any steps likely to detract from the utility of the English oral examination which can be advantagiously introduced where it is not.

---

Mr. Vishnu Moreshwar Mahajani M. A. Educational Inspector has examined the Anglo-vernacular School at Akola and intends examining the Anglo-vernacular at Malkapoor to day.

---

We hear that the Director of Public Instruction has received a telegram from Mr. Aitkin, the head master of the Akola High School to the effect that he has returned from his furlough and soon intends to join his appointment.

---

We are glad to hear that Mr. Raghunath Balkrisha Talvalker B. A. officiating head master of the Amraoti High School has been recommended by the D. P. I. to the Local Government to be confirmed in his present appoittment.

---

### ACKNOWLEDGEMENT

We beg to acknowledge with thanks the receipt of the following.

Report on the Revenue administration of the H. A. D. for 1886.

---

## वऱ्हाड.

हवामान—गेल्या आठवड्यांत पावसानें बहार करून सोडली. आणखींही पडण्याचा संभव आहे. आतां पावसाबद्दल बहुत करून कोणाची कुरकूर राहणार नाहीं असें वाटतें. हवेंत गारवा नाहीं. रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

यंदा हिंदूचा दसऱ्याचा व मुसलमानांचा मोहरमचा सण एकेच वेळीं आला आहे तेव्हां तंटा बखेडा न होईल अशा प्रकारची व्यवस्था मागील साला प्रमाणें पोलीस आधिकारी ठेवतील अशी उमेद आहे.

आकोटाहून वाशिमास जाणाऱ्या मोठ्या रस्त्याचा गांवांतील भाग इतका वाईट झाला आहे कीं पावसाळ्यांतच पुलावर गुलाल उडावयास लागला आहे. हा रस्ता प. व. खात्याचा आहे तेव्हां तिकडील आधिकाऱ्यांनीं याकडे लक्ष द्यावें अशी सूचना आहे.

मि. विष्णू मोरेश्वर माहाजनी ए. ई. हे येथील शाळेची परीक्षा संपवून काल रोजीं मलकापुरास गेले.

मि. आरदेसर दिनसाजी ए. आ. यांनीं तीन महिन्यांचे रजेकरितां अर्ज केला आहे व त्यांचे जागेवर मि. किंग साहेब हेडक्लार्क यांना नेमण्या बद्दल येथून शिफारस झाली आहे परंतु त्यांस न नेमतां मि. वासुदेवराव पिसोळकर यांस नेमणार असें कळतें.

जळगांव येथील स. रजिस्ट्रार रा. नारायणराव व तेथील उमेदवार रा. गोविंद पुरूषोत्तम ह्या दोघांवर दस्तायवजांत खोडतोड केल्याचे आरोपा वरून येथील डि. मा. पुढें फौजदारी मोकद्दमा चालू आहे.

रा. मुकूंद यशवंत स. रजिस्ट्रार आकोट यांचा पगार पांच रुपये कमी करून उमरावतीस डि. र. चे क्लार्क नेमले व त्यांचे कारकूनाचाही पगार तीन रुपये कमी केला. पहिले गृहस्थास तर थोडकेच दिवसांपूर्वी वरील बढतीची जागा मिळाली होती. असें करण्याचें कारण कळलें नाहीं-

बनसीलाल याचा मोकदमा ता. १६ पावेतों तहकूब ठेविला आहे.

---

## वर्तमानसार.

Per annum in advance 5 Postage 15 ...
... 7 " 1R. 8 as



अल्हाबादेस परवां एक मोठी मौजच झाली. एक दक्षणी इंग्रजी शिकलेला गृहस्थ सेकंड क्लासांतून प्रवास करणारा विसावा खाण्याकरितां तेथील स्टेशनच्या वेटिंगरूम मध्यें बसला होता. तेथें एक गोरी सभ्य बाई बसली होती. इतक्यांत दुसरी एक गोरी तिची सोबतीण येऊन तिणें हिला बाहेर बोलाविलें, पण ही बाहेर न जातां आपल्या सोबतिणीसच तिनें त्या जाग्यांत आणलें. दोघींही आपआपल्यांत विनोद करीत होत्या व मध्यंतरी या नेटिव गृहस्थाशींही बोलत होत्या. इतक्यांत दोघींपैकीं एकीचे यजमान तेथें आले. व त्यांनीं या नेटिव गृहस्थास कांहीं कमजास्त बोलण्याची सुरवात केली. हा नेटिव गृहस्थ चांगला विद्वान व युरोपियन लोकांत वागलेला असल्यामुळें दुसऱ्या कित्येक युरोपियनांच्या देखत त्यानें या गोऱ्या गृहस्थाची बरीच कानउघडणी करून त्यास गप्प केलें. पुढें त्या गोऱ्या गृहस्थानें आपल्या रूपवतीवर ताशेर झाडला. मग काय विचारावें? ती कां आमच्या बायकासारखी आशिक्षित आहे. त्या विदुषी बाईनें लागलीच उत्तर दिलें कीं, फार बोलण्याची जरूर नाहीं, तूं मला पोसतोस असाही अर्थ नाहीं माझे पैसे यथास्थित आहेत. काळ्या गृहस्था शेजारीं बसलें ह्मणून कांहीं वाईट गोष्ट केली असा अर्थ नाहीं. मान विद्येला आहे मनुष्यास नाहीं. हा काळा खरा, पण अति विद्वान दिसतो व ह्मणूनच मी यांशीं बोलत बसलें. तुला ज्या अर्थी माझे बद्दल शंका आली आहे त्या अर्थी तुमचें आमचें आतां पटणें नाहीं. सोडचिठ्ठीची तजवीन करावी! हें भाषण ऐकल्या बरोबर त्या गोऱ्या गृहस्थाचा चेहरा खरकन उतरला. इतक्यांत गाडीची वेळ झाल्यामुळें सर्वजण गाडींत जाऊन बसले. पुढें सदर युरोपियन गृहस्थानें एक नवी युक्ति काढली. दुसरी मेमसाब तेथें होती. तिचा नवरा या नेटिवाचा वरिष्ठ होता. हिची या नेटिवानें थट्टा केली ह्मणून याणें तिच्या नवऱ्यास कळविलें. नवऱ्यानें सांगितलें कीं, माझी बायको तशी नाहीं व तो गृहस्थही तसा नाहीं, शिवाय या उभयतांचे गुरुशिष्याचें नातें आहे. तुमच्या मनांत इलबर्टबिल अजून घोळत असल्यामुळें तुह्मी असें ह्मणतां! हें ऐकल्या बरोबर याचे हातपाय अगदींच गळाले. शिवाय स्वपत्नीनें संबंध तोडण्याची फिर्याद आणली ती निराळीच! पु. वै.

थोड्या दिवसांपूर्वीं तीन हिंदुस्त्रिया बंगाल ईस्टर्न रेल्वेनें प्रवास करीत होत्या. त्यांपैकीं एक विधवा असून तिचें वय सुमारें २५।२६ वर्षांचें होतें. गाडी 'चुदंगा' स्टेशनावर उभी राहिल्या नंतर स्टेशनमास्तर व दुसरे कामदार आपल्या कामांत गुंतले आहेत असें पाहून सिनलर नांवाच्या रेल्वे गार्डानें ह्या तीन स्त्रियांस आपल्या जवळील डब्यांत बसण्यास सांगितलें. ह्या स्त्रियांनीं त्या रेल्वे गार्डास कोणी बडा साहेब समजून त्याचा हुकूम मानला. पुढें गाडी स्टेशनांतून निघाल्या बरोबर तो गार्ड त्या स्त्रियांस कांहीं बिभत्स खुणा करूं लागला. गार्ड साहेबांची त्यां स्त्रियांपैकीं त्या तरुण विधवेवर विशेष नजर होती. पुढें दोन तीन स्टेशनें गेल्यानंतर गार्ड साहेब कामानें अगदीं विव्हल होऊन गेले व पुढें त्यांचा सर्व विचार सुटला. त्या नराधमानें आपला दुष्ट हेतु साधण्याकरितां गाडी सुरूं असतां मोठ्या शिताफीनें त्या स्त्रियांच्या डब्यामध्यें प्रवेश केला. कामातुर झालेला तो नर पशु अगदीं सन्निध येऊन ठेपलासें पाहून त्या स्त्रिया अगदीं घाबरून गेल्या. पुढें तो दुष्ट त्या विधवेस येऊन धरणार ती तिनें गाडी भरधांव असतां गाडीच्या बाहेर उडी घेतली. ह्या प्रमाणें आपला हेतु फसलासें पाहून तो दुष्ट गार्ड रागानें जळफळत आपल्या डब्यांत परत गेला. पुढें गाडी परोटा स्टेशनावर पोहोंचल्या नंतर नेटिव्ह गार्डानें झालेली सर्व हकीकत स्टेशन मास्तर यांस सांगितलें. त्या स्टेशन मास्तरानें त्या बाईची काय आवस्था झाली आहे ह्याचा तपास करण्या करितां कांहीं लोक तावडतोब रवाना केले. ती बाई मृतप्राय होऊन पडलेली सांपडली. पुढें कांहीं वेळानें ती बाई शुद्धीवर आल्यावर तिचें तोंडांतून पहिले शद्ब निघालें ते हेः—

'इंग्लिश राज्यामध्यें असा जुलूम आणि असा अनाचारना"!! आतां दुःखांत सुखाची गोष्ट येवढीच कीं त्या नराधम गार्डास पकडले असून त्याजवर खटला सुरू आहे. रेल्वे अधिकारी ह्या कामीं योग्य न्याय करून त्या पशुतुल्य गार्डास चांगलें योग्य शासन करतील अशी आह्मास मोठी आशा आहे.

अशा प्रकारे पातिव्रत्याचें रक्षण करण्या करितां आपले जीविताचा ही घात करणाऱ्या स्त्रिया जगामध्यें दुसरें कोठें तरी सांपडतील काय? हिंदु स्त्रियांच्या आंगीं युरोपियन स्त्रियांची विद्वत्ता, टापटीप व नखरा वगैरे गोष्टी नाहींत ही गोष्ट आह्मी ही कबूल करितों. नवऱ्याच्या हातांत हात घालून सभा थाटण्याचें काम त्यांच्यानें व्हावयाचें नाहीं ही गोष्टही अगदीं खरी आहे. परपुरुषांचा स्पर्श होणें किंवा त्याच्याशीं भाषण करणें ह्मणजे हिंदुस्त्रियांस मोठें कठीण वाटावें हें कांहींसें चमत्कारिक दिसतें खरें, परंतु आमच्या समाजामध्यें स्त्रियांच्या संबंधानें जे कांहीं अशा प्रकारचे निर्बंध आहेत त्यांच्यामुळेंच पातिव्रत्याचा भंग झाला ह्मणजे आपले सर्व कांहीं गेलें अशी त्यांची अजूनही दृढ समजूत राहिली आहे. हे निर्बंध एकदां सुटले ह्मणजे आमच्या मध्येंही मिसेस क्राफर्ड बाईसारख्या स्त्रियांचा अगदीं सुकाळ उडून जाईल. ही गोष्ट आमच्या इंग्लिश रीतीच्या स्त्रीशिक्षणाविषयीं अतुर झालेल्या सुधारकांनीं आपल्या नीट लक्ष्यांत ठेवून त्यांनीं आपल्या सर्व सुधारणा चालवाव्या अशी त्यांस आमची सूचना आहे. ने. ओ.

ब्रह्मदेशाचा तर इंग्रज लोकांच्या व्यापार वगैरेच्या स्वार्थाकरितां सर्व प्रकारें नाश होणार यांत संशय नाहीं; परंतु आमच्या देशाचें व लोकांचें विनाकारण अत्यंत नुकसान होत आहे. आमच्या देशाचे शिपाई लोक जानारवुणगे, जनावरें वगैरेंचा प्राण नाश होऊन पैशाचाही व्यर्थ खर्च होत आहे. इंग्रज लोकांचा हा एक मोठा दुर्गुण आहे कीं जेथें त्यांच्या देशाचें व त्यांच्या लोकांचें हित असेल तेथें ते आपला ख्रिस्तीधर्म, न्याय व सत्य यांजकडे पाहात नाहींत.

सारांश इंग्रज लोकांच्या राज्यकारभारांत असा अंधळ्या सारखा प्रकार आहे ही अत्यंत दुःखाची व अनिष्ट गोष्ट आहे. या अंधळेपणामुळें इंग्लिश राष्ट्रांवर काय व केवढा अनर्थ येईल याचा नेम लागत नाहीं. ऐरलंडावर जो आज सात आठशें वर्षें सारखा जुलूम व कहर होत आहे यास कारण हा स्वार्थाचा व कामगार लोकांवर निमूटपणें व विशेष शोध न करितां भरंवसा ठेवून चालण्याचा अंधळेपणाच आहे. हिंदुस्थानांत तर त्याचा रोजचा आमचा अनुभव आहेच. वरिष्ट अधिकाऱ्यांनीं व लोकांनीं आपल्या सरकारानें नेमिलेल्या कामगारांवर भरंवसा ठेवावा व इंग्रज लोकांनीं इंग्रज लोकांवर विश्वास ठेवावा हें ठकिच आहे व हेंच त्यांचें मोठालीं कामें चालण्याचें बीज आहे हें खरें; तथापि मनुष्य स्वभाव वाईट आहे हें ध्यानांत सदोदित वागवून त्यांच्या सांगण्याचा पडताळा पाहण्याचा प्रकार जारी असला पाहिजे. एरवी पुढें आलेल्या प्रकरणाच्या सर्व बाजू कळत नाहींत व त्याजमुळें अन्याय, अनर्थ व पाप होतें. हा विचार होत नसल्यामुळें आज ब्रह्मदेश व हिंदुस्थान या दोन देशांचें नुकसान होत असून सर्वत्र असंतोष व भय उत्पन्न होत आहे.

रशियास युरोपांतून मुसलमान राज्याचें मूळ खणून टाकून कान्स्टांटिनोपल घ्यावयाचें आहे; व दुसरें फ्रान्स देशास जर्मनीचा सूड उगवावयाचा आहे. या दोन हेतूनीं युरोपांत मोठा अनर्थ मांडला आहे. या शिवाय इतर राष्ट्रांचा स्वतांचा स्वतंत्र अर्थ युरोपांत साधावयाचा आहेच. तूर्त यूरोपांत तर अतिशय हालचाल व अस्वस्थता होऊन गेली आहे. परिणाम काय होईल याचें अनुमान आज कोणाच्यानें करवत नाहीं. मुख्य तीन राष्ट्रें जर्मनी, आस्ट्रिया व रशिया यांचें ऐक्य आज बरेंच दिवस आहे; परंतु त्यांतही आतां तिघांचा एक विचार दिसत नाहीं. टर्कीच्या संबंधानें बर्लिन येथें झालेला एकत्र तहनामा त्याचें पूर्णपणें उलंघन करण्याचा समय आला आहे व त्याजमुळें पुनः मारामारीचा प्रसंग येणार असें दिसतें. रशियानें आपल्या संप्रदायाप्रमाणें एशियांत हिंदुस्थानाकडे व युरोपांत टर्कीकडे अशीं दोहीकडे तोंडें लाविलीं आहेत. रशियाशीं विरुद्धपणा करावा तर फ्रान्स व रशिया एक होतील आणि फ्रान्सचा सूड उगविण्याच्या हेतूस हें उत्तेजन होईल असें समजून जर्मनी मागें घेत आहे. तथापि रशिया पुढें सरकला असतां जर्मनी आस्ट्रियास पुढें सरकविण्याचा विचार करीत आहे. फ्रान्सनें फौज वगैरेची तयारी केली आहे आणि केवळ प्रसंगाची व रशियाची दोस्ती संपादण्याची वाट पहात आहे. टर्की अर्थातच तयारी करीत आहे व प्रमुख राष्ट्रांस विनवण्या करीत फिरत आहे. इंग्लंड आपला लटपटीचा खेळ खेळत आहे. इटली मात्र अगदीं मुग्ध स्वस्थ आहेशी दिसते. स्पेनमध्यें देखील परवां नुक्ताच फौजेनें दंगा केला; सारांश सर्व युरोप अस्वस्थ होऊन केवळ ज्वालामुखी पर्वताप्रमाणें धुमसून आंत रस तयार झालेला आहे त्यास ऊत लवकरच येईल असें दिसत आहे. तो रसप्रवाह कोणीकडे वाहील, किती व कोणाचा नाश करील हें मात्र समजत नाहीं.

निजाम स्टेट रेल्वेकडील कितीएक गार्डांनीं कमी पगार म्हणून राजीनामे दिले असें म्हणतात.

मलबार प्रांतांतील नारळाच्या झाडांवर कर बसविल्या मुळें तिकडील लोक फार नाखुष झाले आहेत असें म्हणतात.

इंदूरचे प्रख्यात फोटोग्राफर लालादीन दयाळ यांस व्हाइसरॉय यांनीं नेमणूक करून देऊन आपल्या जवळ ठेविलें आहे.

अस्ट्रियामधील रेल्वेंत सुमारें ३००० स्त्रियां ३ पासून ५ पौंड पगारावर नोकर आहेत. या मुख्यत्वें करून जे लोक पूर्वीं त्या खात्यांत नोकर होते त्यांच्या विधवा आहेत.

बाबू पियारी मोहन मुकरजी यांस व्हाइसरायाच्या कायदेकौन्सिलचे सभासद नेमिलें.

आयर्लंडांतील केरीप्रांतांत सुमारें ३०० कुळांनां जमिनीवरून काढून टाकिलें असें म्हणतात.

सर जे. ई. गार्स्ट, हिंदुस्थानचे अंडर सेक्रेटरी हे आतां सुटीमध्यें हिंदुस्थानांत येणार आहेत असें समजतें.

बदकशान्स व अफगाण यांच्यामध्यें मारामारी आज पंधरा दिवस फैजाबाद येथें चालली आहे असें मर्व्हेच्या तारेवरून समजतें.

कुचबिहारचे महाराज आपल्या राज्यांत एक कालेज स्थापीत करणार आहेत असें समजतें.

आस्ट्रिया देशांत एकंदर लोकवस्ती सुमारें सव्वा दोन कोटींवर आहे आणि राज्याचें उत्पन्न पन्नास कोटीचें आहे. असें असतां या उत्पन्नांपैकीं एवढ्या प्रजेच्या हिताकारितां कलाकौशल्यें व किरकोळ धंदे शिकविण्यासाठीं तेथील सरकार पंचवीस लक्ष रु. खर्च करतें असें समजतें. हिंदुस्थानांत असें कांहीं आहे काय?

बर्मिंघम येथील म्युनिसिपालिटीच्या कला कौशल्ये शिकविण्याच्या शाळांत दोन हजार विद्यार्थी शिकत आहेत.

चमत्कारिक प्रकार—बटेवियाच्या जवळ रानांत दोन शिकारी गेले होते. तेथें त्यांस कांहीं चमत्कारिक गडबड व गुणगुण ऐकावयास आली. तिकडे ते जाऊन पाहतात तो एक्या मोठ्या सर्पानें एक्या वाघाच्या अंगास वेटाळे घालून त्याची मान आवळावयास तो पाहतो आहे व वाघ सर्पाची मान धरावयास पाहतो आहे अशी खटपट चाललेली त्यांणी पाहिली. पाहिल्यानें तर ते घाबरलेच; परंतु लागलीच दोघांनीं दोघांच्या मानांवर निशाणें धरून गोळ्या घातल्या व दोघांसही चांगल्या लागल्या. या गोळ्या त्यांणीं पंधरा पावलांवरून घातल्या असें समजतें. सु. प.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० रा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

सहामाही " ३ " " ८८
साल अखेर " ७ " " १८८
किरकोळ अंकास.................... ८४

Per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly........... 3 " 8 as
Single copy.............................. 4 as

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .......०१

Advertisements.
Below 10 lines...2rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERARSAMACHAR.

VOLXX AKOLA MONDAY 11 OCTOBER 1886 NO 40

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख ११ माहे अक्टोंबर सन १८८६ इ० अंक ४०



Look for our name.
Save your trouble! Save your trouble!
BROWN & MURRAY'S.
PORTABLE SCIENTIFIC COOKING STOVES

Require no oil, Require no spirit.
Useful Requisite for every household and Inestimable boon both to Rich and poor.

1 Charcoal Ball or 3 Charcoal Cakes. Will suffice for the Napolean Patent stove to prepare any 2 lbs. of the followings in 5 minutes *viz*, Tea, Coffee, Milk Sago, Arrowroot, Barley, &c.

2 Charcoal Cakes. 2 Charcoal Cakes 2 Charcoal Cakes. Will take for the Dick's Patent or Pocket Stove to prepare any 1 lb. of the following in 3 minutes--*viz*, Tea ,Coffee, Milk, Sago Arrowroot, Barley, &c.

1 Pice Charcoal. Ball or 1 lb. coal. Will be enough for the Tourist Patent stove to prepare any four of the following, in 30 minutes. *viz*, Rice, Curry, Cultet, Stew, Pudding, &c.

BROWN & MURRAY'S STOVES give rise to no disgusting smell and smoke as they are in general with other valuable Stoves. Their Stoves are perfect, most economy in Cookery, and require no setting of brickwork. They can be placed, in time of Cooking anywhere even on a Table, Sofa, Chair, &c., without the least fear of catching fire; and cooking can also safely be executed on a running car. BROWN & MURRAY'S STOVES are not only valuable helps to the INVALIDS and INFANTS for procuring HOT TEA and WARM MILK, but on the whole they are HAPPY PARTNERS to all sorts of men for the preservation of life.

| *Packing as. 4 postage extra.* | R. A p. |
|---|---|
| With direction each Napolean Patent........................ | 2 8 0 |
| Pocket Stove.............. | 3 8 0 |
| *Packing as. 6 Postage extra-* With direction, each, Tourist Patent. large.............. | 6 0 0 |
| Do. small.................. | 4 8 0 |

LIBERAL COMMISSION TO WHOLESALE PURCHASERS AND AGENTS.

Wanted Agents at every post town.
Can be had only.
H. NATHANIAL & CO.
*WHOLESALE MERCHANTS AND COMMISSION AGENTS.*
SEALDAH, CALCUTTA E. C.
Ask for "BROWN & MURRAYS" Stoves and take no other.

See that the Stoves you buy bear, our brass lable.

*Testimonials from the Reverends and others free on application.*

Best always cheapest.

ASHU'S POWDER.

Perfectly cures the habit of drinking spirits and wines, opium-smoking, indigestion, dyspepsia, &c, by use as per instructions on label. Rs. 3 As, 8 per phial. A. T. Mookerjee, Barnagore, *via* Calcutta. Wanted Agents.

THE GREAT ORIENTAL MEDICAMENTUM.
DR. G. B. SHAW'S SAMARITAN DROPES

Rouses and developes the nervous energies, strengthens and regulates the stomach, bladder, kidneys, lungs and liver, and is highly recommended and prized as a sovereign remedy for the following maladies:-

Asthma, Shortness of breath, Coughs, Dropsy, Worms, Gravel, Chronic evers, Liver complaint, Palpitation of the heart, Giddiness, Nervousness, Headache, Internal Sores, Phosphatic deposits and mucus in the urine, Gonorrhæa, Gleet, Fluor albus, Ulceration of the bowels, Chronic inflammation of the bladder, Catarrh.

By external application Dr. G. B. Shaw's Samaritan Drops is invaluable for:-

Burns, Ulcers, Malignant Sores, Ringworms, Itches, Tetters, Chilblains. Paralysis, Leprosy, Rheumatism, Gout Syphilitic Sores, and skin diseases of the worst description.

*Full directions for use accompany every phial.*

Sold at Re. 1, Rs. 2, Rs. 3-8, Rs. 5-4 and Rs. 10 per phial, packing and postage As. 12. extra.

Wanted Agents, apply to
Barnagore Suburb of Calcutta *East Indies.* — A. T. Mookerjee' *Proprietor.*


## नोटीस.

रा. रा. रामदत किसन दयाळ मारवाडी दुकान आकोट यास खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमची आमची भुसारि, किराणा, व वारदोन या सर्वांची मिळून दुकानदारी शराकतीनें केली होती. त्यास आज अजमासें चार वर्षे होत आले आहेत परंतु तुमचे आमचे न पटल्या मुळें गेल्या वैषाख माशीं तुम्हीं सर्व दुकान आटपून बसलात व मजला सांगितलें कीं हिशेब वगैरे करून आमची निमे हिश्याची रकमचुकती करून देतो. असें असून आज अजमासें सहा महिने जाहलें परंतु तुह्मी आद्याप पावेतो माझा कांहींएक निकाल केला नाहीं. या करितां ह्या नोटीसीनें असें कळवितों कीं, आमचे घेणें तुह्माकडेस येणें त्याचा तपशील खालीं लिहिलें प्रमाणें.

नफ्या बद्दल एकंदर रुपये १५०० अजमासें त्यांत आमचे हिश्शाचे ७५० रुपये पैकीं ७०० मजला पावलें असून बाकी येणें रुपये ५०.

२ दोन वर्षांचा एकल्याचा पोटगी खर्च रुपये २०० दोनशे दर वर्षास १०० प्रमाणें.

एकूण रुपये २५० दोनशे पन्नास आपल्याकडे आमचे येणें निघत आहे. ते रुपये ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत आदा करून निकाल करावा. नाहींतर अखेर निकाल होईपर्यंत व या नोटीसीचे खर्चासुद्धां कोर्टांत दावा करून सर्व नुकसान भरून घेतली जाईल. कळावें तारीख ९ माहे अक्टोबर सन १८८६ इ०.

( सही ) रामजस प्रसादीराम
दुकान आकोट दस्तुर
खुद.

## नोटीस

रा. रा. रामदत किसन दयाळ मारवाडी दुकान आकोट यास नोटीस देणार लादुराम रामजस रहाणार आकोट नोटीसीनें असें कळवितों कीं, आह्मी तुमचे दुकानांत नोकरीवर दरसाल रुपये १५१ एकशें एकावन घेऊन राहिलों व आमची सर्व नोकरी तुमचेपाशीं १७ महिनें नोकरी केली. त्या पैकीं तुह्मी मजला एक पै ही दिली नाहीं. या करितां तुह्मास ह्या नोटीसीनें असें कळवितों कीं नोटीस पावल्या पासून एक महिन्याचे आंत रुपये देऊन निकाल करावा. न केल्यास ह्या नोटीसीचें खर्चासुद्धां तुमचेवर कोर्टांत काम चालवून अखेर निकाल होईपर्यंत सर्व नुकसान वगैरे भरून घेतले जाईल. कळावें तारीख ९ माहे आक्टोबर सन १८८६ इ०.

( सही ) लादुराम रामजस दस्तुर
खुद.

## नोटीस.

पंजाब नादारी मुकद्दमा नंबर. १५
सन १८८६ इ०
नमुना. ( जी.)

विद्यमान नादारी कोर्ट जिल्हा आकोलें यांचे कोर्टांतून सर्व लोकांस प्रसिद्ध करण्या साठीं कळविण्यांत येतें कीं, पुंजाजी वल्लद उकर्डा सुतार राहणार पेठ अवरंगपूर हा नादार आहे असा आज तारीख २ माहे आक्टोंबर सन १८८६ ईसवी रोजीं ठराव जाहला आहे. आणि तारिख २५ माहे आक्टोंबर सन १८८६ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं या बद्दल आठ आण्याचे ष्टांप कागदावर लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि याबद्दल ज्यास साक्षीस समन्सें करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें दाखल करावीं. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस पूर्वीं तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे ष्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरें असले बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

२ जे सावकार दूरचे रहाणारे असां तील त्यांणीं आठ आण्याच्या ष्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या ज्यूडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टर दाखल होतील. ता. २।१०।८६. इ०

Mahomad Yasinkhan
उपडूज्ज

वऱ्हाडसमाचार

मित्ती आश्विन शुद्ध १४ शके १८०८

## महत्वाकांक्षा

३७ अंकावरून पुढेंचालूं.

पुष्कळ लोंकाना दुसऱ्यांची इच्छा भंग करण्यांत आणि इच्छित कार्या संबंधीं निराशा करण्यांत मोठी मौज वाटते. ह्मणून जेव्हां जेव्हां महत्वाकांक्षी मनुष्याच्या मनांत कीर्तीच्या प्राप्तीची उत्कट इच्छा दिसून येतें तेव्हां तेव्हां त्याची स्तुति ते बेतानेंच करितात; स्तुति करून त्याला संतोष देणें त्यांना बरें वाटत नाहीं; आणि त्यांच्या गुणाला योग्य ह्मणून त्याची स्तुति करावयाची असें न मानितां हा त्यावर आपला एक उपकार आहे असें ते मानितात; आणि ज्यांचा स्वभाव असा मूळचा हट्टी नसतो (कांहींकांचे स्वभाव जरी मूळचे हट्टी नसतात. ) ते स्तुतिप्रिय मनुष्याची स्तुति मोठ्या विचारानें करितात; कारण त्यांना असें वाटूं लागतें कीं ह्यामुळें आपणांत कांहीं तरी विशेष आहे असें याचे मनांत कदाचित् येऊन तो आपल्याशीं निकट संबंध ठेवण्याचें वर्ज करील.

ही कीर्तीच्या प्राप्तीची इच्छा मनुष्याला साहजीकच आपल्या नांवास कलंक लावणारीं अशीं नीच कृत्यें करण्यास लाविते. आपलीं कृत्यें कदाचित् अप्रसिद्ध राहून आपल्या गुणांची जगाला माहिती होणार नाहीं अथवा पूर्ण माहिती नसल्यामुळें इतर लोक आपल्या कृत्यांची जी चर्चा करितील ती पासून त्यांचें महत्वही कमी होईल अशी त्याला भीति असते; ह्मणून जिकडे तिकडे तो मिथ्याभिमान आणि प्रौढिल्य मिरवितो; आणि आपल्या कृत्यांचा गुणानुवाद करीत फिरतो. कशा-

विषयींही बोलणें चालले असो त्यांत तो दुसऱ्याचा कमीपणा दाखविल्या शिवाय अगर स्वतःची बढाई केल्या शिवाय रहातच नाहीं. मिथ्याभिमान हा महत्वाकांक्षी मनुष्यांत स्वाभाविक दुर्गुण असतोच; आणि हाच दुर्गुण तो ज्यांच्याशीं संभाषण करितो त्यांच्या मनांत गुप्त तिरस्कार आणि द्वेष उत्पन्न करण्याला आणि जी कीर्ति मिळविण्या करितां तो महा प्रयत्न करितो तिच्या नाशालाही कारणी भूत होतो. कारण जरी त्यांचीं कृत्यें इतकीं चांगलीं अगर इतक्या महत्वाची नसतात तरी आपल्या तोंडानें त्यांची स्तुति केल्या मुळें त्यांची योग्यता कमी होते; आणि स्तुतिपेक्षां निंदेकडेसच लोकांचा कल अधिक असल्यामुळें कृत कार्याचा विसर पडून गर्वोक्तीची मात्र निंदा होते.

शिवाय, कीर्तीच्या प्राप्तीची इच्छा सत्पुरुषांत असणें हें एक व्यंग आहे असें लोक मानितात. सत्पुरुषांचा महात्मा जगाच्या स्तुतीची अगर निंदेची परवा न बाळगितां त्यांच्या निरर्थक वल्गना पासून दूर रहातो. याच योगानें जे सत्पुरुष लोकांच्या चांगल्या वाईट अभिप्रायाकडे अगर स्तुति निंदेकडे लक्ष न देतां नेहमीं चांगलीं कामें करण्यांत निमग्न असतात त्यांच्या विषयीं आपल्या मनांत पूज्य बुद्धि उत्पन्न होते. परंतु जो कोणी केवळ कीर्ति करितांच एखादें सत्कृत्य करितो त्याची आह्मी निंदा करितो.

जगाचा असा साधारण अभिप्राय होण्याला कांहींच आधार नाहीं असें नाहीं. जें कृत्य मनुष्य जातीचें कल्याण करण्या करितां अगर ज्यानें आपल्याला उत्पन्न केलें त्याच्या गौरवा करितां निरिच्छ होऊन कधींही केलें नसतें तेंच कृत्य स्वार्थ बुद्धीनें करण्यास तयार होणें आणि कीर्तीच्या आशेनें करणें यांत खरोखर मोठासा पुरुषार्थ आहे असें नाहीं.

या प्रमाणें सर्वांच्या वाटेस कीर्ति येणें फार कठीण आहे; आणि मुख्यत्वें करून जे तिची फार इच्छा करितात त्यांना तर ती फारच दुःसाध्य आहे; कारण कीं एकतर बहुतेक लोक महत्वाकांक्षी लोकांचा पोकळ गर्व सहन करून घेण्या इतके सुशील अगर सुज्ञ नसतात; दुसरें कीर्तीच्या प्राप्तीची इच्छा असणें सत्पुरुषांत व्यंग गणिलें आहे; तिसरें ही इच्छा मनुष्याच्या नांवास कलंक लावणारीं अशीं नीच कृत्यें करण्यास लाविते.

कीर्ति फार लवकर नाश पावते. ती मिळविण्याला जितकी कठीण तितकीच राखून ठेवण्याला कठीण आहे. या विषयींचा विचार पुढील अंकांत होईल.

## वऱ्हाडांतील शाळाखात्याचा वार्षीक रिपोर्ट सन १८१५--८६.

( ३८ अंकावरून पुढें चालूं )

गेल्या रिपोर्टांतच अकोला ट्रेनिंग कालेजाची स्थिती असावी तसी समाधानकारक नव्हती व मि. नातू यांची त्या कालेजाच्या प्रिन्सिपालच्या जागीं नेमणूक झाल्या पासून त्या कालेजाची कांहीं अधिक सुधारणा होईल असें वाटत होतें परंतु यंदाच्या सालींही या कालेजाची तीच रड पाहून आम्हास फार वाईट वाटतें. सर्व प्रांतांतील खालच्या प्रतीच्या शाळांना पुरणारे शिक्षक या कालेजांत प्रतिवर्षीं तयार होत नसत ह्मणून मे. डायरेक्टर साहेबांची अकोला जिल्हा शिवाय करून बाकीच्या ५ जिल्ह्यांत पांच पांच विद्यार्थी शिक्षक दरमहा ४ रुपये पगाराचे नेमिले आहेत. या कालेजांतील मुख्य मराठी साईडचीच यंदा फार फजिती झाली. यंदाचा निकाल असा वाईट होण्याचें कारण मे. डायरेक्टर साहेब यांनीं जें दिलें आहे तें अगदीं निर्बल आहे. एकंदरींत पहातां यंदाच्या रिपोर्टांत सर्व शाळा खात्याला दोष लागण्या जोगें हेंच कार्य तें सदर आहे व या विषयीं आलीशान रेसिडेंट साहेब यांनीं आपलें रिपोर्टावर आपलें मत देतांना शेवटीं बोलूनही दाखविलें आहे.

या शिवाय प्रांतामध्यें हलक्या प्रतीच्या लोकाना शिक्षण देण्याच्या कांहीं शाळा आहेत परंतु त्यांना मिळावयाची मदत मिळत नसल्या कारणानें त्यांची स्थिती चांगलीशी नाहीं. सरकारनें मास्तर लोकाना वार्षीक परिक्षेच्या निकाला प्रमाणें फीच्या उत्पन्नांतून बक्षिसें देण्याचा परिपाठ ठेविल्या कारणानें आज शिक्षणास बरेंच उत्तेजन आलें खरें तथापि हें शिक्षण अद्याप हलक्या प्रतीच्या लोकांना मिळावें तसें मिळूं लागलें नाहीं. अशा प्रकारच्या ग्रॅाट्स इन एडच्या शाळा गुदस्तां ६ होत्या त्यांतून यंदा दोन मुन्सिपालिटीच्या ताब्यांत गेल्या एक सरकारी शाळा झाली व तीन ग्रॅाट्स इन एडवर अद्याप चालूं आहेत. या तीन शाळांपैकीं एक बुलठाण्यास एक उमरावतीस व एक हतरुणास आहे. ( ही शाळा मुलींची आहे ) त्या प्रमाणेंच अकोल्यास व. शा. विश्वनाथ नारायण शास्त्री दांडेकर नावाच्या एका परोपकारी गृहस्थानें एक बेडरस्कूल आज बरेंच दिवसां पासून स्थापन केलें आहे व यंदा एक गरीब लोकांच्या मुलां करितां शाळा घातली आहे. सदरहू गृहस्थाच्या परिश्रमाची व परोपकार बुद्धीची स्तुती करणें रास्त आहे कारण यांचा हा उद्योग केवळ निरपेक्ष बुद्धीनें चालला आहे असें ह्मणतात जेल मधील शाळांची स्थिती शोचनीय आहे. याचें कारण कैदी लोकांना शिक्षण देण्याला जितका वेळ नेमून दिलेला असतो तितका वेळ त्यांना शिकण्यास देत नाहींत व शिवाय शिकविणारे जे शिक्षक असतात त्यांजकडून दुसरीं कामें करून घेतात. इकडे अधिकाऱ्यांना चांगलें लक्ष द्यावें.

वऱ्हाडांतून युनिव्हर सिटीचें शिक्षण मिळविण्या करितां जे विद्यार्थी जातात त्यांची संख्या ८४-८५ सालांत ९ होती ती यंदा ७ कां झाली समजत नाहीं. बहुत करून याचें कारण वऱ्हाडांतील स्कालरशिप संबंधानें मे. डायरेक्टर साहेबांनीं केलेले नवीन कडक नियम असतील. इतके दिवस वऱ्हाडी विद्यार्थ्यांला मॅट्रीक्युलेशन पास होऊन कालेजांत गेला ह्मणजे तीन वर्षें पर्यंत दरमहा २० रुपयाचा उपभोग चैनीनें घेतां येत असें मग तो आपल्या पुढल्या परिक्षा पास होवो किंवा न होवो या नवीन नियमांच्या योगानें फक्त अभ्यास करणारे व मेहनती विद्यार्थी कालेजांत टिकतील यांत संशय नाहीं. या सात विद्यार्थ्यांपैकीं १ सेकंड बि. ए. १ फर्स्ट बि.ए. व तीन पि. इ. पास झाले. पी. इ. पास झालेल्या तीन विद्यार्थ्यांपैकीं मि. सैफुद्दीन पठाण हे संस्कृतांत पास होऊन शिवाय यांना मुंबई युनिव्हरसीटीची सर फ्रांक सूटर स्कालरशिप मिळाली आहे. मे. डायरेक्टर साहेबांनीं या विद्यार्थ्याचें नांव आपल्या रिपोर्टांत प्रमुख रीतीनें पुढें आणिलें आहे. हे गृहस्थ युनिव्हरसिटी मध्यें इतक्या रीतीनें नावारूपास येऊन एक वर्ष झालें नाहीं तोंच त्यांना, साधन असतां युनिव्हरसिटीचा इतका कंटाळा कां आला समजत नाहीं. हल्लीं या गृहस्थानीं येवतमाळ जिल्ह्यांत डेप्युटी कमिशनर साहेबांच्या डेप्युटी क्लार्कचें काम पत करिलें आहे. या शिवाय ज्यांना स्कालरशिप नाहीं असे ही आणखी कांहीं वऱ्हाडांतलि विद्यार्थी कालेजांत शिकत आहेत परंतु त्यांची संख्या मे. डायरेक्टर साहेबांनीं दिली नाहीं.

( पुढें चालेल. )

---

आह्मास लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें कीं इकडील माजी प्रसिद्ध क्लार्क आफदी कोर्ट व हल्लीं बडोदे संस्थानांतील अ० कमिशनर रा. रा. माधवराव हरी सहस्त्रबुद्धे यांनां त्यांचे हाताच्या बोटास कांहीं तार टोचल्याचें निमित्य होऊन सर्व हात कुजल्यामुळें गेल्या आठवड्यांत बडोदे मुक्कामीं देवाज्ञा झाली. ही बातमी ऐकून इकडील त्यांचे इष्ट मित्रास वाईट वाटल्या वांचून राहणार नाहीं. या गृहस्थांचे अंगीं हुषारी काम करण्याची उत्तम शैली वगैरे अद्वितीय गुण असल्यामुळें ह्यांस वऱ्हाड कमिशन मधील सर्व आफिसर ओळखीत होते इकडे पूर्वीं जे एक दोन प्रख्यात दप्तरदार होऊन गेले त्यांतच या बाणेदार व कलम बाहादर गृहस्थाची गणना होत असे. हे गृहस्थ कोणाची हांजीहांजी व पायमळणी न करितां केवळ आपले स्वपराक्रमानें साधारण इंग्रजी आफिसांतील क्लार्काचे जागेपासून तों अखेरीस अ. क.चे हुद्यापर्यंत सारखे वाढत गेले. व प्रसिद्धीस ही आले. यांनीं वऱ्हाडांत डे. क. चे व जु. क. चे क्लार्क ऑफदी कोर्टाचे काम सुमारें ७-८ वर्षें करून नाझर प्रकर्णाचे वेळीं त्यांणीं आपले जागेचा राजीनामा देऊन बडोदे संस्थानांत नौकरी पत करली व तिकडेही सुमारें ९ वर्षें पावेतो उत्तम काम केलें. यांचे अकाली मरणापासून त्यांचे कुटुंबावर हा एक घालाच पडला परंतु ईश्वरेच्छेपुढें कोणाचा इलाज नाहीं असें ह्मणून आह्मी आपला लेख पुरा करितों.

---

आह्मास खासगी पत्रावरून असें कळतें कीं आज पावेतों म्याट्रीक्युलेशन परिक्षेत जी तोंडी परिक्षा घेण्याची वहिवाट होती ती या सालापासून सिंडिकेटनें आजिबात बंद केली.

The Berar Samachar

MONDAY 11 OCTOBER 1886

WANTED

A TEACHER FOR A PRIMARY SCHOOL. MUST BE A GOOD ENGLISH SCHOLAR WITH SOME EXPERIENCE IN TEACHING. SALARY RS. 15 TO 20. APPLY TO ALBERT CARE OF POST MASTER YEOTMAL.

A female correspondent of the "Times of India" subscribing herself as 'only a woman' thus discusses the question of infant marriage in reference to Government interference.

"This question, which deals with one of the fundamental and most revered of Hindu customs, presents itself to me as having divided the community into three distinct sections. First, those who assert that the institution of infant marriage is superior to any innovation. Second, those who consider the institution fatal to their well-being, debarring men and women from growing up a stronger race physically and mentally, acting prejudicially to individuals in particular and depriving them of the means of development and progress. Inclined to reform, some men of standing have arisen amongst them, put, lacking courage, they lean upon the hope of a second man appearing on the horizon. They shrink from the thought of Government interference, desiring rather to maintain their religious liberty, or what they deem as such. Third, those who desire Government to interfere, but being in a minority, feel their position hopeless and long for some leading spirit to assist and guide them. Let us pass judgment. To those who think their present state perfect I would apply the Mahratta proverb of "him who covers his eyes during the day, trying to persuade others that it is night," their foolishness and blindness seem to me to place them beyond reasonable argument. To those who call themselves "reformers," friends of progress who consider their present social customs pernicious, yet condemn Government interference, I would plainly ask, what means they possess within themselves to improve matters? How will they carry precept into practice amongst those for whom they should be as the star which led the Hebrews through the desert? Power is undoubted-ly needed to make improvements. Rulers of native States, leaders of communities, might have achieved some work; but they seem slow to encourage reforms, and who else have power and care enough for their country to apply it at the cost of self-sacrifice and the long ordeal of renunciation?

Some of the so-called "reformers" think that education being spread, reform will be the natural and inevitable outcome; but when men of intellectual culture such as Telang, Pundit, Modak and others continue to give their infant children in marriage, notwithstanding their preachings how can men of less culture be expected to illustrate the reforms their superiors shrink from? There lies a cankerworm at the root which paralyses the efforts of the best and strongest amongst them. Caste and its obliagtions bind every nerve with bands of steel, and to its accursed influence alone is to be attributed the powerlessness of single effort."

She has taken to task men like

Telang, Pandit, and Modak who have given their daughters in marriage at an early age and yet talk loudly for reform in the age of girls who are considered marriageable by the community. She adduces the example of vaccination as a preventive against small-pox which was considered by the Hindus as the visitation of the Goddess Shitala Devi. The Hindus, it is urged, did not like the practice of vaccination though the advantages of it were demonstrated to them and the practice had at last to be enforced by legislation. When once it came to be so enforced the Hindus submitted to it not without murmur and complaint, but the result has been that as the advantages of the system came to be appreciated, people began to forget the Devi. Similarly though the Hindus might in the first place raise a storm of opposition against legislation, yet when it is once introduced and people come to feel the benefits realisable from the same they will drop the word complaints now urged forward and consider it a fortune to have had the imposition placed upon them. The woman considers the Madhav Bag Meeting and the interview of the Poona Shastris with the Governor of Bombay as checks which have put the movement for reform further back than before. She says "the desire for Government interference was believed to be doubtful, now it has been pronounced undesirable and the fetters of the slavery of infant marriage are being drawn closer and tighter.' In the last para of the letter she draws out a piteous wail that the movement for reform has received a check. She longs for the day when legislation will intervene and set the Indian women at liberty. She says that she has asked many women who agree with her that a simple enactment restricting the marriageable age should be framed. She adds "all the women I have asked—and I have asked many—have told me that if I wanted names they would gladly give them, could such only be kept secret. But of what avail would this be? They tell me they are prevented by their husbands from expressing their ideas in any way." We are afraid this last statement is exaggerated. If it is not exaggerated it comes from a class of women who have gone forward than the rest, and that too a very limitted class. Perhaps some minority of Parbhu and Shenvai or a similar class of women may have said so to the female correspondent. But there can be no doubt that her experience extends to a few women and the many women she speaks of must be imbeded among these few. She has used the word "many" in reference to the women she has spoken to on the subject which we use the word few in reference to the Hindu community. Indeed these words would be misleading unless properly explained; and when speaking for the community she should have hesitated to use such doubtful language; but her zeal and ardour for reform are unmistakly high, and a woman of the fair sex may de pardoued for being a little too indiscreet in the compression of her sentiments. In a matter which directly concerns the welfare of woman, a fair correspondent ought to be given every opportunity to express her sentiments and the arguments and opinions she puts forward should be judged with an unbiased and cool frame of mind. But we feel sorry to disagree with her that the Madhav bag Meeting and the Poona Shastri's interview have thrown the question of legislative interference very far behind. We suppose the question rests where it is. The Bombay Meeting has simply assured Government that the decision they had arrived at was quite correct and asked them not to be doubtful because men of high intelligence and culture have drafted an act or have expressed opinions in the opposit direction. People thought that Government might reconsider their decision when fresh opinions are placed before them and actually drafts of the act made by members of Government. Government was never doubtful as she says but might have become doubtful. They now know the feeling of the generality of Hindus and they will not now take action in the matter without giving consideration to this *expressed* opinion.

---

## PLEADERS EXAMINATION H.A.D. 1886

Laws of specific Relief, Transfer of Real Property, Mortgages and Trusts.

I When, in what manner, under what circumstances and with what object bills to perpetuate testimony and to take evidence *de bene esse* were granted in England? Describe fully the corresponding provisions of the Laws in force in the H. A. D.

I1 (a) What are the cases in which a perpetual injuction can be granted.
(b) State fully the Law as regards the method of rocovering possession of specific property.

111 (a) What persons can obtain the specific performance of a con tract.
(b) In what cases can the specific performance of a contract be not enforced against a party thereto.

1V(a) What is the Law regarding the transfer of property in the H. A. D.
(b) Describe fully the following terms as used in Act 1V of 1882 viz transfer of property, lease exchange, gift, negotiate instruments, and donatiomortis causa.

V (a) State fully the Law as regards the transfer of actionable claims.
(b) What safe guards have been provided by Law against champerty?

V1 (a) State fully the circumstances under which a gift may ba declared void. When can it be suspended or revoked.
(b) What are the rights of a lessor's transferce? Under what circumstances does the lease of immove able property terminate?

V11(a) What conditions restraining alienation are valid in case of transfer of property? State fully the rule against perpetuity.
(b) Under what circumstances and within what period is a person bound to elect either to confirm or dissent from the transfer of property?

V111 (a) What do you understand by anomalous mortgages?
(b) Describe fully the procedure which should be observed in fare closing a mortgage by conditional sale.

1X (a) What is the Law as regard the marshalling of securities and the contribution to mortgage debt.
(b) What do you understand by the tacking of mortgages and how far is it abolished?

X (a) Wat is a trust.
(b) What are the disabilities of a Trustee after accepting a trust.

X1 (a) Under what circumstances is a trust extinguished.
(b) When can a trust be revoked.

X11 State some of the most important duties and liabilities of a Trustee.

---

Mr. Aitkin has returned from furlough with fresh vigour and new energy and has taken charge of duties. He has been in the Educational Department H. A. D. on the same salary for more than seventeen years. An India Government Resolution blocks his line for promotion in this department. We therefore hope if the Government transfers his services elsewhere, his energy and vigour will be better used. We assure his students that they will enjoy his full confidence and receive kind treatment at his hands.

---

## वऱ्हाड.

हवामान— हवेंत अद्याप पावेतों गारवा आला नाहीं. पर्जन्य झाला इतका शेतीचें कामास पुरेसा झाला असें लोक ह्मणतात. परंतु पर्जन्य जास्त पडण्याची अद्याप चिन्हें आहेतच. आकाश नेहमीं आभ्राच्छादित असतें.

रा० रा० विश्वनाथ मोहनीराज यांची थोडके दिवसांपूर्वी उमरावती हायस्कुलांत बदली झाल्याचे आमचे वाचकांस आठवत असेलच. ते तेथें जाऊन ठाकठीक होतात न होतात तोंच पुन्हां त्यांची बदली तळेंगाव दशसहस्त्र येथें हेडमास्तरचे जागीं केली. पण ती ही अक्टिंगच!! असें कां?

बळवंत विष्णू वैद्य दर्यापूर येथिल कायमचे हेडमास्तर यांस स. डे. ए. इन्स्पेक्टरचे जागीं आ० नेमिलें. यांची कारकीर्द मास्तर लोकांस सुखावह होवो असें आह्मी इच्छितों.

रा० रा० भास्कर महेश्वर लेले वारल्यामुळें यांचे वर्गावर्गींत रा०रा० गिरराव रामचंद्र यांस २०० रुपयावर व त्यांचे जागीं मि० सुब्रावनायडू फ० आ० रेसिडेंट चे ९० रुपयाचे क्लार्क आफ दी कोर्ट यांस १७५ रुपयांवर तहशिलदार नेमण्या बद्दल शिफारस झाल्याचें कळतें. शिफारस तर चांगलीच झाली यांत संशय नाहीं. हायर व लोअर स्टांडर्डची परीक्षा पास झालेले व आक्टिंग काम करीत असलेले हुषार क्लार्क आफ दी कोर्टस व तहशिलदार यांना चुरमुरे खातच बसावें लागणारना?

सुमारें सहा महिन्यांपूर्वी मि० एटकीन परत येतील असें वाटत नव्हतें व त्याच वेळेस रा० रा० हरीभाऊ रोहणखेडकर बी. ए. हे तहशिलदारीचे जागीं कायम होतील असा सुमार दिसत होता यामुळें हाय स्कुलांतील नव्या उमेद्वार डिग्रिवाल्यांना आपली चंगळ उडेल असें वाटत होतें परंतु न येणारें मंडळ परत आल्या मुळें या डिग्रिवाल्याच्या आशेचा मोड झाला. असो बाबानों धीर धरा व असा विचार कर कीं परका आलेल्या गृहस्थाची निराशा तुमच्यापेक्षां किती पटीनें झाली असावी.

गेले आठवड्यांत दसऱ्याचा व मोहरमचा असें दोन्ही सण निर्विघ्नपणें शेवटास गेले. पोलिसाचा बंदोबस्त चांगला होता.

मि० हिगन्स ए० इं० उमरावती हे रजेवर जाणार. त्यांचे जागीं मि. क्रेग साहेब व येथें मि० हीथ साहेब यांस ए० इं० नेमण्याचे घाटत आहे. ही बातमी अद्याप फार गुप्त आहे तेव्हां वाचकानीं याची खबर दुसऱ्या कोणास देऊं नये अशी आमची त्यांस विनंती आहे.

डोंगरे संगीत नाटक कंपनी पैकीं कांहीं मंडळी कालरोजीं उमरावतीस गेली. व तेथें कांहीं खेळ करून पुढें नागपुरास जाणार असें कळतें.

मि. महंमद अझीमुद्दीन बी. ए. आ. हिंदुस्थानी डे. ए. इन्स्पेक्टर यांना ह्याच जागीं कायम केलें.

आजपासून दोन्ही हायस्कूलांची वार्षिक परीक्षा सुरूं होणार या करितां रा. रा. विष्णू मोरेश्वर माहाजनी ए. इं. हे कालरोजीं उमरावतीस गेले.

---

[ मागाहून आलेली नोटीस. ]

सिताराम वल्लद संभाजी गांवडे रहाणार आकोट एलिचपूर वेशिवर यासी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं आमचे गोंठवाड्यांतील जागा तुजला तोंडी करारांनीं पांच वर्षे रहाण्यास दिली. त्याजबद्दल भाडें दरसालचें दरसाल मित्ती अश्विन शुद्ध ९ रोजीं देण्याचें ठरविलें तर त्यांत तूं मजला तीन वर्षांचें भाडें बक्षीस दिलें आतां दोन वर्षांचें भाडें राहिलेलें तुजला मागत असतां आज देतों उद्या देतों असें ह्मणतां परंतु मजला भाडें देत नाहींस आणिं आतां मजला जागेची अडचण ही आहे करितां तुजला या नोटीशीनें असें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावले दिवसांपासून आठ दिवसांचे आंत आमचें भाडें दोन वर्षांचें रुपये ६ व त्याचें व्याज माहे २९ अधिक मासासुद्धां दर शेकडा दोन रुपये प्रमाणें रुपये ३ एकूण रुपये ९ अक्षरीं नऊ रु. शिक्का कंपनी मजला देऊन माझें हातची पावती घ्यावी आणि माझी जागा ही मजला खालीं करून द्यावी. आतां मजला तुला ठेवणें नाहीं. करितां या नोटीसीनें तुजला कळविलें आहे तर नोटीसीचे मुदतीचे आंत भाडें देऊन, काय जबाब देणें असेल तो द्यावा. जर मुदतीचे आंत तूं माझें भाडें न दिल्यास, आणिं जागा ही खालीं करून न दिल्यास मी तुझेवर दि.को.फिर्यादी करून या नोटीसीचे खर्चा सुद्धां भरून घेतले जाईल हें तूं खूप समजावें आतां अलिकडेस माझें ऐकण्यांत आलें आहे कीं, तूं रहातो त्या घराची भिंत बसविण्याचा तुझा इरादा आहे तर ती भिंत तूं बसवू नये; बसविल्यास मी त्याच्या खर्चाचा जबाबदार नाहीं. कळावें तारीख ८ माहे आक्टोंबर सन १८८६ इ०

(सही) नानजी वल्लद
राघोजी सपकाळ
दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

सावकारानें कुळापासून रुपये घेऊन पावती दिलीच पाहिजे असें असतां साताऱ्या जिल्ह्यांतील एका सावकारानें पावती दिली नाहीं. सबब त्याजवर शेतकरी अकटाचें कलम ६४ प्रमाणें फौजदारींत खटला चालला आहे. इकडे सर्व सावकारी करणारांनीं लक्ष पुरवावें. क०

बलगेरियन लोकांनीं राजा निवडण्याचा विचार चालविला आहे. शिवाय त्यांचे प्रतिस्पर्धी सर्वियाचें संस्थान त्यांजशीं मित्रत्व केलें व त्याजकडे वकील ही पाठविला. तसेंच त्यांणी आपले सार्वभौम सत्ताधीश टर्कीचे सरकार यसें आपलें संरक्षण करावें म्हणून विनंति केली आहे. टर्कीच्या बादशाहांनीं आपल्या कडून तावडतोब बर्लिनच्या तहनाम्यावर सह्या करणाऱ्या सरकारांस हा प्रकार कळविला व त्यांणीं उलट बलगेरियांत कोणाची ही फौज येणार नाहीं असें कळविलें. परंतु रशियानें आपली फौज सरहद्दीच्या बरोबर आणून जमा करून ठेविली आहे, त्याजमुळें टर्कीनें मोठी तयारी करून एड्रियानोपल येथें फौज जमवून ठेविली आहे. मध्यंतरी इंग्लंडनें बलगेरिया, सर्विया, ग्रीस व टर्की यांचें ऐक्य व्हावें एतदर्थ प्रयत्न केला; परंतु आतां फार उशीर झाला व त्यांत आपला कांहीं फायदा नाहीं सबब आपण या कामांत पडत नाहीं असें ग्रीसनें कळविलें. आतां हें प्रकरण अगदीं घाय कोतीवर आलें व यांत बलगेरिया व सर्विया यांचें स्वातंत्र्य नष्ट होते व बर्लिनचा तहनामा मोडतो असें पाहून आस्ट्रियाच्या सरकारानें आपला झोक प्रसिद्ध केला. त्याच्या पार्लमेंटांत प्रधान मंडळाच्या कौन्सिलाचे अध्यक्ष मोशोटिना यांणी स्पष्टपणें बोलून दाखविलें कीं बालकन प्रदेशांत स्वतंत्र राष्ट्रांचीं स्वतंत्र संस्थानें कायम राखावी अशा आस्ट्रियाची इच्छा आहे. तसेंच बर्लिनच्या तहनाम्या प्रमाणें पूर्णपणें वागण्याचा आपला निश्चय आहे यास्तव बलगेरियावर परक्या राष्ट्राचा अधिकार चालू देणार नाहीं किंवा त्यांत दुसऱ्याची फौज येऊं देणार नाहीं. जर्मनीचें आमचें सख्य कायम राहीलच असें तें बोललें. तेव्हां हा रशियाच्या प्रतिपक्षाकडील झोंक आहे. तेव्हां युरोपांत भयंकर अनर्थ उद्भवण्याचा हा प्रसंग दिसतो. बलगेरियाच्या प्रकरणाचें स्वरूप विलक्षण व मोठें भय सूचक दिसतें. यांत आणखी कोण पडतात व काय होतें तें पहावें. जर्मनीनें वगैरे नेटानें हें प्रकरण विझविलें नाहीं तर युरोपांत सर्वत्र कल्होळ होईल.

सरविलियम वेडरबर्न, आ. चीफ सेक्रेटरी यांची रिची साहेब येई तों पर्यंत, मुंबई सरकारच्या कौन्सिलच्या मेंबराच्या जागेवर तूर्त नेमणूक झाली.

सांप्रतच्या यूरोपच्या राज्यकारस्थानामध्यें जर्मनीच्या कल सर्वांशीं रशियाकडे आहे असें आस्ट्रियामध्यें लोक कुरकुरू लागले आहेत.

अमेरिकेंतील लोक गतवर्षी एकंदर ६४,२०,००,००० गालन्स बीर प्याले. ७०,७६,३०१० ग्यालन्स व्हिस्की त्यांनीं ३९७,०३७९३९ विड्या ओढल्या असें समजतें.

कांहीं इंग्लिश व्यापारी लोकांनीं चीन सरकारास २ लक्ष बंदुका देण्याचें कंत्राट घेतले आहे.

रशिअन सरदार जनरल कालबार्स यांणी रशियन कौन्सिलचा म्हणून जाहीरनामा प्रसिद्ध केला व त्यांत ते बलगेरियाच्या लोकांस रीजेन्सीवर भरंवसा न ठेवितां झारवर भरंवसा ठेवा आणि न्याशनल असेंब्ली तूर्त जमवूं नका असें सूचवितात. त्याजबद्दल बलगेरियाच्या लोकांचा मोठा संताप होऊन गेला आहे.

बलगेरियन लोकांच्या व जनरल कालबार्स यांच्या वारंवार भेटी होऊन लोक त्यास रशियाच्या म्हणण्यांत फेरफार करा म्हणून सुचवीत आहेत.

आस्ट्रियाच्या प्रधानमंडळाचे अध्यक्ष मोशोटिना यांणीं आपल्या पार्लमेंट सभेंत बोलून दाखविलें कीं बर्लिन येथील तहनाम्याप्रमाणें वागण्याचा आपला निश्चय आहे व जर्मनीचें मित्रत्व ठेविलें जाईल परंतु बलगेरियामध्यें कोणाची फौज येऊं दिली जाणार नाहीं. बालकन प्रदेशांतील संस्थानें स्वतंत्र असलीं पाहिजेत. त्यांजवर कोणाची ही सत्ता ठेविली जाऊं देणार नाहीं.

रशियाचे वकील व मुक्त्यार कामगार जनरल कालबास यांणीं बलगेरियाच्या रीजेन्सीस पत्र पाठविलें कीं जर ग्रांड न्याशनल असेंब्ली जमविण्याचें काम तुम्ही अवकाशावर न टाकाल तर ती मंडळी जो ठराव करील तो रशिया बरोबर आहे असें मानणार नाहीं.

निजाम सरकारच्या मुलखांत वाफेनें ट्रामगाड्या चालविण्याचा विचार चालला आहे असें म्हणतात.

येत्या आक्टोबर महिन्याच्या २४ व्या तारखेस बलगेरीयन न्याशनल असेंब्ली जमून राजाची निवडणूक होईल.

युरोपांतील सर्व राष्ट्रांनीं इजिप्त संबंधीं विचार करावा असें फ्रेंच लोकांचें म्हणणें आहे.

टर्कीमध्यें फौजेची मोठी तयारी चालली आहे व एड्रियानोपल येथें फौजेचा जमाव होत आहे असें सेंटपिटर्सबर्गच्या ता. ३० च्या तारेवरून समजतें.

आन. रा. सा. रास्ते व. आन. मि. बद्रुद्दीन यांच्या जागीं कोल्हापुरचे रा. ब. महादेव वासुदेव बर्वे बडोद्याचे काजी शाबुद्दीन यांच्या नेमणुका कायदे कौन्सिलमध्यें झाल्या.

जबरदस्त एंजिन जगांत अतिशय मोठें एंजिन सध्या पेनसिल वेनियांतील फ्रेडनस्त्रिलच्या जस्ताच्या खाणींत "प्रेसिडेंट" म्हणून आहे. ह्या एंजिनाला १६ बायलर्स असून तें एका मिनिटांत १६,००,००,००० पौंड एक फूट उंच उचलतें, व ज्या प्रमाणानें बायलर्स वाढवावे त्याच प्रमाणानें कामही तितकें जास्त होतें. ह्या एंजिनच्या चक्राच्या एक्या फिरण्यानें १७,५०० ग्यालन पाणी काढलें जातें. ह्या एंजिनाला २८ टन कोळसे प्रति दिवशीं लागतात, व त्याच्या गतीचें मान एका मिनिटांत ७ फेरे या प्रमाणें आहे. त्याच्या चक्राचा व्यास ३७ फूट असून प्रत्येकाचें वजन ४० टन आहे कायही मानवी कौशल्याची चतुराई! सु. प.

एका इंग्रजी पत्रांत पुढील मजकूर आमच्या पहाण्यांत आला. "आफ्रिकेंतील दहोमे देशांत वर्धा म्हणून एक शहर आहे, तेथें लांबच लांब एक सर्नाटें देऊळ आहे. तेथील पुजाऱ्यांनीं लहान मोठ्या आकृतीचें हजारों हजार सर्प पाळलेले आहेत तिकडील भाक्तिमान लोक पांखरें आणि बेडुक पाठवितात त्यांवर सर्पाचें उपजीवन चालतें. हे सर्प— ह्यां पैकीं कित्येक फारच अजस्र आहे— मध्यें मध्यें घातलेल्या तुळवटांवर स्वच्छेनें लोंबकळत किंवा अन्य स्थितींत सुखानें रहतात. एका लहानशा छडीचा स्पर्श करून लहान लहान सर्पांकडून नाना प्रकारचे चमत्कार पुजारी लोक करवितात, पण जाड्या जाड्या प्रकर्णांस स्पर्श करण्याची ही त्यांची छाती होत नाहीं. ह्या जाड्या प्रकर्णांत कांहीं इतकी अजस्र आहेत कीं तीं मोठ्या बैलास आपल्या विळख्यांत जहन धरतील ह्या पैकीं कित्येक सर्प कधीं कधीं बाहेर पडून शहरांत जातात. त्यांस घुलवून घुलवून देवळांत आणण्यास पुजाऱ्यांस महतू प्रयास पडतात. येथें बुद्धिपुरःसर साप मारणारास देहांत प्रायश्चित्त देतात. एखाद्या युरोपियनानें जरी साप मारिला तरी राज्याच्या मध्यस्तीनें ही त्याचा प्राण वांचविणें कठीण आहे. चुकून कोणाच्या हातून सर्प मारला तर त्यानें घडलेली हकीकत पुजाऱ्यांस सांगावी असा नियम आहे. ज्यांच्या हातून चुकून सर्प मरतात त्यांस सालांतून एक वेळ चकचकीत प्रायश्चित्त देण्याची वहिवाट आहे.

सरकारच्या वर्तनावर आजकाल आमचे लोक फार टीका करितात, ह्मणून त्यांचीं तोंडें बंद करण्या करितां हिंदुस्थान सरकार कायदा करण्याच्या विचारांत आहेत. सु०सू०

हैद्राबादचे तरूण निजाम व त्यांचे दिवाण यांचे जमत नाहीं. निजामांचें मनांत हल्लींच्या दिवाणांस रजा देऊन दुसऱ्यास दिवाणगिरीचीं वस्त्रें देण्याचें आहे तेथील दरबारी असलेले इंग्रज सरकारचे वकील असें करणें इष्ट होणार नाहीं. ह्मणून निजामांस उपदेश करीत आहेत. निजाम हट्टास पडले आहेत. त्यांस सामोपचाराच्या दोन गोष्टी सांगून पहाण्या करितां व्हाइसरायची स्वारी हैद्राबादेत लवकरच जाणार आहे असें समजतें. पाहिजे त्यांस दिवाणगिरीचीं वस्त्रें देण्यास निजाम समर्थ आहेत. इंग्रज सरकार व निजाम यांजमध्यें झालेल्या तहनाम्यावरून पाहिल्यास अशा कामांत अडथळ करता येईल असें दिसत नाहीं; परंतु राज्यांत शांतता राखण्याचें काम सार्वभौम इंग्रज सरकाराकडे आहे.

डेक्कन टाइम्स वरून कळतें कीं, ना. व्हाइसराय साहेब यांची स्वारी ता० २३ नवंबर रोजीं दुपारी हैद्राबादेस पोंचण्याचें मुकरर झाले आहे. ना० साहेब ता० १९ नवंबर रोजीं मुंबईहून निघून वरूळ, रोझा, दौलताबाद, आणि औरंगाबाद येथील लेणी पाहण्यांत त्यांचे २।३ दिवस जातील. नंतर बहुत करून २२ व तारखेस रात्रीं त्यांची स्पेशल ट्रेन अहमदनगराहून निघून दुसरे दिवशीं दुपारीं हैद्राबादेस पोंचेल. वाटेंत गुलबुर्गा येथें थोडा वेळ गाडी उभि राहील तर ना० साहेबांचें चांगलें आगत स्वागत करावें अशी तेथील गांवच्या लोकांची व सुभेदार नबाब यारजंग यांची फार इच्छा आहे. क०

डेक्कन कालेज बंद करण्याविषयींच्या सूचनेंत न्याय्यता व सयुक्तिकता किती आहे याचा आपण आतां विचार करूं. डेक्कन कालेजाकडे जो कांहीं खर्च होतो तो सरकारच्या पदरचा नसून पेशवाईंत दक्षिणा ह्मणून जी वाटीत असत त्या फंडांतून होत असतो. दक्षिणेचा उद्देश विद्योत्तेजन हा होता. पेशवाईंत वेदविद्येस व शास्त्रविद्येस विशेष मान असल्या कारणानें त्या वेळेस त्याच विद्येस उत्तेजन मिळत असे. आतां तत्स्थानीय इंग्रजी विद्या आहे तर त्या विद्येच्या उत्तेजनाकडे तो पैसा खर्च होत आहे हे दक्षिणाफंडाच्या उद्देशास अगदीं जूळून आहे. परंतु तो पैसा डेक्कन कालेज उठवून आज घशांत घालण्याचा जो बेत आहे तो मात्र अगदीं अश्लाघ्य असें ह्मटलें असतां बिलकूल साहस होणार नाहीं. डेक्कन कालेजास एल्फिन्स्टन कालेजाप्रमाणें देणग्या बऱ्यांच लोकांनीं दिलेल्या आहेत. याशिवाय खुद्द सरकारच्या तिजारींतून वर्षास पन्नास हजार रुपये कायते जात असतात; ह्मणजे सरकारास डेक्कन कालेज प्रीत्यर्थ जो खर्च येतो तो पाहिला ह्मणजे एका कौन्सिलरला वर्षास जितका पगार द्यावा लागतो त्यापेक्षां दहा हजारांनीं कमीच आहे. शिवाय कित्येक कौन्सिलर ह्मणजे हिंदुस्थानच्या संबंधानें पाहिलें तर केवळ "खाया काळ भुईला भार" असेच आहेत. परंतु तीं पडलीं इंग्लंडाचीं पिलें त्यांचे खाणें कमी कसें करावें! सारांश खर्चाच्या संबंधानें पाहिलें तर भारभूत हपिसें व हपिसर यांस धक्का न लावतां डेक्कन कालेजसारख्या अत्युपयुक्त व आज तिसांहूनही अधिक वर्षें अविच्छिन्न चाललेल्या पाठशाळेवर घाव घालणें अगदीं अन्यायाचें व अनीतीचें होणार आहे.

राणी सरकार हिंदुलोकांच्या बायकांचा पोषाख पाहून त्या फार खूष झाल्या. व त्यांच्या पोषाखाच्या रीतीपेक्षां हिंदु बायकांची पोषाकांची रीति चांगली आहे असें त्यांनीं नुकतेंच बोलून दाखविलें.

ब्रह्मदेशांत इकडून दारूगोळा पुरतो असें सरकारास आढळल्या वरून कोणत्याही एशियाखंडी मनुष्यास सरकारी परवान्या वांचून दारूगोळा विकूं देऊं नये असा सरकारानें ठराव केल्याचें समजतें. ने. ओ.

ठरल्या प्रमाणें ड्यूक आफ कानाट हे पत्नीसह ता. २७ रोजीं मुंबईस आले. व ता. २८ रोजीं पुण्यास जाऊन दाखल झाले पुण्यास त्यांचा आदरसत्कार व थाटमाट उत्तम प्रकारचा होऊन अजूनही त्यांच्या करितां गमतीचे प्रकार चालू आहेत. हे पाहुणे नोव्हेंबर १५ तारखेच्या सुमारास सीमल्यास दाखल होईल. ठा. अ.

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडकेयांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

सहामाही " ३ " " ८८
साल अखेर " ७ " " १८८
किरकोळ अंकास.................... ८४

Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly........... 3 " 8 as
Single copy............................ 4 as

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०१८६
दुसरे खेपेस ........०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as

THE BERAR SAMACHAR

VOL XX AKOLA MONDAY 18 OCTOBER 1886 NO 41

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख १८ माहे अक्टोंबर सन १८८६ इ० अंक ४१



Look for our name.
Save your trouble! Save your trouble!
BROWN & MURRAY'S.
PORTABLE SCIENTIFIC COOKING STOVES

Require no oil, Require no spirit.
Useful Requisite for every household and Inestimable boon both to Rich and poor.

1 Charcoal Ball or 3 Charcoal Cakes Will suffice for the Napolean Patent stove to prepare any 2 lbs. of the following in 5 minutes *viz*, Tea, Coffee, Milk Sago, Arrowroot, Barley, &c.

2 Charcoal Cakes. 2 Charcoal Cakes 2 Charcoal Cakes. Will take for the Dick's Patent or Pocket Stove to prepare any 1 lb. of the following in 3 minutes--*viz*, Tea, Coffee, Milk, Sago Arrowroot, Barley, &c.

1 Pice Charcoal. Ball or 1 lb. coal, Will be enough for the Tourist Patent stove to prepare any four of the following, in 30 minutes. *viz*, Rice, Curry Cultet, Stew, Pudding, &c.

BROWN & MURRAY'S STOVES give rise to no disgusting smell and smoke as they are in general with other valuable Stoves. Their Stoves are perfect, most economy in Cookery, and require no setting of brickwork. They can be placed, in time of Cooking anywhere even on a Table, Sofa, Chair, &c., without the least fear of catching fire; and cooking can also safely be executed on a running car. BROWN & MURRAY'S STOVES are not only valuable helps to the INVALIDS and INFANTS for procuring HOT TEA and WARM MILK, but on the whole they are HAPPY PARTNERS to all sorts of men for the preservation of life.

*Packing as. 4 postage extra.* R. A p.
With direction each Napolean

| | R. | A | p. |
|---|---|---|---|
| Patent.................... | 2 | 8 | 0 |
| Pocket Stove.............. | 3 | 8 | 0 |

*Packing as. 6 Postage extra-*
With direction, each, Tourist

| | R. | A | p. |
|---|---|---|---|
| Patent. large.............. | 6 | 0 | 0 |
| Do. small.................. | 4 | 8 | 0 |

LIBERAL COMMISSION TO WHOLESALE PURCHASERS AND AGENTS.

Wanted Agents at every post town. Can be had only.

H. NATHANIAL & CO.
*WHOLESALE MERCHANTS AND COMMISSION AGENTS.*
SEALDAH, CALCUTTA E. C.

Ask for "BROWN & MURRAYS" Stoves and take no other.

See that the Stoves you buy bear, our brass lable.

*Testimonials from the Reverends and others free on application.*

Best always cheapest.

ASHU'S POWDER.

Perfectly cures the habit of drinking spirits and wines, opium-smoking, indigestion, dyspepsia, &c, by use as per instructions on label. Rs. 3 As, 8 per phial. A. T. Mookerjee, Barnagore, *via* Calcutta. Wanted Agents.

THE GREAT ORIENTAL MEDICAMENTUM.
DR. G. B. SHAW'S SAMARITAN DROPES

Rouses and developes the nervous energies, strengthens and regulates the stomach, bladder, kidneys, lungs and liver, and is highly recommended and prized as a sovereign remedy for the following maladies:-

Asthma, Shortness of breath, Coughs, Dropsy, Worms, Gravel, Chronic evers, Liver complaint, Palpitation of the heart, Giddiness, Nervousness, Headache, Internal Sores, Phosphatic deposits and mucus in the urine, Gonorrhæa, Gleet, Fluor albus, Ulceration of the bowels, Chronic inflammation of the bladder, Catarrh.

By external application Dr. G. B. Shaw's Samaritan Drops is invaluable for:-

Burns, Ulcers, Malignant Sores, Ringworms, Itches, Tetters, Chilblains. Paralysis, Leprosy, Rheumatism, Gout Syphilitic Sores, and skin diseases of the worst description.

*Full directions for use accompany every phial.*

Sold at Re. 1, Rs. 2, Rs. 3-8, Rs. 5-4 and Rs. 10 per phial, packing and postage As. 12. extra.

Wanted Agents, apply to

Barnagore Suburb of Calcutta *East Indies.* } A. T. Mookerjee *Proprietor.*


## नोटीस

रा. रा. केशव वल्लद गोविंदा जात जईन आडनाव खंडारे राहणार दर्यापूर व रा. रा. गणू वल्लद बनाजी जात जईन आडनाव फुलंबारकार राहणार दर्यापूर व रा. रा. कृष्णा वल्लद गणाजी जात जईन आडनाव मुरकटे राहणार दर्यापूर रा. रा. रुखव वल्लद झिंगराजी जात जईन आडनाव अगरकार राहणार दर्यापूर व रा. रा. सोन्या वल्लद वामनाजी जात जईन आडनाव शेंडेकर राहणार दर्यापूर व रा. रा. बापु वल्लद गणोबा जात जईन आडनाव भोंकरे व रा. रा. मारुती वल्लद पांडोबा जात जईन आडनाव दुधे राहाणार दर्यापूर या सर्वांस नोटीस देणार विष्णु वल्लद अन्याजी जईन राहणार दर्यापूर नोटिसीनें असें कळवितो कीं तुह्मी आमची च्यार जातभाई मधें व जनात गैर इजत करण्याच्या इरादानें मजवर व आमची मातोश्री नामे अंबा यांच्यावर कांहीं तुफान करून कोणी एका मनुष्याच्या हातून गावांत व परगांवी आमचे सोयरे वगैरे लोकांत तुम्हीं विनाकारण आमची आपकीर्ती उत्पन्न केली याजकरितां तुम्हांस या नोटिसीने कळवितोकीं गावात व जनांत ज्या गोष्टी तुम्हीं च्यार चवघांत बोलून आमचे उभयता बद्दल गैर ईजत केली त्याजबद्दल नोटीस पावले पासुन १५ पंधरा दीवसांत बरोबर आमचें पदरांत माप च्यार जातवाले पंचाचे समोरें घालुन सिद्ध करून द्यावे न दील्यास आमच्या उभयताचे इजतीबद्दल तुम्हांवर सरकारात फीर्याद करून आमचें जे नुकसान होईल ते व ह्या नोटीसीचे खर्चा सुद्धा अखेर निकाल होई पर्यंत सर्व नुकसान वगैरे भरून घेतलें जाईल कळावें. तारीख १३ माहे अक्टोबर सन १८८६ इसवी.

सही
विष्णु वल्लद अन्याजी जईन
राहणार कजबे दर्यापुर
दस्तुर खुद.

## नोटीस

नोटीस बेशमी पांडोबा वल्लद विश्वनाथ थेरे राहाणार मौजे मामन तालूके व परगणे दर्यापूर यांस नोटीस देणार विष्णु वल्लद अन्याजी जईन राहाणार दर्यापूर नोटिशीनें असें कळवितों कीं तुह्मी आमची च्यार जातभाई मध्ये व जनांत गैर इजत करण्याच्या इरादानें मजवर व आमचे मातोश्री नामे अंबा यांच्यावर कांहीं तुफान करून कोणी एका मनुष्याच्या हातून गावात व परगावी आमचे सोयरे वगैरे लोकांत तुह्मी विनाकारण आमची आपकीर्ती उत्पन्न केली याजकरितां तुह्मास ह्या नोटीसीनें कळवितो कीं गावांत व जनात ज्या ज्या गोष्टी तुह्मी चार चवघांत बोलून आमचे उभयता बद्दल गैरे इजत केली त्याजबद्दल नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसांत बरोबर आमचे पदरी माप चार जातवालें पंच यांच्या समोर घालून सिद्ध करून द्यावे न दिल्यास आमच्या उभयताचे इजती बद्दल तुह्मावर सरकारांत फिर्याद करून आमचे जे नुकसान होईल ते व ह्या नोटीसीचे खर्चासुद्धा अखेर निकाल होईपर्यंत सर्व नुकसान वगैरे भरून घेतली जाईल कळावे तारीख १३ माहे अक्टोबर सन १८८६ इसवी

सही
विष्णु अन्याजी जईन
राहणार कजबे दर्यापूर दस्तुरखुद.

## नोटीस

रा. रा. मटु वल्लद सोनबा आडनाव ठोपरे जात जईन राहाणार बाबळी परगणे व तालुके दर्यापूर यास नोटीस देणार विष्णु वल्लद अन्याजी जईन राहणार दर्यापुर नोटीसीने असें कळवीतो कीं, तुम्हीं आमची च्यारजात भाई मध्य व जनांत गैरईजत करण्याच्या इरादानें मजवर व आमची मातोश्री नामे आंबा यांच्यावर काही तुफान करून कोणी एका मनुष्याच्या हातून गावांत व परगांवी आमचे सोयरे वगैरे लोकांत तुम्हीं विनाकारण आमची आपकीर्ती उत्पन्न केली याजकरीतां तुम्हांस ह्या नोटीसीनें कळवितो कीं, गावांत व जनात ज्या ज्या गोष्टी तुम्हीं च्यार चवघांत बोलुन आमचे उभयता बदल गैरइजत केली त्याजबद्दल नोटीस पावले पासुन १५ दीवसांत बरोबर आमचे पदरी माप च्यार जात वाले पंच यांच्या समोर घालुन सिद्ध करून द्यावे. न दील्यास आमच्या उभयताचे इजती बदल तुम्हांवर सरकारांत फीर्यादकरून आमचें जें नुकसान होईल तें व ह्या नोटीशीचे खर्चा सुद्धां अखेर निकाल होई पर्यंत सर्व नुकसान वगैरे भरून घेतले जाईल. कळाव तारीख १३ माहे अक्टोबर सन १८८६ ईसवी.

सही.
विष्णु वल्लद अन्याजी जईन राहणार कजबे दर्यापुर
दस्तुर खुद.

## नोटीस

नानजी वल्लद राघोजी सपकाळ वस्ती आकोट एलिचपूर वेस यास खाली सही करणार याजकडून नोटिसीचे उत्तर देण्यात येते कीं तुह्मी मजला तारीख ८ आक्टोबर १८८६ इसवीची नोटीस वऱ्हाडसमाचार पत्रांत दिली ती पावली तुह्मी नोटिसीत लिहीता कीं आमची गायवाड्याची जागा तुह्मास तोंडी पाच वर्षाचे करारानें राहण्यास दिली त्यात तिन वर्षाचें भाडें दिले. दोन वर्षाचे भाडे रुपये ६ व याचे व्याजाबद्दल रुपये ३ असे रुपये ९ देऊन जागाही खाली करून द्यावी हें तुमचे लिहिणें सिरस्तेवार नाहीं ह्मणून याचें उत्तर देणे भाग झाले.

जी जागा गायकवाड्याची तुह्मी माझी आहे ह्मणता ती जागा व ज्या जागेत तुह्मी स्वतः राहाता ती सर्व जागा तुमची नसून सखाराम वल्लद नारायण जिसपकाळ याची आहे. यावरून उघड होते कीं तुह्मी कोणाचे तरी मसलतीने सख्यानें सदर्हु जागा आपण हस्तगत करावी या इरादानें व्यर्थ मला नोटिस दिली तुह्मी मांदे असून नोटिसीचे मसुद्यावर सही करून वऱ्हाडसमाचारांत प्रसिद्ध होण्यासाठीं कशी पाठविली असेल याचाही मला फार संशय आहे

तुह्मास आह्मी तीन वर्षाचें भाडें दिले हें लिहिणें तुमचे वाजवी नसून आह्मी राहातो ही जागा आह्मास सखाराम याजकडून मिळाली आहे व सदर्हु जागेची दिवाल बसविण्याचा माझा इरादा आहे त्यास सदर्हु दिवाल बसविण्याचें काम सखाराम याने चालविले आहे या नोटिसीचा खर्च सर्व तुमचे पासून घेतला जाईल हे खूप समजावे कळावें तारीख १४ अक्टोबर सन १८८६

सही
सिताराम वल्लद संभाजी
गावंडे निशानी खुद
हातची असे.

## WANTED

A TEACHER FOR A PRIMARY SCHOOL. MUST BE A GOOD ENGLISH SCHOLAR WITH SOME EXPERIENCE IN TEACHING. SALARY RS. 15 TO 20. APPLY TO ALBERT CARE OF POST MASTER YEOTMAL.



वऱ्हाडसमाचार

मित्ती आश्विन वद्य ९ शके १८०८


निजाम सरकार व त्यांचे दिवाण यांच्यामध्यें बरेंच दिवसांपासून बेबनाव सुरू आहे, व तो अद्याप तसाच आहे हें ऐकू आह्मांस सखेदाश्चर्य वाटतें. प्रथमतः तर या दोघांची चांगली गट्टी होती व आतां तुट्टी होण्यास काय कारण झालें असेल कोणजाणे. अगोदरच आमची नेटिव संस्थानें थोडी आहेत. यांत अशा प्रकारचा घरगुती कलह सुरू झाला ह्मणजे दुसऱ्यांनां हात घालण्याला सहज संधि सांपडते. ह्या प्रकरणांत इंग्रज सरकाराच्या मध्यस्थीची गरज पडणार नाहीं अशी आह्मी आशा करितो. आपसांत समेट होत नसेलच तर दिवाण साहेबांनीं आपण होऊन राजीनामा दिला असतां अयोग्य होणार नाहीं.

येत्या नोव्हेंबर महिन्यांत लाट साहेबांची स्वारी हैद्राबादेस जाणार व त्यावेळेस त्यांचे सन्मानार्थ निजाम सरकार सुमारें दोनलाख रुपये खर्च करणार असें बहुतेक इंग्रेजी पत्रांतून आहे. ही एवढी मोठी रकम रोषनाई वगैरेकडेच जर खर्च होणार असली तर तिचा योग्य कामाकडे उपयोग झाला असें ह्मणतां येणार नाहीं. यापेक्षां या रकमेचा उपयोग लाट साहेबांचे नांवानें एखादा कला कौशल्याचा कारखाना काढण्याकडे झाला तर फारच उत्तम आहे; व हें लाट साहेबांच्याही पसंतीस उतरेल, कारण त्यांचा हल्लीं अशा शिक्षणाकडे विशेष कल आहे.

———⟶∞∘⟵———

कामिशनांची तर अलिकडे रेलचेल सुरू आहे. एजुकेशन कमिशन संपून यांतील रिपोर्ट बाहेर पडला तोंच फिनान्स कमेटी बसली. या कमेटीचा हेतु हा कीं सर्व खात्यांतील होईल तितका खर्च कमी करावयाचा या कमेटीचें काम चालूच आहे तोंच मध्यंतरी हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला आहे कीं सर्व सरकारी अधिकाऱ्यांस फिरस्ता भत्ता Travelling allowance निम्मे द्यावा. याच ठरावा वरून कमेटीचा शेवटला ठराव काय होईल याची कल्पना होईलच. असो. ही भानगड सुरू आहे तोंच "सिव्हिल सरव्हिस कमिशन उपस्थित झालें" या मंडळांत वऱ्हाडांतील व मध्य प्रांतांतील कोणीही इसम नाहीं. व आमच्या वर्तीनें इकडील कोणी तरी त्यांत असावा असें आमचें ह्मणणें आहे; रावसाहेब नटार वऱ्हाड शाळा खात्याचे वरिष्ट अधिकारी या कामास योग्य आहेत.

इकडेस हिंदुस्थानचे दुय्यम सेक्रेटरी येणार आहेत व हिंदुस्थानची खरी स्थिति त्यांनां कळविण्या करितां त्यावेळीं एक मंडळ नेमावें असा त्यांचा हेतु आहे. एकंदर कमिशनांची तर खूपच गर्दी झाली; परंतु या सर्वांचे निकाल मात्र डोंगर पोखरून उंदीर काढल्या सारखे न होवोत ह्मणजे झालें.

रा. रा. गीरराव रामचंद्र तहशीलदार उमरावती यांस दुसरे क्लासचे तहशीलदार नेमून त्यांचे जागीं रा. रा. सुब्बराव नायडू फर्स्ट असीस्टंट रेसीडेन्टचे क्लार्क आफ कोर्ट हैदराबाद याची शिफारस झाली आहे अशा विषयींचा मजकूर आमचे बंधु वैदर्भ कर्ते यांनी गेल्या अंकी छापून प्रसिद्ध केला आहे तो वाचून आम्हांस स्वानन्द खेद वाटतो. आनंद वाटण्याचे कारण हेंच की रा. रा. सुब्बराव ह्यांची ह्या जागेविषयीं शिफारस झाली आहे. रा. रा. सुब्बराव हे हुशार आहेत व आपलें काम उत्तम रितीनें करतील अशी आमची पूर्ण खातरी आहे. परंतु त्यांची शिफारस झाल्यामुळें लोअर स्टॅंडर्ड हयर स्टॅंडर्ड पास होऊन उत्तम पुष्कळ दिवस ज्यांनीं उत्तम रीतीनें काम केलें आहे अशा किती एक हक्कदारांचे वाजवी हक्क मारलेगेले हें पाहून आम्हांस फार वाईट वाटतें. आमचे बंधु द्युप्रबोध सिंधुकर्ते व वैदर्भ कर्ते व आम्ही पत्रांतून अशा प्रकारचा अन्याय नव्हावा, म्हणून अनेकवेळ ओरड केली आहे पण तिकडे सरकार लक्ष्यपोंहचवित नाहीं ही फार शोचनीय गोष्ट आहे. फक्त वशिल्यानें मोठ मोठ्या हुद्यांचीं कामें अयोग्य हक्कदारांस देणे हें आंग्ल भौमन्याय तत्वांस फार विरूध्द आहे. हे कोण बुलकसाहेबा बरोबर बडोद्यांस गेलेहोते; ह्यांना नायब तहशिलदारी. हे कोण! सर स्टुअर्टबेली ह्याच्याव शीफ्यानें रेसीडेंट साहेबा कडून आलेले खानबाहादुर शामत अलींचे चिरंजीव; करा, ह्यांनां अव्वाची. ह्या गृहस्थानें खुद्द कमीशनर साहेबास दोन टोलेजंग मेजवान्या दिल्यातर मग ह्यांनां तहशीलदारी दिलीच पाहिजे. अशारीतीनें मनाला वाटेल तो मनुष्य मनाला वाटेल त्या ठीकाणी बहुतेक वेळीं नेमला जातो अशा नेमणुकीमुळें सरकारचे कितपत हित होत असेल व प्रजेचें किती कल्याण होत असेल. ह्याची कल्पना आमचे वाचकांनींच करावी. वगैरे या इच्छिक वर्तन जरसरकारस बरें वाटतें तर परिक्षेचें सोंग काढलें तरी कशाला? राज्ययंत्रें सुयंत्रित चालावीत ह्मणून सरकारानें आपण होऊन केलेले नियम योग्य कारणावांचून आपणच मोडणें हें आमचे न्यायमूर्ति सरकारास श्लाघ्य वाटतें कां ज्यांनीं कायद्याच्या हयर स्टांडर्ड, लोअर स्टांडर्ड परिक्षा दिल्या आहेत, ज्या विदर्भस्थ विद्यार्थ्यांनीं हैस्कुलांमध्यें व पुढे कालेजांत जाऊन पूर्ण विद्या संपादन केली आहे त्यांची विचारपूस सुद्धां सरकार करीत नाहीं, व ज्यांनां कायद्याचा गंध सुद्द नाहीं. ज्यांचे इंग्रजींचे अध्ययन दाहाइयत्तेचें आंतच अशा लोकांनां सरकार मनसोक्त जागा देते, ही खरोखर आश्चर्यकारक गोष्ट नव्हे कां? निःपक्षपात, गुणग्राहकत्व, व प्रजा हितचिंतकांत वगैरे अनेक गुण राज्य कर्त्यांच्या आंगीं असणें अगदीं अवश्य आहे. व ह्या गुणांचा जेथें आभाव असेल तेथें न्याय, शांति वगैरे प्रजेच्या हिताच्या गोष्टी असण्याचा संभव नसतो. विद्याहीन, अकिंचन, व सरकार चरणारविंदी मिलींदायमान लोकांकडून, न्याय व प्रजेचें कल्याण कधीं ही होणार नाहीं. अशा प्रकारच्या अन्याय रूपवर्तनावरून सरकार प्रजेस न्याय देण्याविषयीं किती तयार आहे.

सरकारानें हातांत धारवाडी काटा घेऊन सदा सर्वकाळ चालावें असें आमचें ह्मणणें नाहीं व तशा रितीनें चालणें हीं बहुतेकांशीं असंभवनीय आहे. परंतु अगदींच डोळे झांक करून खरें वर्तन ठेवणे हें ब्रिटिश सरकारच्या शुभ न्याय पटावर मोठें दूषण आहे. असेंच पूर्वीं रा. रा. नारयण पांडुरंग जोशी ह्यांची नेमणूक झाली. रा. रा. नारायण हे हुषार आहेत व पुढें हायर स्ट्यांडर्डची परीक्षा ही पास झालें. परंतु नेमणुक होण्यापूर्वीं ह्यांची कायद्यांची परीक्षा पास झाली नव्हती. असें असून कायद्याचें जेथें पूर्ण ज्ञान असणें अगदीं जरूर आहे अशा ठिकाणीं एकदम त्यांनां नेमून टाकिलें त्यावेळीं ही पत्रांनी बरीच ओरड केली. परंतु ती ओरड केवळ अरण्यरूदिनोपम झाली. आतां ही तसाच प्रकार घडून येण्याचा संभव आह्मांस दिसतो ह्मणून आह्मी आपले विचार प्रदर्शीत केलें. आमचें ह्मणणें व्यक्तिस अनुलक्षून बिलकुल नाहीं. कारण आह्मांस पक्कें माहीत आहे कीं, रा. रा. सुब्बराव हे हल्लीं ह्या तहशिलदारा पेक्षां पुष्कळ हुषार आहेत. परंतु सरकारचें करणें सहज नियमास बाधक होते ह्मणून आह्मास फार वाईट वाटतें. सरकार आपण केलेला ठराव मोडण्यास किती नाखुष असावें व असतें हे रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी ह्यांच्या ए० इ० च्या जागीं नेमणुकीवरून स्पष्ट दिसून येतें. मे० सांडर्स व कर्नलरास ह्या मिनिस्टर एटकीन ह्याची चांगली शिफारस केली. असतांही आपल्या नियमाला बाध न यावा ह्मणून लार्ड डफरीन साहेब यानि मी. माहजनी यांस जागादीली. अशा प्रकरची उदाहरणें ढळढळीत दिसत असतां ही अंधाप्रमाणें वर्तन असणें फार शोचनीय आहे.


# The Berar Samachar

MONDAY 18 OCTOBER

1886


## COTTON MARKET RULES OF THE AMRAOTI MUNICIPALITY.

We understand that a petition signed by a number of Amraoti people has been submitted to the Amraoti Municipality, regarding some of the Cotton Market Rules framed by that Municipality. We have not been informed of how the petition has been disposed of by the Municipality on the 9th October which day was fixed for considering the petition; we are therefore inclined to say a few words regarding the objections raised by the petitioners.

The rules have been framed after the Khamgaon Cotton Market Rules. The petitioners first complain about the three annas per boja, allowed as trade allowance to the buyers. Until now the buyers used to receive two seers and a half of cotton per boja; instead of that the sellers will have now to give three annas per boja. Pecuniarily this is we suppose a distinct gain to the sellers; for 2 and half seers of cotton are certainly worth more than 3 annas. But what the petitioners object to is, we believe, that the three annas per boja rate will be felt by the sellers as entirely a new imposition. The Kunbi will hardly comprehend that this 3 annas per boja rate is better than 2½ seers of cotton; he would not feel the burden if at weighing so much per boja would be deducted, but he would feel it when the 3 annas per boja are deducted at time of payment. It will appear that much must depend on how the Kunbi would look upon the matter; for, if once he thinks that he has to pay more if he takes his cotton to Amraoti Market, he would rather go to Karinja, and Dhamangaon and other markets where he would not have to pay anything of the kind. Some merchants have observed that even during the past two yeas the markets named above are drawing off not an inconsiderable portion of the Cotton traffic at Amraoti, and if the new rules now framed are to be brought into force from the coming season these are chancea that Amraoti cotton traffic will be seriously affected and perhaps checked. If the objection of the petitioners be looked to in this light, we think the Committee might be inclined perhaps to change their rules regarding the new imposition of 3 annas per boja. We are ourselves inclined to think, however, that the three annas per boja is really to the interest of the seller and the Committee would not be wrong if they keep the new rule as it is, without being afraid of the consequences.

The other point raised in the petition is about the market cess of within one anna per boja to be levied upon all sellers of cotton in the Amraoti Cotton Market and to be collected on behalf of the Cotton Market Committee by the buyers. At Khamgaon, four pies only per boja are levied and not from the sellers but from exporters of cotton that is mostly the buyers. At present the cess is one anna and there is no likelihood of the rate being reduced, but the chief question is who is to pay the cess? At Khamgaon the buyers pay it, then why should they not pay it up here? If the rules have been framed after the Khgmgaon model why not adopt the rule about who is to pay the Market cess? There is we are informed an old resolution of the Amraoti Municipality that the Market cess is to be paid by the buyers; but the rule has never been acted upon and has been a dead letter on the record of the Municipality ever since it was framed. The reason of this is not far to seek. The Cotton

yard Committee consisting mostly of persons interested in Cotton traffic, they have always carried on matters in their own way, looking to their own interests and not to the interest of the sellers. The sellers are ignorant Kunbis, who hardly know what rules are in force as to who is to pay the Market cess or in fact any rule at all. They are guided by a knot of interested Dalals and the *burra Sahebs* who appear to be the presiding deities of the Cotton Market. A desire to throw the burden on the sellers on the one hand and the stolid ignorance of rules on the other has been the reason of the rule above referred to not having come into force. The fact that a Municipal Resolution passed at a General Meeting of the Committee should have remained a dead letter reflects very uncreditably on the body corporate.

The argument as the injustice of the cess being paid by the sellers becomes stronger when we consider that under Rule 12 of the New Cotton Market Rules at Amraoti the *tuckai* or charges for weighing are also to be paid by the sellers at the customary rate of one and half anna per boja. In the Khamgaon Rules no mention is made of who is to pay the charges for weighing; but in the absence of any such rate we may take it that these charges have to be paid by the owner of the *tucks* or in other words the buyers. At Amraoti there is a man who is said to have a right of getting all cotton whatsoever coming to Amraoti, weigned by his men at his *Dandi*; and his right is recognized practically by the weighing being carried on at every *tuck* by his men. There is no such person at Khamgaon and consequently we may presume that the *tuckwallahs* keep their own weighers and also they have to pay them out of the general establishment. If such be the fact this *tuckai* charge must be an additional burden on the sellers.

The new weights—the English weights are to be introduced from this cotton season. According to the new weight a boja will consist of 11200 Rs. weight of cotton. This increases the weight of the boga for the differences between the weight of the present boja and the new one that will come into existence will be something like 500 rupees. The rate of the boja will not be raised in proportion; for although it seems a sound argument that if the weight increases the rates would rise in proportion, still as a matter of fact, the Kunbis are so ignorant that they will not know what rate to demand on account of the increase in weight but will lose so much more weight of cotton per boja without getting anything in return. This is not one of the arguments advanced in the petition, but we simply put it to the Committee as a matter for consideration.

Another noticeable thing in the new rules is the practical monopoly created by the Rules in favor of buyers regarding the right to elect members for and sit in the Cotton Yard Committee. Under the last cluse of section 2 of the Rules, persons who can show to the satisfaction of the Cotton Committee that they have sold in the Cotton Market as principals or agents on an average of two years three hundred bojas a year shall on application be registered. We must say that the number of bojas required to be sold before one can be entitled to be a registered merchant is such that practically the buyers alone can be registered. The rules ought to be amended so as not to make it s exclusive.

One more point about the Dharam Fund which the petitioners have raised, we are not concerned to discuss since it has nothing to do with the Cotton Market except the fact that those engaged in the Cotton traffic have by *private* arrangement provided for a charitable Fund. We shall consider the point separately in another issue.

---

We record with feelings of deep satisfaction that the Government of India have at last issued a resolution for appointing a commission to consider the question of admitting natives into all the higher branches of civil service. Our late Viceroy the Marquis of Ripon endeavoured much to raise the limit of age which has been reduced to 19 to allow native youths to appear for the competitive civil service examination which is annually held in England. His efforts however were doomed to be futile. But the financial embarsssment caused by the low rate of exchange, the increase of expenditure to strengthen the military resources of the country consequent upon the repeated aggressions of Russia on the northern borders of India has necessitated the appointment of the commission to relieve the pecuniary resources of the country. The recent war with Burmah alo has done much to enhance the pecuniary distress of the country. The object of the commission is to inquire into the system under which natives are admitted to the civil service of the Government of India.

---

The Viceroy has been directed to form a commission of 14 members representing all the sections of the native community of which Sir Charles Aitchison has been appointed president. The whole public press in India agress in saying that Lord Dufferin has showed his extreme judiciousness in nominating the right man in the right place. The local Government of Madras, Bombay, Calcutta and North-west provinces are invited each to submit to the Viceroy names of three officers of which the Viceroy will select a representative oi each province as members. The Viceroy also resorve the power of making nominations so that the native public opinion should be adequately represented on the commission.

---

## वऱ्हाड.

हवामान—रोज थोडासा पाऊस पडत च आहे. व असाच जर सारखा पडत राहील तर नुकसान होण्याचे चिन्ह आहे. थंडी पडण्याचे दिवस असून ही अद्याप पावेतों दिवसास तर उष्मा होतच आहे. उन्ह हो कडक पडते. गावांत रोगराई झणण्या सारखीं नाहीं.

---

रा. बनसीलाल मुकुंदलाल यानवरील पहिले दोन मुकदम्याचा निकाल गेले आठवड्यांत ता० १३ रोजी खामगांवीं मि. हेमर साहेब यानीं सांगितला पहिले मुकदम्यांत १ दिवसाची साधी कैद व १०० रु. दंड केला व दुसरे मुकदम्यांत आरोपी यास दोषमुक्त केले तिसरे मुकदम्याचा अद्याप निकाल झाला नाहीं. तो झाल्यावर ह्या संबंधानें आह्मास काय लिहिणें आहे ते लिहू.

---

रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर बि. ए. आ. हेडमास्तर उमरावती हायस्कूल यांस मे. डायरेक्टर साहेबांचे शिफारशी वरून मे. रेसिडेंट साहेब यानीं त्याच जागीं २५० रुपयांवर कायम केलें. त्यांचे जागीं रा. रा. हरी रामचंद्र रोहणखेडकर बि. ए. यानीं फर्स्ट असिस्टंटचे जागीं १५० रुपयांवर एथील हायस्कुलांत कायम केले. रा. रा. रामचंद्र आबाजी पन्हाळकर यांस उमरावती हायस्कुलांत व रा. रा. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर बि. ए. यांस आकोला हायस्कुलांत १०० रुपयांवर सेकंड असिस्टंटचे जागीं कायम केले.

---

कर्नल फिटझरल्ड साहेब यवतमाळचे डे. क. हे पुढील महिन्यांत रजेवर जाणार व त्यांचे जागीं कर्नल थाम्सन साहेब यांस नेमणार असें कळते.

---

कर्नल बुलक साहेब डे. क. उमरावती हे दोन वर्षांचे फर्लोवर जाणार व त्यांचे जागीं मे. ग्रयांट साहेब यांस जावे लागेल असें समजते.

---

मि. शापुरजी विरजी तहासिलदार खामगाव यांस आकोले एथें मि. मुबारक आली तहसिलदार आकोट यांस खामगावास व रा. रा. कृष्णराव हरी कोल्हटकर एथील तहशिलदार यांस आकोट एथें बदलणार अशी दाट वदंता आहे.

---

आज पासून उमरावती एथें हायर व लोअर स्टांडर्डचे परिक्षेस सुरूवात होणार.

---

यंदाचे वकिलीचे परिक्षेंत रा. रा. शंकर गोविंद हे एकटेच पसार झाल्याचे आह्मास खात्री लायक आधारावरून कळते. सदर्हू गृहस्थ आमचे एथील प्रसिध्द वकील रा. रा. पांडुरंग आण्णा यांचे धाकटे बंधू आहेत.

---

मि. रामजी शालिग्राम पोलीस इनस्पेक्टर यांचा १६-१७ वर्षांचा मुलगा एथील हायस्कुलांत शिकत असे. एक दोन दिवसांत वार्शिक परिक्षा सुरू होणार ह्मणून मोहरमातील ढोलाचे आवाजाचे गडबडीमुळें कांहीं मुलांसमवेत अभ्यास करण्या करिता ह्मणून मे. डायरेक्टर साहेबांचे बंगल्या नजीक झाडाखालीं गेला. त्या ठिकाणी एक मोठा नवीन गडा खोदला आहे त्यावरून उडी मारून पलीकडे जाण्याचे उद्देशानें उडी मारली परंतु उडी पलीकडे नजाता दुसरे बाजूचे काठावरच पडल्यामुळें एकापायास फारचमोटी दुखापत झाली. म्हणजे गुडघ्याचे खाली पायाचा आगदीच तुकडा पडला आहे. डाक्तरी औषोधपचार वगैरे चालू आहेत. इश्वर त्यास लवकर बरें करो असे आम्ही इच्छितों.

---

रा. रा. विश्वनाथ मोहोनिराज यांस तळेगांव दशसहस्त्र एथें हेडमास्तरचे जागीं ७५ रुपयावर, रा. रा. बळवंत विष्णू वैद्य यांस स. डे. ए. इ. च्या जागीं ६० रुपयावर, रा. रा. गोविंद नारायण बुद्रुक यांस दर्यापुरास हेडमास्तरचे जागीं ५० रुपयावर, रा. रा. उध्दव माहादेव वारे यांस गलका पुरास से. आ. च्या जागीं ४० रुपयावर, रा. रा. मनोहर नारायण मोहोळकर यास एथील इं. म. शाळेंत थर्ड आसिस्टंटचे जागीं ३५ रुपयावर व रा. रा. मार्तंड बजाबा प्रधान यांस डायरेक्टर साहेब यांचे आफिसांत फिफ्थ क्लार्कचे जागीं ३० रुपयावर कायम केले.

---

गेले आठवड्यांत रा. रा. गणेश बापूजी यानीं आकोठ ऐथील ए. आ. क. चे कोर्टाचा चार्ज घेतला व रा. रा. देवराव जयकृष्ण ए. आ. क. शनिवारीं एथें येऊन रात्रीचे गाडीनें परिक्षे करितां उमरावतीस रवाना झाले व परिक्षा संपल्या नंतर परभारे यवतमाळास आपले कामी रुजू होण्याकरितां जातील.

---

मि. लेस्ली सांडर्स साहेब कायमचे रेविन्यु कमिशनर हे गेले आठवड्यांत रजेवरून परत येऊन ता. १४ रोजीं आपले कामाचा चार्ज घेतला त्यांस भेटण्या करितां कर्नल मेकन्झी साहेब व कर्नल रेनिक साहेब हे मुंबईस गेले होते.

---

## वर्तमानसार.

पंढरपुराकडे पिकें चांगलीं आलीं आहेत. विजयादशमीस यात्रा २०००० बाहेरची श्रीविठोबांचें दर्शनास आली होती अद्याप भक्तिभाव येवढा तरी कायम आहे ही चांगली गोष्ट.

पुण्यास "रे" नावचा मारकेट (बाजार) खुला झाला.

ब्रह्मदेशांत पाठविलेले लष्करांत मांदगी उत्पन्न झाली आहे.

धुळ्याकडे पर्जन्य वृष्टी होऊन अखेर पिकानी तोंडें मुरडलीं.

फ्रान्स आणि मादागास्कर यांजमध्ये नवीन तोड उत्पन्न झाली आहे.

बडोद्यातील उत्तम न्यायाधिश केशवराव बामन कीर्तनें यांस ता० २८ रोजीं देवाज्ञा झाली.

इजिप्त कडून आलेली बातमी सांगते कीं, उसमान डिगमा फौजेतील २०० लोक छाटून टाकले.

धारवाडचे मामलेदाराचें चिरंजीव १३ वर्षांचे शाळेतून घरीं येत असतां मध्यंतरी कोणी दुष्टांनी घाला घालून प्राणनाश केल्याचे समजते.

निझाम व त्यांचे दिवाण यांच्यांतील चालूं वैमनस्याचें मूळबीज कोठें आहे हें अजून बाहेर आलेलें नाहींच आणि तें कदाचित् यापुढेंही बाहेर येणार नाहीं, पण तें बीज कोठेंही असलें तरी आपसांतील तंटा आपल्याच नाशास कारण होतो हें तत्व त्यांच्या ध्यानांत कसें येत नाहीं याचें मोठें नवल वाटतें. राजकारस्थानांत प्रविण अशा निझामाचे आपण वंशज आहों ही गोष्ट जर हल्लींच्या निझामाच्या मनांत घोळत असेल तर हें वैमनस्य नाहींसें करून टाकण्यास त्यांस एक क्षणभरही अवकाश लागणार नाहीं, त्याचप्रमाणें बळकावलेला वऱ्हाड प्रांत परत मागण्याच्या बाबतींत भगिरथ प्रयत्न करणार व त्या प्रयत्नांत स्वतांच्या हिताकडे न पाहतां निझामाच्या गादीच्या हिताकरितां अश्रांतश्रम करणारे सर सालरजंग यांचे आपण प्रत्यक्ष चिरंजीव आहों आणि आपल्या वडिलांनी जें काम करण्याचें मनांत आणिलें होतें तें पुरें होण्यापूर्वींच ते मरण पावले ही गोष्ट जर हल्लींच्या दिवाणांच्या मनांत घोळत असती तर आज त्यांचें जें तरुण निझामाशीं वैमनस्य असल्याचें दिसत आहे तें मुळींच पडलें नसतें. निझाम व त्यांचे दिवाण यांनीं गवरनरजनरल लार्ड डफरीन यांस मध्यस्त घेतल्यावांचून व ते मध्यस्थी करण्यास येण्याच्यापूर्वीं एकत्र बसून जर वरील प्रकारचा विचार केला आणि आपल्यांतील द्वैत मोडून ऐक्य केल्याचें जर प्रसिद्ध केलें तर त्या उभयतांच्या शहाणपणाची मोठी कीर्ती होणार आहे. आपसांतील विवादाचा तंटा कोर्टांत नेणे हें स्वतांच्या शहाणपणास गौणत्व आणणारें आहे आणि मध्यस्त किंवा लवाद नेमून घेणे हें कोर्टांत जाण्यासारखेंच आहे, याचा त्या उभयतांनीं विचार करणें जरूर आहे.

पनवेल, कर्जत व उरण या भागांतील शेतकरी वगैरे खालच्या प्रतीच्या सर्व लोकांनीं आपसांत एकत्र जमून दारू न पिण्याचा निश्चय केला आहे आणि या जातीच्या नियमाविरुद्ध जो दारू पिईल त्यानें जातीस ५० रुपये दंड द्यावा आणि शिवाय दारू पिणारानें आपली एक मिशी काढावी असें ठरविलें आहे. दारू पिणारास जो पकडून देईल त्यास ५ रुपये इनाम देण्याचें ठरविलें आहे. हा त्यांचा असा निश्चय झाल्यामुळें आपकारी मक्तेदार भिकारी होण्याच्या पंथास आला आहे आणी त्यानें आपली ही कागाळी त्या त्या कलेक्टरांस कळविल्यावरून कलेक्टर हे लोकांनीं हा आपला नेम कायम ठेवूं नये असें सांगण्याकरितां त्या त्या ठिकाणीं जाणार आहेत असें सांगतात. कलेक्टर हे त्या त्या ठिकाणीं जाऊन उपदेश करूं लागल्यास काय काय उपदेश करतात हें कोणी कळविल्यास ऐकण्याची इच्छा आहे.

सरदार महंमद अफजलखान यांस गव्हरनर जनरलांनी नवाब असा किताब दिला.

हर्णैपर्यंत रेलवेची सर्व तयारी झाली असून केटाच्या पुढें कंदाहारपर्यंत रेलवे करण्याची सर्व चालूं आहे असें सांगतात.

त्रिचनापल्ली येथील लोकांनी जो व्यापार धंदा बंद केला होता तो पुन्हा १ ल्या तारखे पासून सुरूं झाला.

स्पेनदेशांतील दंगेखोरांस न्यायाच्या कोर्टांनी देहांत शिक्षा दिली, पण राणीनें माफी द्यावी अशी प्रधानमंडळानें शिफारस केली.

ऐर्लंडच्या बाबतींत माझा उद्योग अजून चालू आहे व योग्य रीतीने निकाल होण्याचा दिवस लवकरच येईल असें मि. ग्लाडस्टन यांनीं ऐर्लंडच्या डेपुटेशनास सांगितलें.

डेकन कालेज आजी बंद होणार, गुजराथ कालेजची योग्यता कमी होणार आणि हायस्कुलें वगैरेची फी वाढणार अशी जी बातमी आहे त्याबद्दल काटकसर कमेटीस विनंती करण्याकरितां आपली एक जनरल सभा भरविण्याचा मुंबई प्रेसिडेन्सी असोशिएशन सभेचा उद्योग चालू आहे.

गव्हरनर जनरल हे येत्या महिन्यातील आपल्या प्रवासांत हिंदुस्थानातील फ्रेंचांचें संस्थान जें पांदेचरी तेथेंही जाणार आहेत.

धुलिपसिंग महाराज हे हल्लीं पारिस येथें असून व्यापारी किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारचे इंग्लिश लोक यांच्याशी दळणवळण ठेवूं इच्छित नाहींत असें सांगतात. ते आपली बायको व मुलें यांच्यापासूनही अलग राहूं इच्छितात असें त्यांच्याकडुन प्रसिद्ध झालेल्या एका लेखावरून दिसते. ता. २८ आगष्टच्या डेलिटेलिग्राफ नांवाच्या एका बिलायती वर्तमानपत्रांत महाराज धुलिपसिंग यांच्या सहीची एक जाहिरात प्रसिद्ध झाली असून त्यांत असें प्रसिद्ध केलें आहे कीं, इंग्लंडांत जी माझी कांहीं मालमिळकत आहे ती सर्व माझी पत्नी महाराणी धुलिपसिंग व माझी मुलें यांस त्यांच्या उपयोगाकरितां दिली आहे यापुढें त्यांणी केलेल्या कर्जास अगर त्यांणी माझ्या नांवानें कोणाकडून कांहीं जिन्नस वगैरे घेतल्यास त्याच्या किंमतीस मी जबाबदार नाहीं. नबाब रणजितसिंगाच्या प्रत्यक्ष मुलास असला लेख वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्याची पाळी येणे हें त्यास, व त्याच्या जातीच्या लोकांस व त्याच्या देशास मोठेंच लाच्छनीय दिसतें.

हिंदुस्थानसरकार नेपाळी लोकांची नवी एक पलटण भरण्याचा विचार करीत आहे. अ०

थीबा राजे स्वदेशास व वैभवास मुकून जरी रत्नागिरींत येऊन पडले आहेत, तरी आपल्या देशबांधवांबद्दल त्यांची सदयता अजून जागृत आहेच. ह्या हताश राजेश्वरांनीं ब्रह्मी वर्ष प्रतिपदेच्या दिवशीं ब्रह्मदेशांतील गोरगरिबांस धर्मोपदेशकांस धर्म करण्याकरितां बरीच रक्कम रत्नागिरीहून तिकडे पाठवून दिली असें 'बंगाली' पत्रांत लिहिलें आहे!

विंचवाच्या विषावर धोतऱ्याचीं पानें हातावर चोळून दंशावर लावावीं ह्मणजे तावडतोब विष उतरतें. विंचवाच्या विषावर नवसागर आणि हरताळ हीं पाण्यांत उगाळून दंशावर लावावीं ह्मणजे तत्काळ विष उतरतें. न्या. सु.

ब्रह्मदेशाचें नशीब तर फिरलेंच आहे तेव्हां त्याच्या संबंधानें विशेष निराळा विचार व्हावयाचाच नाहीं. परंतु बिचाऱ्या हिंदुस्थानदेशास ब्रह्मदेशाच्या सांनिध्यामुळें विपत्ति भोगणें प्राप्त झालें आहे. इंग्रज लोकांच्या लोभाविष्टपणा निमित्त हिंदुस्थानांतील लोकांचें जीवित व वित्त खर्च व्हावें असा त्या न्यायी पार्लमेंटांत ठराव झाला. ऐर्लंडच्या संबंधानें पार्नेल साहेबांनीं, इंग्रज लोक व प्रधान मंडळ, यांचे डोळे उघडण्याकरितां व त्यांच्या मनांत दया उत्पन्न होऊन जमीनदार लोकांच्या प्राणघातक अशा जुलमापासून अनाथ व अन्नान्नगत झालेल्या शेतकऱ्यांस निदान तूर्त हिवाळ्यापुर्ती तरी सवड करण्याकरितां पराकाष्टा केली, परंतु सर्व व्यर्थ झालें.

जमादार लोकांनीं ब्रह्मी भाषा लक्ष लावून शिकावी ह्मणून हिंदुस्थान सरकारानें १८०, रु. ३६० रु. व ५०० रु. अशी तीन बक्षीसें ठेविली आहेत.

ट्रिचिनापल्ली येथील बाजारांतील लोकांनीं प्राप्तीवरील कर व तेथील मुनिसिपाल कमिटीनें वाढविलेला कर देण्याची आपली नाखुषी आहे असें दाखविण्यास्तव दुकानें बंद केली आहेत.

अयोध्येच्या नबाबच्या घराण्यांतील भोबनांराच्या बेगमनी आपल्या कांहीं नातलगांस व त्यांच्या वारसास एक कोट रुपयांचें व्याज देण्याचा ईस्ट इंडिया कंपनीशी करार करून त्याप्रमाणें सन १८७१ सालापर्यंत व्यवस्था होत होती. नंतर या सालीं हिंदुस्थान सरकारानें ज्यास कायदेशीर रीतीनें तें व्याज मिळत होतें तें बंद केलें. अशी चूक कशी झाली असें आतां बिलायतेंतील परदेश संबंधी खात्यांतील वरिष्ट अधिकाऱ्यांनीं हिंदुस्थान सरकारास विचारले आहे असें ह्मणतात. असा इंग्रज सरकारानें १५ वर्षे विश्वास घाताचा क्रम चालविला होता असें ह्मणतात.

आस्ट्रियामध्यें महामारीचा उपद्रव झाला आहे.

फ्रान्स देशांत दक्षिणोत्तर एकमोठा कालवा बांधण्याचा विचार चालला आहे.

गेल्या सालीं विलायतेस २१५००००० पेटंट औषधें झालीं व त्याचें उत्पन्न इंग्रज सरकारास १७९००० पौंड झालें.

हानमकोंडा येथें एका मनुष्यास १६ वर्षेपर्यंत चौकशी करितां बेड्या घालून तुरुंगांत ठेविलें होते त्यावर आतां कांहीं गुन्हा लागू होत नाहीं ह्मणून अधिकाऱ्यांनीं सोडून दिलें असें डेकन टैम्सवरून समजतें.

फ्रेंच आरमारांतील मोशो आलेफेड डोमोलियन नांवाच्या अंमलदारानें हवेंतून चालविण्याची एक होडी केली आहे. तिचा आकार पाण्यांतून चालणाऱ्या होडी प्रमाणेंच असून त्याप्रमाणें ही होडी हवेंतून चालविता येते. हिचा लढाईच्या वेळीं अतिशय उपयोग होईल असें ह्मणतात.

फिलाडेलफिया येथील एका डाक्टरानें विजेच्या साह्यानें केस नाहींसे होण्याची युक्ती काढली आहे त्यायोगें दोन तीन वर्षांत शरीराच्या कोणत्याही भागावरचे केस अगदीं राहत नाहींत परंतु त्रास फार सोसावा लागतो.

सयामांत एक प्रकारच्या झाडाच्या साली पासून कागद करतात.

राशियन सरकार येत्या वसंत ऋतूंत कानस्टांटिनोपलवर स्वारी करणार अशी सर्व युरोपांतील लोकांची खात्री झाली असून टर्की सरकारही लढाईची तयारी करीत आहे.

निजाम सरकारच्या हद्दींतील चूनचलगुंडा येथील तुरुंगांतील ४० जन्मठेपेचे कैदी सोडून दिले त्यापैकीं प्रत्येकानें २० वर्षांपेक्षां अधिक दिवस कैदेची शिक्षा भोगिली होती.

तात्या भिलास पकडून देणारास ३००० रु. देण्याबद्दल जाहीरनामे प्रसिद्ध झाले आहेत.

पुण्याच्या रिमाउंटमधील फलें कणारांनीं आपणास मुनिसिपाल कमिटीस जें भाडें द्यावें लागतें तें देण्याचें सामर्थ्य नाहीं ह्मणून गव्हर्नर साहेबांस अर्ज केला आहे.

आस्ट्रियन सरकारानें नवीन तऱ्हेच्या बंदुका आपल्या लष्करांतील लोकांस देण्याचा ठराव केला तिनें एका मिनिटांत ३५४० पर्यंत गोळ्या मारता येतात.

सुरतची गुलामबाबाची गिरणी जळाली होती ती पुनः ८०,००० रु. खर्चून बांधली व तिच्या कामास सुरवात झाली.

धुळें चाळीसगांव रेलवेची सर्व्हे ता. १ आक्टोबर पासून सुरू झाली असें ह्मणतात.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे येत्या नव्हेंबरांत इंग्लंडांत जाणार अशीं वदंता आहे. सु० प०

## स्त्रीपुरुष तुलना

साहसी कोण? पुरुष किंवा स्त्रिया?

हा सुरस निबंध सौ० ताराबाई शिंदे यांनीं रचिला आहे. पुस्तकें पुणें येथें श्री शिवाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलढाणें येथील रा० रा० बापुजी हरी शिंदे हेड क्लार्क नि० डे० कमिशनर यांजकडे व अकोलें येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणे. पुस्तक घेणारांस टपाल हशील पडणार नाहीं पैसे पाठविणारानें वर्तावळ्या सुद्धां पाठवावें.

## तयार आहे.

## हिंदुधर्म शास्त्र-भाग १ व २

( दुसरी आवृत्ति )

नामदार रा. सा. वि. ना. मंडलीक सी.एस. आय. यांचे.

किंमत ८ रुपये व हांशील आठ आणे पत्रें ( किंमतीसुद्धां ) ग्रंथकार यांस मुंबईत पाठवावीं.

सदरील पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीसाठीं ठेविलीं आहेत. व० स० कर्ते.

☞ हें पत्र आकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

साल अखेर " ७ " " १८
किरकोळ अंकास.................... ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०।

Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly............ 3 " 8 as
Single copy.............................. 4 as

Advertisements.
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOLXX AKOLA MONDAY 25 OCTOBER 1886 NO 42

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख २५ माहे अक्टोंबर सन १८८६ इ० अंक ४२

## हिंदुस्थानापासून इंग्लंडाचें हित.

(लिहून आलेला मजकूर)

रसिक राजनीतिज्ञ लोकांचें कांहीं ही ह्मणणें असो परंतु ही गोष्ट मात्र खचित् आहे कीं हिंदुस्थानांत आतां कांहीं त्राण राहिलें नाहीं असें जेव्हां इंग्लिश लोकांस पक्कें कळून येईल तेव्हां इंग्रज लोक हिंदुस्थानचे कांहींही होवो असें ह्मणून हिंदुस्थान सोडून जातील. पुष्कळ इंग्रज लोकांचे असें मत आहे कीं हिंदुस्थान ही एक सोनें व हिरे रत्नें यांची खाण आहे परंतु ही गोष्ट मात्र आतां भ्रांतीमूलक होय; कारण कीं या आमच्या सुवर्ण भूमिकेंतील द्रव्याचा बराच मोठा भाग इंग्लंडच्या खजिन्यांत पडला आहे व अजून ही पडत आहे. इंग्लंडांत तयार होणाऱ्या जिनसांचा खप हिंदुस्थानातील बाजारांत सर्वत्र होत आहे. थोडक्यांत इतकेंच सांगणें बस आहे कीं जर आमचा देश इंग्रज लोकांकडून अन्य लोकांच्या राजसत्तेखालीं असतां तर इंग्लडांत हल्लीं कपड्याचे जितके माग व इतर जिनसांची दुकानें आहेत त्यांच्या तीन चतुर्थांश इतके माग व दुकानें इंग्लडांत स्थापित झाली नसती, व या मानानें पाहिलें असतां असें दिसून येईल कीं आज इंग्लंडचा जितका ह्मणून फायदा होत आहे तितकाच हिंदुस्थानचा तोटा होत आहे. सर्वांत शोचनीय गोष्ट ही आहे कीं अजून पर्यंत इंग्लंडांत जे जे नवीन माग व दुकानें होत आहेत ते सर्व हिंदुस्थानच्या संपत्तिची भर पडल्यानें भरभराटीस येत आहेत! नुसत्या व्यापारा संबंधानें राहूंद्या परंतु दुसऱ्या अन्य मार्गांनें पाहिलें तरी आपणास असें दिसून येईल कीं इंग्लंडातील श्रीमंत गृहस्थापासून तों गरीब शेतकऱ्यां पर्यंत ही हिंदुस्थानांतील प्रत्येक "नै"त त्यांचा हिस्सा आहेच. हिंदुस्थानच्या प्रतिनिधींची त्याच प्रमाणें इलाख्यांच्या अधिकाऱ्यांच्या मोठ मोठ्या पगाराच्या जागा इंग्लंडांतलि श्रीमंत गृहस्थासच दिल्या जातात त्याचप्रमाणें रेसिडेन्ट, कमिशनर्स, जड्ज कौन्सिल व जिल्ह्याधिपति ह्मणजे कलेक्टरच्या जागावरही इंग्रजसाहेब बाहादुरांच्याच नेमणुका होतात. न्याय खात्यांकडेस दृष्टी फेकली तरी असें दिसून येईल कीं मोठमोठ्या न्यायाधिशांच्या जागाही आंग्लभौमानीच व्यापलेल्या आहेत त्याच प्रमाणें इंग्रज बॅरिस्टर व सालिसिटर्स हे आमच्या देशांतून किती द्रव्य नेत असतील याचा पत्ता नाहीं. न येतां इंग्लंडातच त्यांस आपला धंदा करावा लागता तर ते खचित इतक्या भरभराटीस आले नसते. तसेंच येट केप कन्याकुमारी पासून तों पेशावरा पर्यंत पाहिलें तर आपणास असें दिसून येईल कीं सिविल सर्जन्स व विद्या खात्यांतील मोठें मोठ्या पगाराच्या प्रोफेसरांच्या जागेवर ही इंग्रज साहेब लोकच आहेत. जर हे लोक हिंदुस्थानांत न येतां इंग्लंडांतच त्यांस आपला धंदा करावा लागता तर ते खचित् इतक्या भरभराटीस आले नसते. आतां आरमारा संबंधानें विचार केला तर आमचे वाचकास असें कळून येईल कीं हिंदुस्थान सारखे आवाढव्य खर्चाचें आरमार पृथ्वींतील कोणतेंही राष्ट्रांत आढळणार नाहीं. कारण हिंदुस्थानांतील आरमारांत पुष्कळ श्वेतवर्ण इंग्रज सोलजर लोकांचीच भरती झालेली आहे व होत आहे व त्यांचे पगाराचे मान पाहिलें तर आमच्या एका काळ्या शिपायाच्या पगाराच्या तिप्पट एका सोलजरास पगार! काय आश्चर्य! तसेंच लढाईचे सामुग्रीचा दारू गोळा वगैरे सामान ही इंग्लंडांतून येतो व या द्वारानें त्या दोन हजार कोस लांबीवरच्या बेटांत आपणास अजिंक्य ह्मणविणारे आर्य लोकांचे एका काळीं धनाढ्य असलेल्या देशांतून किती द्रव्य जात असेल याचा आपणास अदमास ही करितां येणार नाहीं. सारांश या इंग्रजी कलाकौशल्याच्या योगानें हिंदुस्थानचा अतिशय तोटा होत आहे. जर इंग्रज साहेब लोक पेनशन घेतल्यावर हिंदुस्थानांतच कालक्षेप करण्याचा विचार करते तर आपला थोडासा तरी तोटा भरून आला असतां परंतु ततें कोठून होणार! पेनशन घेतल्या बरोबर हिंदुस्थानांत मिळविलेल्या गठडीसह विलायतेंत व त्या बरोबरच त्यांचे जब्बर पेनशन! सारांश हिंदुस्थानवासीं लोकांची स्थिती भुंग्यांनीं पोखरलेल्या एखाद्या तुळई प्रमाणें सध्यां झालेला आहे. यास तूर्त उपाय ह्मणून आतां एवढाच राहिला आहे कीं ज्या इंग्रजी कलाकौशल्यानें आज इंग्लंड इतक्या पदवीस चढलेलें आहे तें कलाकौशल्याचे सर्व धंदे व कारखानें हिंदुस्थानवासीं जनांनीं आपल्या देशांत चालविण्याचा सतत प्रयत्न करणें होय ह्मणजे हिंदुस्थानांतलि व्यापाराचा व संपत्तीचा उपभोग घेण्याचा फक्त आंग्लभौमासच जो आज पर्यंत मक्ता मिळाला आहे तो कांहीं अंशीं तरी बंद होईल.

---

वऱ्हाडसमाचार

मित्ती आश्विन वद्य १३ शके १८०८

---

आफगाण बाउंडरी कमिशननें आपल्या देशाला एकंदर किती रुपयांची टोपी घातली आहे हें जर आमच्या लोकांना कळलें तर तें खरोखरच आश्चर्यानें थक्क होऊन जातील यांत संशय नाहीं, सन १८८४ पासून या महायज्ञाला खालीं लिहिलेल्या किमतीच्या एकंदर आहूती पडल्या.:—

सन १८८४-८५.... रु० १८,२९,४९६ सन ८५-८६ एस्टिमेंट.... रु० २५,००,००० ८६-८७ बजेट एस्टिमेट रुपये ५,००,००० एकंदर रुपये ४८,२९,४९६.

वरील कोष्टकांत दिलेले हालचे दोन आंकडें केवळ एस्टिमेंटचे आहेत. वास्तविक खर्च ८५-८६ सालीं किती झाला असेल व यंदा किती होईल याचा अदमास अद्याप झाला नाहीं. तथापि वास्तविक खर्च एस्टिमेटच्या बाहेर जाईलच. एकंदरींत या कमिशननें आह्मांला अर्धा कोट रुपयाच्या घरांत आणिलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या शिवाय व्हाइसराय साहेबांनीं खुद्द खर्चिले. "सिक्रेट सर्व्हिस" पैसा निराळाच. या पैशाची ऐन रक्कम किती आहे हें कोणाला माहीत नाहीं. कारण एक्झिक्युटिव्ह काउन्सिलच्या सभासदांखेरीज किती पैसा खर्चला हें दुसरें कोणासही विचारण्याची किंवा कळविण्याची परवानगी नसते. तथापि या रीतीनें सरहद्दीवर शांतता करण्यासाठीं व्हाइसराय साहेबांनीं सिमल्याच्या थंडगार हवेंत चैनीनें बसून खर्चिलेल्या पैशाची रक्कम बरीच विशाल असली पाहिजे यांत संशय नाहीं. आह्मांला असें समजतें कीं सिक्रेट सर्व्हिस पैशा शिवाय आफगाण कमिशनसाठीं आपल्याला सरासरीनें सालीना २५,००,००० रुपये खर्च करावा लागला. या शिवाय अमीर साहेबांना वारंवार दिलेल्या देणग्या पाठवण्या निराळ्याच. हें आफगाण बाउंडरी कमिशन बद्दल झालें या शिवाय "गिलजिटमिशन", "टिबेट मिशन" इत्यादि आणखी उरावर बसली आहेत. त्यांचा खर्चही कांहीं थोडा होणार नाहीं. आमच्या सरकारनें ही इतकी अवाढव्य रक्कम खर्च केली व तिचा बोजा आह्मावरच लादला त्या बद्दल मूळारंभी बेत झाला होता त्याप्रमाणें एखादी साधी भोळी "सर्व्हेपार्टी" नेमली असती तर पांच लक्षांतच काम झालें नसतेंकां!

आमच्या सरकारची या प्रमाणें हवी तशी उधळपट्टी भलभलत्या कामा कडे चालते आणि मग गळ्याला फास लागला म्हणजे बसवा इनकमटॅक्स आणि काढा दुसरे नवीन कर किंवा खजिन्यांत तूट येऊं लागली म्हणजे आमच्या सरकाराला त्याचा बचपा काढण्यास दुसरें एक साधन झालें आहे. जरा कुठें कांहीं कमी झालें कीं त्याची कसर बिचाऱ्या शाळा खात्यांत काढायाची शाळाखातें गरीब त्यांची दाद कोण घेतो. हायकोर्टा सारख्यांत कांहीं काटकसर करायला गेलें कीं तिकडून मिळते यापड या प्रमाणेंच दुसरी कडे. मग राहिलें बिचारें शाळा खातें. आह्मांला आतां असें समजलें आहे कीं मुंबईस फायनान्स कमिटीनें काटकसर करण्याच्या ज्या सूचना केल्या आहेत त्यांत सरकारी कालेजांतलि फी दुप्पट करण्यास व डेक्कन कालेज मुळींच उठाविण्याच्या सूचना प्रमुख आहेत. आह्मी ऐकतों हीगोष्ट जर खरी असेल तर आमच्या सरकारच्या हातून दुसरी घोड्या एवढी चुकी झाली नसेल असें आह्मी ह्मणतों. डेक्कन कालेजाला फाटा दिला असतां सालीना ५०,००० रुपये सेव्हिंग होतील खरें तथापि या कालेजासारखी नावारूपास आलेली पाठशाळा एवढ्याशा क्षुल्लक कारणासाठीं बंद करणें ह्मणजे केवळ मूर्खपणा होणार आहे. सरकारला आमच्या देशाचा जो वसूल मिळतो आहे त्याचा योग्य भाग सरकारनें लोक शिक्षणा साठीं खर्च केलाच पाहिजे हा खर्च जोपर्यंत सरकार करणार नाहीं तों पर्यंत प्रजेचीं मनें सरकारा विषयीं शुद्ध कधीं राहणार नाहींत. कायचमत्कार पहा. आमच्या गोऱ्या अमलदारांना चैनीनें हावाखात बसण्याला व लष्करी खात्यांत वाजवी पेक्षां फाजील रिकाम्या जागा ठेवण्याच्या सालीना लाखो रुपये आमच्या सरकाराला मिळतात आणि डेक्कन कालेजाचा खर्च चालविण्याची सरकारला शक्ति नाहीं! असो; सध्यां यासंबंधें सरकारचा ठराव वगैरे प्रसिद्ध झाला नाहीं तेव्हां आम्हांला कांहीं जास्ती लिहितां येत नाहीं. तथापि आमची विनंती आहे कीं फीनॅन्स कमेटीनें आपली कातरी चालविण्याला दुसऱ्या पुष्कळ जागा आहेत तिकडेच चालवावी शाळा खात्यांवरच एवढी करडी नजर देऊंनये. विनंतीकडे सदरहु कमीटी लक्ष देईल अशी आम्ही आशा करितों.

## आमच्या एज्युकेशनल कान्फरन्सास दोन सूचना.

मार्गशीर्ष, माघ किंवा वैशाख या महिन्यांत हिंदु लोकांमध्यें ज्या प्रमाणें लग्नाचीं जिकडे तिकडे गडबड उडून जाते त्या प्रमाणें आमच्या इकडील शाळा खात्यांत अक्टोंबर, नवंबर या महिन्यांत सगळीकडे गडबड झालेली असते. आणि

वास्तविक हे महिने शाळा खात्याचं लग्न सराईचेच आहेत. या महिन्यांत जिकडे तिकडे परिक्षा सुरू झालेल्या असतात. युनिव्हरसिटींच्या सर्व परिक्षा ही याच दिवसांत येतात याप्रमाणेच कित्येक ठिकाणीं शाळा खात्याचा उत्कर्ष होण्याकरितां नेमलेल्या निरनिराळ्या मंडळ्यांही याच दिवसांत भरत असतात. आमच्या वऱ्हाडांत तर या महिन्यांत शाळा खात्यामध्यें जिकडे तिकडे जी चळवळ झालेली असते ती विचारूंच नका. पावसाळा वरून प्रत्येक जिल्ह्याचे डेप्युटी इन्स्पेक्टर आपआपल्या जिल्ह्यांत शाळा तपासण्याकरितां दवऱ्यावर जाण्याकरितां निघालेले असतात. मिडल क्लास स्कूल्स आणि हायस्कूल्स यांच्या परिक्षा घेण्यांत ईन्स्पेक्टर साहेब व डायरेक्टर साहेब अगदीं गुंतून गेले असतात. युनिव्हरसिटीची मॅट्रिक्युलेशन परिक्षा जवळ येऊन ठेपल्या कारणानें तिची तयारी करविण्यांत हायस्कुलाचे हेडमास्तर आणि वरच्या प्रतीचे असिस्टंट मास्तर यांची अगदीं गडबड उडून गेलेली असते. इकडे परिक्षा संपताहेत तोंच एज्युकेशनल कान्फरन्सची तयारी सुरू होते व त्यांच त्यांचे मास्तर लोक मोठ्या उत्कंठेनें कान्फरन्स्च्या जागीं येऊं लागतात. यंदाच्या सालच्या कान्फरन्सला नव्हेंबरच्या तिसऱ्या तारखेस सुरवात होणार आहे तेव्हां या अंकांत या संबंधानें दोन शद्ब लिहिले असतां अप्रासंगिक होणार नाहीं.

आमच्या वऱ्हाडा सारख्या चिमुकल्या प्रांतांत शाळा खात्याची दिवसेंदिवस सुधारणा होत आहे व तें अधिकाधिक उत्कर्षाला आणण्या विषयीं आमचे मान्य डायरेक्टर साहेब नवीन नवीन उपाय योजित आहेत आणि ते सफल ही होत चालले आहेत ही गोष्ट खरोखरच मोठी अभिनंदनीय आहे. थोड्या वर्षांपूर्वीं वऱ्हाडांत शाळा खात्याची अवस्था कशी होती व आतां कशी आहे हें जर कोणी ताडून पाहील तर त्याला सानंदाश्चर्य झाल्या वांचून राहणार नाहीं. या सुधारणेला वास्तविक आरंभ आमचे मान्य डायरेक्टर साहेब रावबहादूर नारायणभाई दांडेकर यांच्या कारकीर्दी पासून झाला व त्या वेळेपासून हें खातें नदीच्या प्रवाहा प्रमाणें दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चाललें आहे. रावबहादूर भाईसाहेब दांडेकर यांनीं आपापले अलौकिक सामर्थ्यानें व चातुर्यानें शाळा खात्याला उत्तम स्वरूप आणलें खरें तथापि त्यांच्या कारकिर्दींत ही या खात्याला श्रेयस्कर अशा पुष्कळ गोष्टी पूर्णतेला यावयाच्या होत्या. त्यापैकींच थोड्या दिवसांत भरणारी एजुकेशनल कान्फरन्स होय. शाळा खात्यांत नावारूपास आलेल्या व अनुभविक लोकांनीं एकत्र जमून आपआपले विचार परस्परांना कळवून खात्याची सुधारणा करण्या करितां काय काय उपाय योजावे यांचा विचार करणें हा या कान्फरन्सचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश किती स्तुत्य व हितकर आहे हें पुनः सांगण्याची कांहीं जरूर नाहीं. या वार्षिक समारंभाची घटना भाईसाहेबाच्या कारकीर्दींत होऊन तिला सुरवातही त्यांच्याच कारकीर्दींत झाली. या मंडळीचे परिक्षक व शिक्षक असे दोन विभाग करून त्यांनीं आपापलीं कामें चांगल्या रीतीनें सफळ होण्या करितां काय उपाय करावे यांचा निरनिराळा विचार होत असतो व त्या प्रमाणें ज्याला जो विचार सुचेल तो तो आपल्या अनुभवा प्रमाणें सभेपुढें मंजुरी साठीं आणित असतो. तथापि खेदास्पद गोष्ट एवढीच आहे कीं हें स्तुत्य उद्देश ज्या प्रमाणें सिद्धीस जावे त्याप्रमाणें जात नाहींत. आजपर्यंत एकंदर दोन कान्फरन्स भरल्या परंतु त्यांत झालेल्या सूचना कितपत अमलांत आल्या असतील व त्यांचा शाळा खात्याला कितपत उपयोग झाला असेल याची आह्मांस शंका वाटते. शाळा खातें ह्मणजे सर्व खात्यांचा मायबाप आहे. इतर खात्यांत लागणारे लोक अगोदर याच खात्यांत तयार व्हावे लागतात. जनसमाजाची व देशाची बरीवाईट स्थिती या खात्यांतून मिळणाऱ्या बऱ्या किंवा वाईट शिक्षणावर अवलंबून असते. तेव्हां या खात्याची योग्यता किती आहे व हें ज्यांच्या आंगावर सोंपविलेलें असतें त्या गृहस्थांच्या आंगावर केवढी जबाबदारी आहे हें सांगणें नकोच. ही जबाबदारी सांभाळण्यासाठीं शाळा खात्यांतील लोकांना इतर खात्यांतलि लोकांपेक्षां अधिक परिश्रम करावे लागतात यांत संशय नाहीं; व या परिश्रमानुरूप यांना मान व वेतन मिळावें हेंही रास्त आहे. तें मिळतें आहे कीं नाहीं हा प्रस्तुतचा विषय नाहीं तथापि या संबंधानें शाळा खात्यांतील लोकांची कुरकुर रास्त आहे. असो.

आज दोन वर्षे या कान्फरन्सला जे गृहस्थ एकत्र जमत आहेत त्यांतील बहुतेक या खात्यांतील फार वर्षांचे वहिवाटलेले व अनुभवीक असे आहेत तेव्हां अशा प्रकारचे गृहस्थ एकत्र जमून आपलें खातें सुधारण्या करितां जर प्रयत्न करीत आहेत तर या प्रयत्नाला चांगलेंच फळ मिळाले पाहीजे आहे. तें कितपत मिळालें आहे याचा जर आपण विचार करूं लागलों तर गेल्या दोन वर्षांत सुधारणा आणि उपयुक्त सूचना अमलांत आल्याच्या गोष्टी फारच थोड्या आढळून येतील असें आह्मांस वाटतें. अशा या प्रकारच्या ज्या मंडळ्या स्थापन झाल्या असतात त्या स्थापन करण्यांत मुख्य हेतु शिक्षण पद्धतीची इमारत ज्या नियमित आणि खऱ्या मूळ तत्वांवर उभारण्याची त्यांच्या बऱ्या वाईटपणाविषयीं शोध करणें, त्यांना शिस्तवार लावून ठेवणें, आणि त्याविषयीं वादाविवाद करून त्यांचें विवरण करणें हा होय.-- आमची कान्फरन्स स्थापन करणाऱ्यांच्या मनांत हाच उद्देश होता व हल्लीं या कान्फरन्स साठीं जे शिक्षक आणि परिक्षक जमतात त्यांच्याही मनांत हाच हेतू असतो, परंतु हा हेतू नेईल तितका शेवटास नेण्याविषयीं उत्कंठा किंवा कळ कळ त्यांचे आंगीं असावी तशी बहुतेकांच्या आंगीं दृष्टीस पडत नाहीं. आतां कित्येक गृहस्थ आपल्या खात्याची आपल्या कडून होईल तितकी सेवा मनोभावानें करण्यास तत्पर होऊन या कान्फरन्स मध्यें पुढारी पणा घेत असतात खरें, परंतु कित्येक केवळ कान्फरन्सच्या निमित्तानें तरी आपले दूरदूरचे स्नेही भेटतील येवढ्या साठीं आलेले दृष्टीस पडतात. कित्येक तर चंच्या काढून खुशाल पान सुपारी खात आणि आपल्या फार दिवसांनीं भेटलेल्या स्नेहाबरोबर सुखदुःखाच्या किंवा थट्टा मस्करीच्या गप्पा झोकीत बसलेले दृष्टीस पडतात, आतां असल्या उपयुक्त समारंभाच्या वेळीं असले प्रकार किती लज्जास्पद आहेत हे सांगणें नकोच. त्याप्रमाणेंच ज्यांना कांहीं कान्फरन्स मध्यें थोडीशी कळकळ वाटत असते, ते फक्त आयत्या वेळेस ज्या कांहीं गोष्टी दैवयोगानें ह्मणा किंवा शाळाखात्याच्या प्रारब्धानें सुचतील त्या सभेपुढे आणून कसा तरी त्यांचा कोणच्या तरी पक्षानें सोक्ष मोक्ष करून टाकितात. आमच्या मतें ही गोष्ट ही वाईटच आहे. शिक्षणाची स्थिति सुधारण्या करितां नेमलेल्या ह्या मंडळ्यांनीं आपले हेतु सिद्धिस नेण्याकरितां शिक्षणाच्या संबंधानें लक्षांत ठेवण्यासारख्या जेवढ्या गोष्टी मिळतील तेवढ्या मिळवून त्यांचे वर्गीकरण केलें पाहिजे, शिक्षण या विषयासंबंधानें मोठमोठ्या प्राचीन व अलीकडल्या, मिलस्पेन्सर, बेन प्रकृति तत्ववेत्यांचीं निरनिराळीं मतें काय आहेत यांची माहीती करून घेऊन वर्तमान कालाला त्या मतांपैकीं कोणतीं हितावह व लागू पडण्या सारखीं आहेत याचा चांगला विचार करून त्या प्रमाणें निवड केली पाहिजे. त्या प्रमाणेंच सांप्रतच्या विद्वानांचीं मतें ही वारंवार वर्तमानपत्रांतून वगैरे प्रसिद्ध होत असतात त्यां विषयीं विचार करून त्यामध्यें ग्राह्य असेल तें घेतलें पाहिजे. शाळा मास्तर किंवा परीक्षक यांनीं वर्षभर आपापलीं कामें बजावीत असतां ज्या ज्या ध्यानांत ठेवण्या सारख्या गोष्टी आपापल्या कामाच्या संबंधानें दृष्टोत्पत्तीस येतील त्या त्या तेथल्या तेथें टिपून ठेविल्या पाहिजेत. सारांष ज्याला ज्याला ह्मणून या कान्फरन्स मध्यें एक मेंबर ह्मणून जाण्याचें मनांत असेल त्यानें त्यानें त्याची तयारी अगोदरच वर्षभर करून ठेविली पाहिजे. त्या प्रमाणेंच शाळाखात्याच्या बाहेरील इतर प्रसिद्ध विद्वान गृहस्थांनांही आमंत्रणें करून त्यांचीं मतें काय आहेत हें पाहिलें पाहिजे. अशा रितीनें आमची कान्फरन्स चालूं लागली तर आमचे लोकप्रिय व मान्य डायरेक्टर मि. जठार यांच्या श्रमाचें व चातुर्याचें बरेंच चीज होईल. असें आह्मास वाटतें. याप्रणें चालणारे कांहीं लोक हल्लीं आमच्या कान्फरन्स आहेतच पण ते फारच थोडे आहेत. यांचा कित्ता इतर लोकांनीं वळवावा अशी आमची त्यांस विनंती आहे विषय बाहुल्यानें आणि दुसऱ्या अनेक कारणांमुळें हल्लींची शिक्षण पद्धति पूर्ण नाहीं ही गोष्ट सर्वांच्या अनुभवास आलेली आहे व ती पूर्णता आणण्यासाठीं सगळीकडे अनेक तऱ्हेचे प्रयत्न सुरूं आहेत. या प्रसिद्ध गोष्टीचा विचार आमच्या कान्फरन्स मध्यें होत असेलच. शाळेंतील शिक्षणाच्या संबंधानें दुसऱ्या अनेक गोष्टी विचार करण्या जोग्या आहेत. हल्लीं बहुतेक ठिकाणीं असें आढळून येते कीं, गणित, भूगोल, इतिहास, वगैरे निरनिराळ्या ईयत्तेंत नेमलेले विषय मुलां जवळून पोपटा प्रमाणें पाठ करवून घेतले ह्मणजे मास्तर लोक आपलें कर्तव्यकर्म संपलें असें समजत असतात. शिक्षण या शद्बाच्या खऱ्या अर्थाकडे त्यांचें लक्ष बिलकुल नसतें. कुणीकडून तरी मुलें नेमलेल्या विषयांत पुष्कळ पास झालीं व बक्षिसें खूपशीं आलीं ह्मणजे आपण एकदाचें मिळविलें असें त्यांस वाटत असतें. हा दोष वऱ्हाडांतच काय पण देशभर पुष्कळ ठिकाणीं आढळण्यांत येतो. शिक्षण म्हणजे ईयत्तेला नेमलेला विषय पोपटा प्रमाणें तोंडपाठ करणें नव्हे. त्या बरोबर दुसऱ्या अनेक गोष्टी शिकाव्या लागतात. चार लोक ज्याला ज्याला सभ्यतेच्या चाली ह्मणतात अशा चाली लावून घेणें हें काम शाळेंत लहान असतांच करावें लागतें. लहानपणीं दुष्ट सवई लागल्या ह्मणजे त्याच मोठेपणीं कायम रहातात. सारांष ज्याला ज्याला चांगले लोक सद्वर्तन म्हणतात तें पूर्णपणें आंगीं असण्याला ज्या गोष्टींचें सहाय पाहिजे आहे त्या गोष्टी शिक्षण या सदरा खालीं आल्या पाहिजेत. मास्तर लोकांनीं ही गोष्ट अवश्य ध्यानांत ठेविली पाहिजे, व परिक्षक लोकांनीं ती ध्यानांत ठेवण्यास मास्तर लोकांस भाग पाडलें पाहिजे. कित्येक शाळेंत चांगलीं हुशार हुशार मुलें इतकी दांडगीं व असभ्य असतात कीं त्यांच्या त्या दुर्गुणानें हुषारपणाची अगदीं माती होऊन जाते. परीक्षेला येण्याची खबर मास्तर लोकांनां अगोदरच लागलेली असते त्यामुळें परीक्षेच्या वेळेस ते मुलांचा अगदी चापचोप बंदोबस्त करून बाहेरून मोठा सभ्य व चांगला देखावा दाखवितात. त्यामुळें कित्येक साध्या भोळ्या परिक्षकांनां आंतील व्यंग मुळींच दिसून येत नाहीं. जे वस्ताद असतात ते खरें नाणें चहऱ्या मोहऱ्या वरून तेव्हांच ओळखितात. एवढ्या साठीं कांहीं सूचना न देतां एकदम एखाद्या शाळेंत जाण्याची सवय कित्येक परीक्षकांस असते ती चांगलीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या बिषया संबंधानें कान्फरन्समध्यें विचार केला असतां फुकट जाणार नाहीं असें आह्मांस वाटतें.

अलीकडे हायस्कुलांतलि मुलांच्या आंगीं हा एक दुर्गुण दिसून येऊं लागला आहे कीं भाषेची शाळेंत जीं पुस्तकें प्रति वर्षीं वाचलीं जातात त्या पेक्षां अधिक एक ही पुस्तकें अखेर पर्यंत त्यांनां वाचतां येत नाहीं. याचें कारण विचारलें असतां "शाळेंतला अभ्यास करितां करितांच सर्व वेळ निघून जातो मग बाहेरचे वाचण्यास वेळ कुठला!" हेंच उत्तर बहुधा विद्यार्थी देत असतात. ही गोष्ट फार वाईट आहे. हिच्या योगानें इंग्रजी मराठी किंवा संस्कृत, या भाषेंत ते अखेर पर्यंत कच्चेच्या कच्चेच राहतात. मॅट्रीक्युलेशनला भाषेचा कागद जरी अनियमित असतो तथापि आतां त्या संबंधाची इतर पुस्तकें पुष्कळ निघाल्या कारणानें विचारण्या जोग्या साधारण गोष्टी त्यांतून पाठ करून विद्यार्थी कसे तरी पास होतात. परंतु एकंदरींत इंग्रजींत अर्थ करावयास सांगितला तर त्यांत शेकडों चुका होतात. त्याच प्रमाणें संस्कृतची गोष्ट आहे. हिच्या योगानें विद्यार्थ्यांचें फारच नुकसान होत असतें. एवढ्या करितां जेणेंकरून त्यांना एक्स्ट्रा रिडींग करण्याची सवय लागेल किंवा त्यांत गोडी वाटेल अशा गोष्टी करण्या विषयीं

विचार व्हावा. या शिवाय बारीक सारीक अनेक गोष्टी शाळाखात्यांत विचार करण्या जोगया आहेत. त्या सर्वांकडे प्रसंगानुसार लक्ष देऊन निकडून शाळाखात्याची दिवसें दिवस सुधारणा होईल असे उपाय योजण्याच्या उद्देशानेंच आमच्या शाळाखात्यांतील लोकांनीं कान्फरन्सला येण्याची तसदी घ्यावीं अशी आमची त्यांस सविनय विनंती आहे. यंदाच्या कान्सरन्त पासून शाळा खात्याला खरोखरच हितावह अशा पुष्कळ गोष्टी बाहेर पडतील अशी आशा करून हा लेख आम्ही संपवितों.

The Berar Samachar

MONDAY 25 OCTOBER

1886

## HINDU SOCIAL REFORM.

The following is the telegraphic summary of the Resolution issued by the Government of India on the subject of early marriage and enforced widow-hood. The people of the country were afraid that the Imperial Government would be disposed to take an action in the matter of their social laws enjoined and regulated by custom from time out of mind. We cannot too sanguinely congratulate the Government of India in thus setting at rest the fears of the population by promulgating in clear and unmistakable language that no interference with the marriage laws of the community is desired by Government and Government is not prepared in the face of the unanimous opinion of all local Governments to take any action in the matter. It was Mr. Malbari who made a move on the subject of these two customs which have given it a world wide prominence and brought it to the notice not only of the principal Europeans in India but also in England. The cause was even referred to Her Majesty for her own views and her sympathy for the fair sex was ardently invited. The Resolution gives two suggestions which do not seem objectionable to the Government on the ground of principle but even here Government is not disposed to interfere until sufficient proof is forthcoming that legislation is required to meet a serious practical evil.

"A resolution of the Home Department is published on the subjects of infant marriage in India and enforced widowhood. The resolution states that copies of Mr. Malbari's notes on the above subjects were forwarded to local Governments and administrations with the remark that the subjects were of great importance to the social well-being of the people, and that the Governor-General in council would be glad to receive any observations which the local authorities might desire to make on them. All the replies from the local Governments and administrations have now been received. While regarding with sympathy Mr. Malbari's efforts all the local Governments and administrations exhibit a complete unanimity of opinion against adopting legislative action and imposition of executive disqualifications. After careful consideration, the Governor-General in Council agrees with the unanimous conclusion arrived at on the subject by the local authorities. In dealing with such subjects as those raised in Mr. Malbari's notes, the British Government in India has usually been guided by certain general principles. For instance, when caste or custom enjoins a practice which involves a breach of the ordinary criminal law, the State will enforce the law. When caste or custom lays down a rule which is of its nature enforceable in the civil courts, but is clearly opposed to morality or public policy, the State will decline to enforce it. When caste or custom lays down a rule which deals with such matters as are usually left to the option of citizens, and which does not need the aid of civil or criminal courts for its enforcement, State interference is not considered either desirable or expedient. In the application of such general principles to particular cases, there is, doubtless, room for differences of opinion, but there is one common sense test which may often be applied with advantage in considering whether the State should or should not interfere in its legislative or executive capacity with social or religious questions of the kind now under notice. The test is, can the State give effect to its commands by the ordinary machinery at its disposal? If not, it is desirable that the State should abstain from making a rule which it cannot enforce without a departure from its usual practice or procedure. If this test be applied in the present case, the reasons will be apparent why his Excellency in Council considers that interference by the State is undesirable, and that reforms, which affect the social customs of many races with probably as many points of difference as of agreement, must be left to the improving influences of time and to the gradual operation of the mental and moral development of the people by the spread of education. Of the suggestions made in the course of the voluminous correspondence on the subjects, the only two which do not seem to the Government of India to be open to serious objection on the grounds of principle are (1) the amendment of Section 2 of Act 15 of 1856 as to the forfeiture of property of a widow on remarriage; and (2) the supply of machinery by which a Hindu widow, who fails to obtain the consent of her caste-fellows to her remarriage, may, nevertheless, marry without renouncing her religion. But although there is much to be said in favour of each of these suggestions, the Governor General in Council, as at present advised, would prefer not to interfere even to the limited extent proposed by legislative action until sfficient proof is forthcoming that legislation is required to meet a serious practical evil and that such legislation has been asked for by a section, important in influence or number, of the Hindoo community itself."

We must also beg our readers to read carefully the following summary of an *extempore* lecture lately delivered by the Honorable Mr. Ranade at Madras. It shows the latest state of his views on the subject of these social customs which cannot be regulated by legislation as has been declared by Government in a long resolution on the subject. We need scarcely add that the views of this eminent man are always entitled to great weight and deserve to be studied with care.

"The Honorable M. G. Ranade M.A. LL B., delivered an *extempore* lecture on Thursday evening at a public meeting held under the auspices of the Hindoo Students Mental Improvement Society, held in the hall of the Presidency College, Chepauk, Madras, on the subject of "Facts and Fictions." He commenced by thanking his hearers for the kind manner in which he had been introduced, and claimed to renew an old acquaintance of twelve years' standing with the people of this city. "What is truth?" was not a new question. It was a question put at least 2,000 years ago, and it had not yet been satisfactorily answered. In this world they had to tread their way, not in a choice of absolute truth, and of absolute falsehood, but in a choice of truths and half-truths. All their institutions, customs, and laws, and arrangements that they made in regard to political and religious settlements involved a conception of their relation to truths and half-truths. It was the difficulty of making a choice between the truths and the halftruths that really made a life-puzzle so great a mystery. Fiction was intended as a synonym for the mass of more or less halftruths The thought would occur to many that it was a misnomer to call these half-truths fictions. He would justify himself on the authority of the lawyers themselves. Students of law would all know what the lawyers called legal fictions. These fictions were merely half-truths, but were taken as whole truths until they were shown to be not the whole of the truth, but only a part of it. As an instance, the statement that all men knew the law in such a way as to be held responsible for any breach of the same, was a legal fiction. This was not absolutely true nor absolutely false. Although, on examination, it would be found that only very few new the law, the statement was sufficiently true for the ordinary purposes of life. Another legal fiction was that a debt not claimed within a certain time became no debt. Such fictions were also found in constitutional law, in religion, and in politics. An instance of a fiction in constitutional law was "that the king can do no wrong," or that the king never dies, These were not absolutely true, A political fiction was that representation should go before taxation. Other political fictions were "that the stamp laws are intended to check frivolous litigation and "that the excise systom is intended to check the vicious excess of the use of liquors. Half truths were also found in social and in religious matters also. In social matters they had in this part of the country, a mode of sonship which by fiction had been accepted as good or valid, as the actual begetting of a son. In the case of religious fictions there was much complication not found in social and political matters. That complication might be stated in the words of a writer, "that the facts of one age became the symbols of another, and the form of a third" That was the way in which the writer had tried to make a synthesis of all the religions of this world. A Christian fiction was the ceremony of baptism. The lecturer then proceeded to state the various applications of the fictions he had enumerated. He next said that political facts were heavily at odds against them. Notwithstanding their numbers they were, under the present circumstances, more helpless than they were a hundred years ago.. At the same time, they had responsibilities thrown upon them which were of the highest and the most solemn character. In these circumstances, every Vantage ground was a thing upon which they might set their highest value. Let men be put in such positions that they might appeal to their good sense and conscience. The lecturer asked his hearers to take hold of the political fictions, and never to lose hold of them. As regards social matters, one class of people looked at nothing but facts, and the other class at nothing but fictions. The real maxim to be observed in discussing religious questions was "Let well alone" Looked at from this point of view, they would find that things were not really as satisfactory as they might wish them to be. In one part of the country in the North, the old practice of two brothers having the same wife was still in vogue; in the East of India, polygany was prevalent; in Central India, a brother married his deceased's brother's wife; and in Guzerat, a man married a wife who was senior to him in age by five or ten years. In Bombay and in Madras, girls were sold as if they were so many horses. The lecturer then proceeded to consider the question of enforced widowhood and infant marriages. There were no infant marriages in ancient India, and how was it that they passed from such a time to such a time? Some people thought that a discussion of the question of remarriage was confined to a consideration of the question, whether the age at which girls ought to be married should be nine or ten. In the lecturer's opinion that was a very unsatisfactory way of putting it. The injustice done to widows had gone up to Heaven, and they should not sit silently and say we shall reconcile all these by marrying our girls at ten instead of nine? Other nations might be greater sinners than they were; but were there no wrongs and grievances for which fhey need be fully ashamed? Their countrymen had been looking upon the young widows-widows made so not by their own acts, but by the acts of their parents as so many horses; and surely it was not humane he would not say human for them to sit silent, and be discussing the simple query whether it should be at nine or ten that their girls ought to be married? Some said that time would bring about a more satisfactory state of thihgs. No nation and no man had ever been landed into Heavn by mere accident. They must go through great sacrifice and work conscientiously. If they did not advance consciously, they would not be said to make any advance at all. The railway taking men to Ajmere did not indicate men's progress; it was the progress of the train. He would congratulate himself and the country upon the existence of the political and religious the theosophical and vedic socities which were trying to do good in the direction of religious and social reform What, then, shoud be done to remedy tne present evils? They need not seek the assistance from elsewhere, to bring about a better state things, As a matter of fact their *shasrtas*— their *shastras* of ancient days- reverberated with the echoes of a time in which their wives and mothers were in a much better condition than they were at present. In them there was really no single point in which their marriage law needed improvement from any Christian or Mahomedan or Chinese system. (Hear hear.) If their marriage law was taaken in its full spirit, they would find that it would serve for all times and throughout all ages. Having such a noble ancestry to be traced, how came it, then that they had fallen to the present condition? They need not go to any foreigner for law on the marriage question; it was not a case in which they really required law. The lecturer was of opinion that their castes and their *aucharis* or *gurus* should regulate all that. Nobody wanted foreigners to do that. But how was their *gurus* to sit in judgment over them, unless that power was legalized and their procedure defined? What help of the legislature was wanted to marry their girls at nine or ten? That matter could be ascertained by a council of *paudits* representing all views and interests. How were the *aucharis* to be protected against suits for defamation? They really did not want legislation. (Applause.)

We acknowledge with thanks the receipt of the following:—

Report of the Municipalities in the H. A. D. for the year 1885-86.

सबार्डिनेट जज्जांच्या निवडणुकी व नेमणुकी संबंधानें सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झालेले नियम.

सदरहू नियम १४ आक्टोबर सन १८८९ च्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाले आहेत. तें येणें प्रमाणें:—

(१) मुंबई युनिव्हर्सिटीचा जो कोणी लॉग्राज्युएट, किंवा सबार्डिनेट जज्ज आणि हायकोर्ट प्लीडर या हुद्यांकरितां होणारी हायकोर्टाची परीक्षा पास झालेला जो कोणी मनुष्य सन १८९० जानेवारीच्या पहिल्या तारखे नंतर सबार्डिनेट जज्जाची जागा मिळवूं पाहिल त्यानें खालीं लिहिलेल्या शर्ती पुऱ्या केलेल्या असल्या पाहिजेत:—

(अ) त्यानें सिव्हिल कोर्टांत सबंद तीन वर्षे एकसारखा वकिलीचा धंदा केलेला पाहिजे. अगर

(ब) सिव्हिल कोर्टाचा क्लार्क, रजिस्ट्रार, अगर गव्हरमेंट प्लीडर याचे हाताखालीं आनररी असिस्टंट या नात्यानें तीन वर्षे नोकरी केलेली पाहिजे. अगर

(क) सिव्हल कोर्टाचा क्लार्क ऑफ धी कोर्ट, शिरस्तेदार. डेप्युटी शिरस्तेदार, किंवा नाझर, या नात्यानें तीन वर्षे नोकरी केलेली पाहिजे. अगर

(ड) अ, ब, क, या सदरांत सांगितलेलीं कोणतीहि एक किंवा अधिक कामें मध्यें खंड न पडतां एक सारखीं तीन वर्षें पर्यंत केलेलीं पाहिजेत.

(२). नियम (१), (ब) आणि (क) यांत गव्हरमेंट प्लीडर या शब्दाचा अर्थ फक्त हायकोर्ट आणि डिस्ट्रिक्ट कोर्ट यामधीलच गव्हरमेंट प्लीडर असा समजावा, व "सिव्हिल कोर्ट" याचा अर्थ हायकोर्ट, प्रसिडन्सी स्मालकाज कोर्टस्, डिस्ट्रिक्ट कोर्टस, व फक्त सदर स्टेशनचीं सबार्डिनेट जज्जाचीं कोर्टे व त्याच ठिकाणचीं मॉफ्युझिल स्मालकाज कोर्टें असा समजावा.

(३) सबार्डिनेट जज्जाच्या जागाकरितां जे उमेदवार असतील त्यांनीं वरील शर्ती पुऱ्या झाल्या आहेत अशाबद्दल सरटिफिकिट हजर केलें पाहिजे. तें सरटिफिकिट ज्या ज्या ठिकाणीं वरलि शर्ती पुऱ्या झाल्या असतील त्यात्या प्रमाणें हायकोर्ट अपिलेट साइडचा रजिस्ट्रार किंवा गव्हरमेंट प्लीडर याजकडून किंवा प्रेसिडेन्सी स्मालकाझ कोर्टाच्या रजिस्ट्राराकडून, किंवा डिस्ट्रिक्ट जज्जाकडून आणलें पाहिजे. मात्र तें सरटिफिकिट डिस्ट्रिक्ट कोर्टांतील गव्हरमेंट प्लीडरच्या हाताखालीं काम केल्याचें असल्यास गव्हरमेंट प्लीडरच्या सही खालीं आणखी डिस्ट्रिक्ट जज्जाचीहि असली पाहिजे.

(४). नियम (१) सदर (ब) अन्वय जो मनुष्य गव्हरमेंट प्लीडरच्या हाताखालीं ऑनररी असिस्टंट म्हणून काम करील त्यास स्वतंत्र रीतीनें वकिलीचा धंदा करण्यास त्या नियमाप्रमाणें हरकत आहे असें समजूं नये. जेणें करून त्यांच्या ऑनररी असिस्टंटच्या कामास बाध येणार नाहीं असेंच काम घेण्यास त्याजला मोकळीक आहे.

(५). गव्हरमेंट प्लीडरांचे ऑनररी असिस्टंट जे असावयाचे ते योग्य मनुष्यांनीं लीगल् रिमेंब्रन्सराकडे अर्ज केल्यानंतर त्याजकडून नेमले जातील. व ज्या लायक मनुष्यांस सिव्हिल कोर्टांत नोकरी करण्याची इच्छा असेल त्यांनीं ज्या कोर्टांत नोकरी मिळावयाची असेल त्यांप्रमाणें रजिस्ट्रार किंवा डिस्ट्रिक्ट जज्ज यांजकडे अर्ज करावा.

येत्या नोव्हेंबर महिन्याचे ४ थे तारखेस मांटगोमरी हालमध्यें नामदारव्हाईसराय यांजला "डाक्टर आफ ओरिएन्टल लर्निंग,, हा किताब देण्यास्तव पंजाब युनिवर्सिटीच्या सिंडिक लोकांची सभा भरणार आहे.

लंडन टाईम्साचे सुलक्षणी मुखोद्गार—हे पत्रकार सिव्हिल सर्विसच्या परिक्षेस हिंदु लोकांस बसण्याची परवानगी मुळींच नापसंत करितात, व शिवाय असें ह्मणतात कीं, हिंदुस्थानचें राज्य नेटिव लोकांनीं न करितां फक्त गोऱ्या लोकांनींच केलें पाहिजे.

भडोच जवळ जंबूसर येथें गेल्या आठवड्यांत गुरुवारीं दोन भयंकर खून झाले:——एक लुच्चा मनुष्य फकीराचा वेष करून एका घरीं भिक्षा मागण्यास गेला. त्या भोळ्या बाईला त्याची दया येऊन तिनें त्याला भिक्षा घातली व शिवाय आपल्या पडवींत त्यास निजण्यास जागा दिली. त्या बाईचा नवरा खेडेगांवीं गेला असल्यामुळें ती घरांत एकटीच होती. हें त्या ढोंगी फकीरानें पाहून त्यानें रात्रीं तिच्या आंगावरील कांहीं दागिन्याच्या लोभास्तव त्या बाईचा खून केला. सकाळीं ही बातमी पोलिसास कळून त्यांनीं चौकशी चालविली आहे. त्याचा अद्याप पत्ता नाहीं. दुसरा, सदर ठिकाणीं एका बोहऱ्याचा व एका मुसलमानाचा धर्म संबंधानें कांहीं तंटा होऊन पहिल्यानें दुसऱ्यास यमसदन दाखविलें. विशेष बातमी अद्याप कळली नाहीं. ने०

लाकडी तोफा—ब्रह्मी दरवडेखोरांनीं धातूच्या तोफां ऐवजीं लांकडी तोफांची योजना केल्याचें कळतें. मोठमोठ्या झाडांचीं खोडें पोखरून त्यांजवरून तारायंत्राच्या तोडलेल्या तारांचें मजबूत वेष्टन देतात. व अशा तोफांनीं ते आमच्या सरकाराशीं सामना देत आहेत! धन्य आहे कीं नाहीं त्यांची!

ब्रह्मदेशांत—बुंथी म्हणून एक अतिबलाढ्य संस्थान आहे. तेथील संस्थानिकास शरण येण्या विषयीं आपल्या सरकाराकडून निरोप गेला असतां त्यानें तो अमान्य करून लढाई देण्याची तयारी चालविली आहे. या संस्थानांत ८० हजार लोक संख्या असून त्यांपैकीं १० हजार लोक युद्धोपयोगी आहेत. शिवाय मुख्य शहरा भोंवतीं मजबूत मोठा कोट आहे. तोफांची तयारी नव्यत आहे पायोनियर पत्रावरून कळतें कीं, हा संस्थानिक इतर दरवडेखोरासही आपल्याशीं मिळवून घेत आहे.

रशियन सरकार येत्या वसंत ऋतूंत कानस्टांटी नोपलवर स्वारी करणार अशी सर्व युरोपांतील लोकांची खात्री झाली असून टर्की सरकारही लढाईची तयारी करीत आहे. न्या० सिं०

बलगेरियांत शांतता राहणें कठीण आहे व रशियन सरकार लौकरच त्याचा चांगला समाचार घेईल असें रशियांतील वर्तमान पत्रांत प्रसिद्ध झालें आहे.

रशियन सरकार बलगेरिया ताब्यांत घेण्यास मुखत्यार आहे व त्यास दुसऱ्या राष्ट्रांची या संबंधानें काय इच्छा आहे हें समजून परवा करण्याचें कारण नाहीं असें रशियांतील एका वर्तमानकाराचें म्हणणें आहे.

मि. ग्ल्याडस्टन हे अर्वाचीन ग्रीक, इटयालियन, ल्याटिन, जर्मन व फ्रेंच इतक्या भाषांत उत्तम प्रकारें भाषण करूं शकतील असें म्हणतात.

रशियांत काहीं लोकांनीं एक नवीन धर्ममत स्थापीत केलें आहे त्याचें मुख्य तत्व असें आहे कीं मनुष्यास शारिरीक वेदना भोगूं देणें हे महत् पातक म्हणून यांच्या आप्त वर्गांपैकीं कोणी आजारी पडल्यास त्याचा गळा दाबून ठार मारतात. त्या पंथाच्या लोकांपैकीं ४२ असामीस हल्लीं पोलिसांनी कैद केलें आहे.

रशिया सरकारच्या पूर्वेकडील युरोपखंडाच्या प्रदेशांतील राज्यव्यवस्थेच्या उद्योगास इंग्रजसरकार प्रतिबंध करीत असल्यामुळें रशियांतलि वर्तमानपत्रकार इग्लंडावर फार रागावले आहेत. त्यांपैकीं कांहीं हिरात रशियानें ताब्यांत घेऊन हिंदुस्थानावर स्वारी करावी अशी सूचना करीत आहेत.

मद्रास चेंबर आफ कार्मसनें हिंदुस्थान सरकारास सोन्यावर कर बसविण्या विषयीं विनंती केली आहे.

इंडियन व कालोनियल प्रदर्शन ता. १० नव्हेंबर रोजीं बंद होणार.

फिन्यान्स कमिटीनें दोन, तीन ठिकाणच्या इंग्रज धर्माध्यक्षाच्या जागा कमी करण्याबद्दल सरकारास सूचना केली आहे!

शिपायाची बायको बाळंत होऊन तीन महिने होईपर्यंत तिनें कोठें तारवांत बसून जाऊं नये. व तिच्या नवऱ्यास तो पर्यंत तिजपाशींच राहूं द्यावे असा राणीसाहेबांनीं हुकूम फर्माविला ह्मणतात.

अमेरिकेंत एका प्रकारच्या झाडास फुलें येतात तीं प्रातःकाळीं, माध्यान्हीं तांबडीं व सायंकाळीं निळीं, अशी होतात. त्यास दोनप्रहरीं मात्र सुगंध असतो असें पहाण्यांत आलें आहे असें ह्मणतात.

हिंदुस्थान सरकारच्या स्टेट रेल्वेचे गेल्या सहा महिन्यांत जें उत्पन्न होईल ह्मणून अनुमान केलें होतें त्यापेक्षां ९० लक्ष रुपये अधिक उत्पन्न झालें.

इंग्रज सरकारास लढाईची तयारी करणें जरूर आहे असें पालमाल ग्याझेटवरून समजतें. सु० प०

तारीख १ आक्टोबर पासून रेल्वेंतून माल पाठविला असतां त्याचे पैसे माल पाठविणारास अगोदर मिळून मग तो माल घेणाराच्या हातांत पडावा अशा तऱ्हेची व्यवस्था करण्यांत आली आहे. ह्मणजे पोस्टांत "व्ह्याल्युपेएबल पार्लसची" जशी व्यवस्था आहे तशीच ही होणार. माल पाठविणारे जी रसीद माल घेणारास पाठवायची त्याच्यावर रुपयांचा आंकडा घालून त्यावर सही करावी. अशा रसिदीस "रेल्वे रसीद नोट" असें ह्मणायचें. ती रसीद पोस्टांत देऊन तेथें व्ह्याल्युपेएबल पार्सल प्रमाणें फार्म भरायचा. त्यांत माला च्या ठिकाणीं "रेल्वे रसीद नोठ" चें नांव घालायाचें. सदर रसीदींत लिहिलेली रक्कम जेथें तो माल पाठविला असेल तेथील पोस्टास माल घेणारानें दिली ह्मणजे ती रसीद पोस्टवाले त्यास देतील व मग त्या रसीदी वरून रेल्वेवर त्याला माल मिळेल. ही सोय फार उत्तम झाली आहे. परंतु ह्याची प्रसिद्धी पोस्टाकडून व्हावी तशी होत नाहीं, असा आमचा समज आहे. अशा बद्दल देशी भाषेंत चोहोंकडे जाहिराती वांटल्या पाहिजेत, व निरानिराळ्या ठिकाणच्या वर्तमान पत्रांतून अशा जाहिराती प्रसिद्ध केल्या पाहिजेत. क. त.

उपयुक्त ठराव—सर्व कामदारांकडून जमिनीची मोजणी व प्रत होते, त्याबद्दलची माहिती सरकारच्या मंजुरीनें झालेली अखेर जमाबंदी सांगण्यांत येईपर्यंत रयतेला कळविण्यांत येत नसतें; परंतु प्रतीची वगैरे कामें चालूं असतात त्याचवेळीं त्याबद्दलची माहिती लोकांस आपले ह्मणणें कळवितां येण्याची संधी देण्यासाठीं आगाऊ कळविली पाहिजे अशा अर्थाचा ठराव लौकरच बाहेर येणार आहे. त्या ठरावांतील इत्यर्थ खुद्द नामदार लार्ड रे गव्हरनर, यांच्या मुखांतून गेल्या सभेंत बाहेर पडला, त्यांतील तात्पर्य असें आहे:-मोजणीचें एकंदर काम १८९२ त पुरें करण्याचा सरकारचा बेत झालेला आहे. तेथपर्यंत नवीन मोजणी होऊन जो दस्त बसविला जाईल, तो बसविण्याचें काम चालू असतांच कोणत्या दरानें दस्त बसविला जात आहे व जमिनीचे कसकसे वर्ग केले आहेत ह्याची आगाऊ नोटीस असि. सर्व्हे सुपरि. कडून रयतेस दिली जाईल. अशी सूचना मिळतांच ठरविलेले क्लास वगैरे गैरशिस्त असल्याबद्दल जर लोकांस कांहीं कळवावयाचें असेल तर त्यांणीं पैमाषच्या असिस्टंट साहेबांस किंवा सुप्रिटेंडेंटांस अर्ज करावे. त्याचा विचार करून ते कामदार जे वर्ग लावितील, व ज्या दरानें आकारणी करण्याचें योजितील ते व हल्लींचा दस्त किती आहे व पुढें किती बसणार तें त्यांजकडून देश भाषेंत लोकांस कळविलें जाईल. हें कळल्यावर गांवकऱ्यांस अर्ज करावयाचा असेल तर तो पाटलाच्या किंवा गांवांतील प्रमुख लोकांच्या मार्फत कलेक्टराकडे करावा ह्मणजे कमिशनराचे मार्फत तो सरकारापुढें जाईल आणि या योगानें अखेर दराची मंजुरी करण्यापूर्वीं सरकारास त्या अर्जाचा योग्य विचार करण्यास सांपडेल.

हेड अकौंटंटांस आजपर्यंत दरबारांत जागा नव्हती; परंतु आतां त्यांना पोलिस इन्स्पेक्टर आफ पब्लिक वर्क्स खात्यांतलि ओव्हरसियर यांच्या बरोबरीनें दरबारांत घेऊन तिसऱ्या प्रतीचे सरदार मंडळींत त्यांची नांवें दाखल करावी असा सरकारचा ठराव झाल्याचें समजतें. दी. बं.

☞ हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.